Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १९११ इ० [ अंक ६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां......... २ रुपये
वर्गणी आगाउच ध्यावयाची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसांस सोमवार उजाडेल पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग बँक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या धोरणावर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक असामींच्या नांवावर ठेवतां येतील आणि त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढिल

व्याज दर साल दर शेंकडा तीन प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ असेल तिजवर केली जाईल. मात्र हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला मिळतील.

मुंबई ब्यांक G. A. Phillips
आकोला ९।१२।०९ एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कस सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोला व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{2}{3}$ तोळे असून साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips
आकोला २१.९.१० एजंट.
नो० न० २

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader
Amraoti

No. N. 8

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट. ख. म. ह रु. १॥ ) **कलाशिक्षण** ( नमुना अंकास ⌐२ आणे.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्याचे वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ वरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय प्राइव्हेट हिप्नॉटिझम [ Hypnotism] उर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, रोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु २९ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा-बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या, औषधी, मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय,
नो. नं. ९ बडोदें.

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



दर एकाची किंमत ३।.

लमन् इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

... आहे खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत ... मजबूत आहे सर्व लोकांस ह्या घड्याळाचा ... योग्य संग्रह व्हावा म्हणून मुद्दाम किंमत रुपये ३। ... आपणास पोस्टेज खर्च माफ घड्याळा ... कचेरी कार्यभाग, काम, पेढी, मोफ, इतकें सामान ... आमच्या लोकांकडून अशी अमूल्य संधी पुन्हां येणार ... येत नाहीं तो नें मागवा.

... खोजा वल्लीभाई इस्माल
... वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDHA.
... अ. ४

## जाहिरात

... योग्य मार्ग महिन्याचे फलासह ... आहे. पण त्याच्या व कळवूं फी ३ रुपये ... स्वतंत्रपणें. खर्च ⌐८ नग्म ... गेल्यास मात्र चालू नांव कळवावें.
... अशी भीति व ...
... हान ...
... ही भीती निरर्थक ...
... समाजांतल्या विचारव ... लोणखेड
... या कामीं पुढें ... खानदेश.

# ब्रह्मसिद्धांतमाला

### अथवा

## वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण उर्फ **बाबा गर्दे**कृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्त्वें मनामध्यें चांगलीं बिंबून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तव्हांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४९, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें, पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी पो० कुंडल.
२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ७ २९

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणें करतां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

व्ही. पी. करणीर्यां उत्तम निळिकाळीं शाई ८६ आण्यांची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारची स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

## WANTED.

Wanted Agents on salary and commission for the Bengal Provident Company Limited. The cheapest and most reliable Life and Marriage Assurance Company. Both sexes assured up to age 60. No proof of age nor Medical examination necessary. Monthly premium of Life— Ist. class- Re one and ditto 2. nd. class annas eight and Marriage Endowment Re one monthly. Life Benefit payable up to Rs 1000/- and Rs. 600/- respectively in first and second classes. Minimum benefit Rs. 110/- and Rs. 50/- respectively just after death. Marriage- at all ages, benefit payable before the ceremony.

SPECIAL FEATURE.

Agents commission hereditary and one Rupee to be deducted in the first two Months & two annas per rupee on renewal. Moreover, Policy holders entitled to elect two Directors to vote like share holders and to check the accounts.

Apply at once to S. M. DASGUPTa,
Secretary,
1 Hari Mohon Bose's Lane, Calcutta.

नो. नं. ९४

### नोटीस

रा० राघो जानजी तेलंग कलाल रा० कंचनपूर ता० खामगांव यासः—

निंबी बाप तुळशाजी तेलंग अ० पा० गणपत कोंडाजी तेलंग रा० बोरी आडगांव ता० खामगांव नोटीस देतो कीं गेल्या दुष्काळांत अजमासें सन १८९९ या सालीं वरील निंबी ही तुमचे आश्रयास राहिली होती तेव्हां ती अगदींच लहान ह्मणजे ४।५ वर्षांची अजमासें असावी. याच स्थितीचा अन्यायाचा फायदा घेऊन तुह्मी तिच्याशीं बायको नात्याचा संबंध दाखविता हें बरोबर नाहीं. कडू काळाचे दिवस संपतांच ती तिकडून निघून आली. त्या पुढें तिचा व तुमचा कोणत्याच प्रकारचा संबंध नाहीं- असें असतां व या बाबतींत आह्मी आमच्या जातींतील लोकांसह सामोपचारें सांगितलें असतां तुह्मी तें मानीत नाहीं. सबब तुह्मास कळवितों कीं आह्मी तिचें आतां लग्न करणार आहोंत तेव्हां तुह्मी कांहीं हरकत आणील्यास ती रद्द बातल समजली जाईल व तिच्या आयुष्यांच हानी बद्दल तुह्मांस जबाबदार धरिलें जाईल. आह्मी तिचा विवाह तुमच्याशीं करूं इच्छीत नाहीं. कळावें. ता० २-२-१९१०.

सही
निंबी वल्लद तुळशाजी अ० पा०
करणार गणपत कोंडाजी तेलंग
कलाल रा० बोरी आडगांव
दस्तुर खुद.

नो० नं १८

### नोटीस

नोटीस बेशमी बनसी वल्लद भाऊराव रा० आकोला यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुम्ही वऱ्हाड समाचार छापखान्यांतून जी नोटीस दिली आहे ती खोटी असून त्यांत "गाडीखाना सरकारी माव" वगैरे गोष्टी निवळ खोट्या लबाडीनें लिहिल्या आहेत. तुम्ही काम खराब केलें, मालमसाला वाईट लावला व रुपये ही जास्त घेऊन गेला आहात. तरी रा० रा० बाळाभाऊचे हस्तें तुमचेकडेस जे रुपये निघतात, ते तुम्हांस दाखवून दिले असोन, व खराब मालाच्या वगैरे गोष्टी कबूल करूनही तुमचेकडेस निघत असले प्रमाणें रुपये न पाठवितां खोटी नोटीस दिली तें ठीकच केलें मात्र आतां तरी ही नोटीस पावल्या पासून तुम्ही कबूल केलेले रुपये आठ दिवसांत आणून द्यावे. नाहीं तर योग्य तजवीज करणें भाग पडेल. ही नोटीस दिली असे.

सही
M. D. Pillay
नो० नं० १९

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १९११ इ० [ अंक ६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां........ २ रुपये
वर्गणी आगाउच देण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस मुद्राच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील त्यापुढें येणाऱ्या नोटिसास सोमवार पर्यंत थांबावें लागेल. पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस किंवा त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।१२।०९ } एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{2}{3}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० न० २

### NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader
Amraoti

No. N. 3

चिरकालचा खरा लाभ कोणता?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो!
महाराज! ह्या दोन्ही गोष्टी


वार्षिक वर्गणी ट. ख. म. ह रु. १॥ ) **कलाशिक्षण** ( नमुना अंकास ०)॥

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्याच वर्गणीदार व्हा. मराठी भाषेत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ वरी पण चालू माच अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, रोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु २९ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा-बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या, औषधी, मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय,
नो. नं. ९ बडोदें.

### अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



फक्त घड्याळें घेणारांस — एक घड्याळ मोफत — पोस्टखर्च माफ — दर एकाची किंमत ३।.

जेंटलमन् इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवलौकिकांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुबक आहे सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ घड्याळा सोबत चेन, कंपास, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल अशी अमूल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ता — खोजा वलीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं ४

### जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०)= जन्म काल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता—
मा० गोविंद,
मु० व पो० लोणखेड
पखानदेश.

### ब्रह्मसिद्धांतमाला
अथवा
### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण ऊर्फ **बाबा गर्देकृत** हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत **युक्लीड** धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्वें मनामध्यें चांगलीं बिंबून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तत्कांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४९, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें, पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी पो० कुंडल.
२ म्यानेजर, श्रीरामतत्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ७ २९

### विलक्षण नयन रक्कुठार.

विलक्षण नयन रक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करतां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

व्ही. पी. कानीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

### WANTED.

Wanted Agents on salary and commission for the Bengal Provident Company Limited. The cheapest and most reliable Life and Marriage Assurance Company. Both sexes assured up to age 60. No proof of age nor Medical examination necessary. Monthly premium of Life— Ist. class– Re one and ditto 2. nd. class annas eight and Marriage Endowment Re one monthly. Life Benefit payable up to Rs 1000/– and Rs. 600/– respectively in first and second classes. Minimum benefit Rs. 110/- and Rs. 50/- respectively just after death. Marriage– at all ages, benefit payable before the ceremony.

### SPECIAL FEATURE.

Agents commission hereditary and one Rupee to be deducted in the first two Months & two annas per rupee on renewal. Moreover, Policy holders entitled to elect two Directors to vote like share holders and to check the accounts.

Apply at once to S. M. DASGUPTa,
Secretary,
1 Hari Mohon Bose's Lane, Calcutta.
नो. नं. ९४

### नोटीस

रा० राघो जानजी तेलंग कलाल रा० कंचनपूर ता० खामगांव यासः—

निंबी बाप तुळशाजी तेलंग अ० पा० गणपत कोंडाजी तेलंग रा० बोरी आडगांव ता० खामगांव नोटीस देतो कीं गेल्या दुष्काळांत अजमासें सन १८९९ या सालीं वरील निंबी ही तुमचे आश्रयास राहिली होती तेव्हां ती अगदींच लहान ह्मणजे ४।५ वर्षांची अजमासें असावी. याच स्थितीचा अन्यायाचा फायदा घेऊन तुह्मी तिच्याशीं बायको नात्याचा संबंध दाखविता हें बरोबर नाहीं. कडू काळाचे दिवस संपतांच ती तिकडून निघून आली. त्या पुढें तिचा व तुमचा कोणत्याच प्रकारचा संबंध नाहीं- असें असतां व या बाबतींत आह्मी आमच्या जातींतील लोकांसह सामोपचारें सांगितलें असतां तुह्मी तें मानीत नाहीं. सबब तुह्मास कळवितों कीं आह्मी तिचें आतां लग्न करणार आहोंत तेव्हां तुह्मी कांहीं हरकत आणिल्यास ती रद्द बातल समजली जाईल व तिच्या आयुष्यांच हानी बद्दल तुह्मांस जबाबदार धरिलें जाईल. आह्मी तिचा विवाह तुमच्याशीं करूं इच्छीत नाहीं. कळावें. ता० २-२-१९१०.

सही
निंबी वल्लद तुळशाजी अ० पा०
करणार गणपत कोंडाजी तेलंग
कलाल रा० बोरी आडगांव
दस्तुर खुद.

नो० नं ९८

### नोटीस

नोटीस बेशमी बनसी वल्लद भाऊराम रा० आकोला यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुम्ही वऱ्हाड समाचार छापखान्यांतून जी नोटीस दिली आहे ती खोटी असून त्यांत " गाडीखाना सरकारी भाव " वगैरे गोष्टी निवळ खोट्या लबाडीनें लिहिल्या आहेत. तुम्ही काम खराब केलें, मालमसाला वाईट लावला व रुपये ही जास्त घेऊन गेला आहात. तरी रा० रा० बाळाभाऊचे हस्तें तुमचेकडेस जे रुपये निघतात, ते तुम्हांस दाखवून दिले असोन, व खराब मालाच्या वगैरे गोष्टी कबूल करूनही तुमचेकडेस निघत असले प्रमाणें रुपये न पाठवितां खोटी नोटीस दिली तें ठीकच केलें मात्र आतां तरी ही नोटीस पावल्या पासून तुम्ही कबूल केलेले रुपये आठ दिवसांत आणून द्यावे. नाहीं तर योग्य तजवीज करणें भाग पडेल. ही नोटीस दिली असे.

सही
M. D. Pillay
नो० नं० ९९

निंब पा कामीं पुढें झाले | ज्याचा प्रसार करण्याच्या उद्योगास स्व- तःस वाहून घ्यावें; कोणी सहाय्य | तुप १० | कापुस | १।॥ आंगठा. ११

प्रवेश तिसरा.

स्थळ— ( राक्षसभुवन येथील गंगेचें वाळवंट. )

दासोपंत०—

पद

कां विमल मुकुल जन करिसि विकल ॥
तूं अधम कुमत तव जनन विफळ ॥ ध्रु० ॥
पद्मदलस्थित हारिनें येउनी ॥
आयस परिते चूर्ण करोनी ॥
स्वभक्त वात्सल्या प्रगटोनी ॥
दाखविलें परि नुमजसि तूं खल ॥ ॥

जगपाळ० — तोफेचे गोळे चूर्ण झाले हें यानें कसें जाणलें.

दासोपंत०— तरवार परजविता आपल्यामुळें नाकावर वार लागून स्वतःचेंच नासीक छेदन झालें म्हणून खड्ग गतून नाहींसे करण्याचा जगतें दुसऱ्याला अपशकून करण्या सारखाच तुमचा हा प्रयत्न आहे.

जगपाळ — अरे अधमा या उमरावांपूर्वी प्रथम तुला तोफेच्या तोंडीं उडविला पाहिजे. [ सेवकांनीं अंडग्य करितां जगपाळ दासोपंतांचा हात धरतो तोंच जगपाळा । स मूर्च्छा यागते ]

दिग०— तोफेच्या लोखंडी गोळ्याचें चूर्ण करून या पामराच्या देहाचें रक्षण केलें. ही मंदमति तुमचें भक्तवात्सल्य कोठे वर्णन करूं! भक्त आणि अभक्त असा देवा प्रमणें भेदभाव सनाठायीं नाहीं. म्हणून तें देवांपेक्षाही थोर आहेत. गाईची तहान भागवावी व वाघाला विष होऊन जावें हा अपार संतापाशी नसून ते शत्रु मित्र सम लेखतात.

जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ॥
देह कष्टवीती उपकारें ॥ १ ॥

या ईश स्वरूपांत अंतर्धान पावते पण तापासून तीं दूर पळतो. संत संतोषाचें ळ, सुखाचें भांडार, मोक्षाची विश्रांति आणि भक्तीचें कल्पतरु आहे. मोक्ष तीनें अलंकृत झालेल्या या संतांनीं अनेक दरिद्री लोकांना श्रीमान केले. राजे, महाराजे, चक्रवर्ति दणार नाहींत असें समाधान संतापासून घेऊन हा पापक्षालन जगतही संतकृपेनें आत्मसुखाचा अनुभव त आहे. अशा संतांचा महिमा केवळ चरणवंदन नीच मी वर्णन करितों.

दिगंबरपंत०— हा जगपाल परमेश्वराच्या पुढें उभा असतां तर याला अंत ह्याच्या वधाबद्दल रौरव नरकांत टाकलें तें त्यानें. पण संतुष्टता सर्व होतात. याचें दहन होऊन तो चिरानंदांत मग ला आहे. "अपगा मारवे कविनी काळ तेथें नाहीं मुळीं काळ वेळ" ॥ ा अपपर रहित संताना मी अनन्यानें शरण आहे.

पद

संत दयाळ अती ॥ गमती ॥
हरिच्या अमती कृति द्वय रीती ॥
सुख दुःखद जगती ॥ ध्रु० ॥
सोज्वळ करिती खळ मति परिते ॥
अपपर नच वदती ॥ १ ॥

नमस्कार करण्यास जातो तोंच त्यास दासोपंत चेवर वळून नरगारर मशहूर ठेवितो. )

दासोपंत०— छे, छे, ताता.

निजसुखार्थ येडनी स्वार्थ साधना जरी ॥
म्हणुनि लीन चरणिं दीन तनय
प्रणति हा करी ॥
नवनिता समान मातृपितृ मृदुल अंतरीं ॥ २ ॥

दिगंबरपंत०—(दासोपंताला वर उठवून) बाळा तूं माझ्या कुळाचा उद्धार केलास. आतां घरीं येऊन वृद्ध मातापित्याला तुझ्या संसाराचें सुख पाहूं दे.

दासोपंत०— संसार म्हणजे षड्रिपूंचा संचार. शिवाय संसार करायचा कोणी देहानें की आत्म्यानें. देहानें मानलें तर तो आपला नाहीं. अपूर्ण

---

## दुय्यम प्रतीचें शिक्षण.

[ लिहून आलेला मजकूर ]

वाईटांतूनही केव्हां केव्हां चांगलें निघतें अशी एक जुनी म्हण आहे तिचें प्रत्यंतर दुय्यम प्रतीच्या शिक्षणासंबंधानें मुंबई सरकारनें काढलेल्या प्रेसनोटमध्यें चांगलें दिसतें मॅट्रिक्युलेशन परीक्षा बंद कर ण्याच्या प्रश्नासंबंधानें मुंबई सरकार व युनिव्हर्सिटी सिनेट यांच्यामध्यें बराच वादविवाद सुरू झाला त्याच वेळीं असें दिसून आलें कीं सरकारला हायस्कुलांच्या सुधार णेबद्दलचा प्रश्न हातीं घेतल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. सरकारचें लक्ष आज कित्येक वर्षे नुसत्या युनिव्हर्सिट्यांच्या सुधारणेकडे लागलें होतें, तें आता त्याच्या खालच्या पायरीवर उतरून मध्यमप्रतीच्या शिक्षणाकडे वळलें आहे आणि त्या शिक्षणाच्या संबंधानें स्वतःवरची जबाबदारी अंशतः तरी पार पडण्यास मुंबई सरकार तयार झालें आहे ही खरोखर समाधानाची गोष्ट आहे. जिल्हानिहाय 'नमुनेदार' सरकारी हायस्कुलें ठेवणें, त्यांतील शिक्षकाचे पगार वाढवणें, अभ्यासक्रमांत सुधारणा करणें, शारीरिक शिक्षण, आरोग्य, वगैरे गोष्टींकडे योग्य लक्ष पुरविणें इ० सुधारणा सरकारनें आपल्या दृष्टीपुढें ठेविल्या आहेत, आणि त्या घडवून आणण्यास लागणारें असें द्रव्य फीचे दर वाढवून, न असें स्वतः देऊन सरकार जमा करणार आहे या सुधारणा नुसत्या सरकारी हायस्कुलांतून नव्हेत तर खाजगी व मदतीच्या शाळांतूनही घडवून आणण्याची सरकारची इच्छा आहे. या प्रश्नाला अशा रीतीनें व्यावहारिक स्वरूप देण्याची तयारी दाखविल्या बद्दल मुंबई सरकार स्तुतीस व लोकांच्या आभारास निःसंशय पात्र आहे.

---

वरील सुधारणेच्या बाबीं सरकारच्या नजरेस आणण्यास जें कान्फरन्स कारण झालें तें निवळ सरकारी अधिकाऱ्यांचें आणि त्यांतूनही रेव्हेन्यु कमिशनरांचें होतें. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्यांनें केलेल्या सूचनांतली व्यंगें क्षम्य आहेत असें म्हणावें लागतें; पण कान्फरन्सनें केलेल्या सूचनांचा सरकारनें जो विचार केला तो बिनसरकारी आणि शिक्षणाचे कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या गृहस्थांच्या सल्ल्यानें केला असता म्हणजे ती व्यंगें दूर होऊन सरकारचा ठराव सर्वांग सुंदर झाला असतां. शिक्षणाचे बाबतींत सरकारवर किती मर्यादेपर्यंत जबाबदारी आहे आणि लोकांवर किती आहे हा नाजुक प्रश्न आहे आणि त्याचा विचार एकट्या प्रांतिकांच्या संयुक्तकान्फरन्सनच ता करावयास पाहिजे. सध्यां इंग्रजी शिक्षण हें लोकांच्या उदरनिर्वाहाचें व देशाच्या राजकीय, सांपत्तिक, औद्योगिक वगैरे सर्व प्रकारच्या उन्नतीचें साधन होऊन बसलें आहे हें शिक्षण घेण्यास जितके लोक पुढें येतील तितक्यांच्या शिक्षणाची सोय करण्याची जबाबदारी आपल्यावर घेण्यांत सरकार तयार नाहीं—किंबहुना तें आमचें कर्तव्य नाहीं असें सरकार स्पष्टपणें म्हणत आहे. उच्च शिक्षणाचे बाबतींत सरकारनें आपणा स्वतःस जबाबदारींतून मागेंच मुक्त करून घेतलें आहे, आणि कांहीं अंशीं त्याचें कारणें रास्तही होतें पण सामान्य मध्यमप्रतीच्या लोकांस उदरनिर्वाहास व उन्नतीस अवश्य होऊन बसलेल दुय्यम शिक्षणाचे बाबतींत सरकारला आपल्या वरची जबाबदारी इतक्या सहज रीतीनें झुगारून देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. लोकांवर या बाबतींत कांहींच जबाबदारी नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं; आणि ते आपल्यापरी सरकारशीं सहकारित्वानें वागण्यास तयार आहेत हें मुंबई, पुणें, नगर, वगैरे ठिकाणच्या खाजगी संस्थांच्या हायस्कुलांच्या संख्येवरून स्पष्ट झालें आहे प्रत्येक जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणा वरून तेथील सरकारी हायस्कुलांतल्या विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित करण्याबद्दलची कान्फरन्सची सूचना सरकारनें मान्य केली आहे तीही अशीच वादग्रस्त आहे. कारण कीं तिचे दुष्परिणाम शिक्षणाचे कामीं मागासलेल्या जातींना विशेषतः भोगावे लागणार आहेत. कारण पुण्यासारख्या ब्राह्मणवस्तीच्या ठिकाणीं ही मर्यादा घातली तर तिचा फायदा ब्राह्मण वर्गाला मिळेल, तसा इतर वर्गांना मिळणार नाहीं; आणि खानदेश, किंवा सोलापुरसारख्या मागसलेल्या वर्गाच्या ठिकाणीं ती मर्यादा ब्राह्मणांना व इतरांना सारखीच गैरसोयीची होईल वेर, उलटपक्षीं जातीचें तत्त्व शिक्षणाचे बाबतींत घुसडून दिल्यास तसें करणें हें अदूरदर्शीचें व विघातक असल्यामुळें सरकार तें करण्यास तयार होणार नाहीं अशी आमची खात्री आहे. सर्वच जिनसांची महर्घता झाल्यामुळें तिच्याबरोबर शिक्षणाचीही महर्घता झाली पाहिजे हें तत्त्व तर्कशास्त्राला मान्य होण्यासारखें नसल्यामुळें व महागाईमुळें लोकांची झालेली हलाक स्थिति लक्षात घेता फीचे दर वाढविण्यापासून लोकांमधील शिक्षणप्रसारावर अनिष्ट परिणाम होण्याची फार भीति आहे. देशांत सरकारविषयीं अनादरच होऊन बसलेले गैरसमज व उत्पन्न झालेला असंतोष शिक्षणाच्या अभावाचे परिणाम होत. दुय्यम प्रतीच्या शिक्षणाचा फैलाव करून हे दोष काढून टाकण्या ऐवजीं वरील उपायांनीं तें शिक्षण महाग केल्यास हे परिणाम शतपटींनें अधिक जाचक होतील अशी भीति वाटणें साहजिक आहे.

---

कान्फरन्सनें केलेल्या व सरकारनें स्वीकारलेल्या सूचना सरकाराशीं सहकारित्वानें वागणाऱ्या खाजगी शाळांना अधिक जाचक होणाऱ्या आहेत. खाजगी शाळांत आरोग्य शारीरिक शिक्षण, शास्त्रीय शिक्षण, वगैरेच्या सोयी असाव्या तशा नाहींत ही गोष्ट खरी आहे, व त्या तशा नसल्याचें कारण द्रव्याभाव हें आहे. फीचे दर वाढविल्यानें होणार व अर्थात् फीच्या उत्पन्नाची वाढ अर्थात पूर्णपणें त्यांच्या पदरांत पडणार नाहीं शिवाय दुसरी गोष्ट सरकारी हायस्कुलांतून ज्या सुधारणा सरकार फीच्या वाढीच्या व स्वतःच्या मदतीनें घडवून आणणार त्याच सुधारणा खाजगी संस्थांनीं घडवून आणाव्या अशी अपेक्षा सरकारी अधिकारी करणारच. पण त्या सुधारणा फीच्या वाढत्या उत्पन्नाशिवाय दुसऱ्या कशाच्या आधारावर त्यांनीं करावयाच्या तें प्रेसनोटमध्यें सांगितलेलें नाहीं. हल्लीं जास्तींत ज्यास्ती म्हणजे खर्चाच्या एक त्रितीयांश इतकी मदत सरकारकडून एखाद हायस्कुलाला मिळत असते. ती मदत वाढवून निदान एक द्वितीयांश तरी करण्यास सरकार तयार आहे काय? नसल्यास त्यांच्याकडून शिक्षणाच्या बाबतींत सुधारणा होण्याची अपेक्षा सरकारला न्यायानें करतां येईल कीं नाहीं हा प्रश्नच आहे. सरकारी मदतींत वाढ झाल्या शिवाय स्वतःवरील जबाबदारी व सरकारी इन्स्पेक्टरांची कडक देखरेख यांच्यांत वाढ करून घेण्यास कोणती खाजगी संस्था तयार होईल? सारांश, दुय्यम प्रतीच्या शिक्षणांत सुधारणा पाहिजे आहे ही गोष्ट मान्य केली तरी ती घडवून आणण्याचे मार्गासंबंधानें प्रामाणिकपणाचे मतभेद पुष्कळ होण्यासारखे आहेत, व लोकस्थिति, आणि शिक्षणप्रसाराच्या अभावापासून होणारे दुष्परिणाम यांचा सरकारनें हल्लीं केला आहे त्याहून निराळ्या रीतीनें विचार करतां येण्यासारखा आहे हें महत्त्वाचें कार्य घाईघाईनें उरकून फुरसतीच्या वेळीं पश्चात्ताप करीत बसण्यात अर्थही नाहीं व शहाणपण नाहीं. तेव्हां या बाबतींत सरकारी शिक्षणाधिकारी व बिनसरकारी पण लोकशिक्षणाच्या कामांत अनुभव घेतलेले असे ना० गोखले व ना० जोशी यांच्या सारख्या गृहस्थांची एक संयुक्त कमिटी नेमून सरकारनें या प्रश्नाचा विचार करावा अशी आमची सरकारास नम्र विनंति आहे.

## वऱ्हाडसमाचार

माघ शुद्ध ७ शके १८३२ दुर्मतिनाम संवत्सरे

## वरिष्ठ कायदे कौन्सिलची बैठक.

व्हाइसरायसाहेबांच्या कायदे कौन्सिलांतल्या लोकनियुक्त सभासदांनीं आपली कामगिरी उत्कृष्ट प्रकारें चालविली आहे आणि त्यांच्या आस्थापूर्वक व कळकळीच्या प्रयत्नास यश येण्यास ही सुरुवात झाली आहे हें पाहून कोणासही संतोष वाटेल. गेल्या आठवड्यांत झालेल्या सदर कौन्सिलच्या बैठकीचे वेळीं मध्यप्रांतातर्फेचे प्रतिनिधि ना० सर गंगाधरराव चिटणवीस यांनीं त्या प्रांताच्या कांहीं जिल्ह्यांना जमिनधाऱ्या संबंधानें कसें अन्यायानें वागविण्यात आलें आहे त्याबद्दलचा सादंत इतिहास सांगून हाफअसेटचा नियम सदर जिल्ह्यांना लागू करण्यासंबंधचें मालगुजारांना संयुक्त प्रांत व पंजाब यांतील जमीनदारांच्या स्थितीला आणून सोडण्याबाबतचें अभिवचन सरकारी सभासदाकडून मिळविलें. विषयाची पूर्ण माहिती करून घेऊन योग्य रीतीनें आणि नम्रपणें आपल्या तक्रारी सरकारपुढें मांडल्या

किंवा लोकनियुक्त सभासद ह्मणजे कौन्सिलचे नुसते कोतवाली घोडे. त्यांचा उपयोग कांहीं नाहीं, असें आतां कोणास ह्मणतां यावयाचें नाहीं. लॉर्ड हार्डिंज यांच्या सहानुभूतिपर व सहकारितत्त्वाच्या राज्यनीतीचा परिणाम इतक्या लवकर कौन्सिलमध्यें दिसून येईल अशी कोणास [illegible] क्षा नव्हती. पण सुदैवानें त्याच्या कारकीर्दीच्या पहिल्याच बैठकींत तो स्पष्टपणें दृग्गोचर झाला आहे. कौन्सिलच्या नियमांत सुधारणा करून मुसलमानांना जातिविशिष्टाच्या धोरणावर दिलेले विशेष अधिकार काढून घ्यावे ही ना० मि० मालवीय यांची सूचना समयाला अनुचित होती. सध्यां हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें एकी घडवून आणण्याचे प्रयत्न चालले आहेत व या गोष्टीचा खल करण्याकरितां गेल्या कांग्रेसनें एक संयुक्त कमिटी नेमली आहे. या कमेटीच्या रिपोर्टाची वाट न पाहतां एकदम कौन्सिलपुढें अशा प्रकारची सूचना आणण्याच्या धोरणानें सदर कमिटीचें काम उलट कठिण होऊन बसेल अशी आमची समजूत आहे. ना० मि० मालवीय यांच्या सूचनेवर मुसलमान सभासदाकडून टीकेचा भडिमार होईल असें वाटलें होतें, आणि त्या प्रमाणें घडलेंही. एका मुसलमान सभासदानें तर घसरून व्यक्तिविषयक वाद काढला, पण ना० व्हाइसरायसाहेबांनीं तिला आळा घातला. सुदैवानें ज्या प्रमाणें कांग्रेसमध्यें त्याप्रमाणें कौन्सिलांतही जातीविशिष्टाच्या तत्त्वावर अधिकार देण्याचे विरुद्ध खुद्द कांहीं [illegible] मुसलमान सभासदही होते. पण असा अप्रिय विषय आतांच काढणें अप्रशस्त असें बहुमत दिसून ना० मि० मालवीय यांचा ठराव शेवटीं गळाला. हा निकाल आमच्या दृष्टीनें एकंदरीत संतोषकारक झाला. आमच्या प्रांताच्या तर्फेनें प्रतिनिधि ना० रा० ब० तात्यासाहेब मुधोळकर उद्योगधंद्याच्या शिक्षणाविषयींचा ठराव आणणार होते, पण लवकरच अलाहाबाद येथें भरणाऱ्या डायरेक्टरांच्या कॉन्फरन्सकडे तो विषय विचारासाठीं सोपविला आहे असें सांगण्यांत आल्यावरून सदर ठराव तूर्त मागें घेण्यांत आला आहे. खर्चांत काटकसर करण्यासंबंधानें सरकारी व बिनसरकारी गृहस्थांची कमिटी नेमून चौकशी करण्याच्या ना० मि० गोखले यांच्या ठरावावर त्यांचें व इतर सभासदांचीं विस्तृत भाषणें झालीं, व ना० गोखले यांची विषयमांडणीची कुशलता, त्यांच्या युक्तिवादाची समर्पकता, आणि वक्तृत्वाची छाप यांची योग्य प्रशंसा करून फायनॅन्स मेंबर सर गायवुड फ्लीट विल्सन यांनीं आपण ना० गोखल्यांच्या सूचनांचा विचार करूं असें आश्वासन दिल्यामुळें तोही ठराव व्हाइसराय साहेबांच्या इच्छेला मान देऊन परत घेण्यांत आला. या प्रमाणें यंदाच्या बैठकीचें काम लोकनियुक्त व सरकारी सभासद यांच्या सलोख्यानें शांतपणें व बऱ्याच समाधानकारक रीतीनें पार पडलें, आणि त्या बद्दलचें श्रेय उभयप्रकारच्या सभासदास आणि विशेषतः व्हाइसराय साहेबांस देणें योग्य आहे. स्वतः न बोलतां मुकाट्यानें आपल्या राजकीय धोरणाची छाप सर्वांवर पाडणें यासच नांव खरी मुत्सद्देगिरी. हिचा प्रभाव लॉर्ड हार्डिंजसाहेबांनीं परवाच्या बैठकींत जो दाखविला, त्यावरून यांची कारकीर्द 'आशा, सलोखा, आणि सहकारित्व' या त्रिगुणांनीं युक्त होईल अशी खात्री वाटते.

## या गोष्टी कोणी कराव्या!

सार्वजनिक हितार्थ बाबतींत देह कष्टविण्याची तऱ्हा आमचे देशांत आज नवीन आहे असें नाहीं. पूर्वीच्या काळीं सुद्धां असे कष्ट करणारे असत. गांवांत कोठें देवळाचा जीर्णोद्धार करावयाचा असला, किंवा सार्वजनिक उत्सव असला तर त्यासाठीं कित्येक दिवसपर्यंत अहोरात्र अशांत श्रम करणारे- वर्गण्या जमविणारे, मंडप उभारणारे, देवापुढें नियमानें कथा, पुराण सांगणारे, लळितें करणारे, ब्राह्मण भोजनाचें साहित्य जुळविणारे, अन्नसंतर्पण करणारे- खरपूस माणसें फार जुन्या काळीं होतीं व अजूनही आहेत. त्यांचा मार्ग निराळा, उद्देश निराळा, विचार निराळे होते यांतहि काय तें, पण समाजाच्या उपयोगीं पडण्याची त्यांची उत्कट इच्छा हल्लींच्या कोणाही सार्वजनिक परोपकारी गृहस्थाच्या इच्छेहून कमी बलवत्तर नव्हती. हा सार्वजनिक सेवापरायणतेचा अंकुर अद्यापही समूळ नष्ट झालेला नाहीं, व चिंचवड, वाई, पंढरपूर, वगैरे ठिकाणीं यात्रेच्या प्रसंगीं तो प्रमुखत्वानें दृष्टीस पडतो ही आनंदाची गोष्ट आहे. पण सध्याचा काळ बदलला आहे त्या मानानें या अंकुराच्या वाढीला ही निराळें वळण लावणें जरूरीचें आहे. पूर्वीच्या मानानें आतां ग्रामदेवतेचे उत्सव किंवा तीर्थाच्या ठिकाणीं होणारी ब्राह्मणसंतर्पणें थाटाचीं होत नाहींत याबद्दल खेदाचे उद्गार वृद्ध व अनुभवी माणसांच्या तोंडून निघालेले आपण पुष्कळ वेळां ऐकतों. त्या उद्गारांत पुष्कळ तथ्य आहे. उत्सव हे उत्साहाचे पोटीं असतात. दुष्काळ, दारिद्र्य, खर्चास फुटलेलीं अनेक तोंडें धर्मश्रद्धेची शिथिलता आस्थेचा अभाव, निरुत्साह, व शहरांत राहण्याच्या संवयीमुळें आपसांतल्या जुटीच्या बंधनाची ढिलाई या सगळ्या गोष्टी याच्या मुळाशीं आहेत. पैकीं कांहीं अपरिहार्य आहेत त्या सोडून दिल्या, आणि बाकीचीं कारणें दूर करण्याचें व लोकांच्या मनाला आणि विचाराला नवें वळण देण्याचें मनांत आणिलें तर तें काम असाध्य आहे असें नाहीं. 'लोकसेवा' या शब्दाचा उपयोग अलीकडे इतका निष्कारण होऊं लागला आहे कीं त्याबद्दल तो थट्टेचा विषयच होऊन बसला आहे. पण लोकांच्या उपयोगीं पडण्याची आमच्या लोकांची जी साहजिक प्रवृत्ति आहे ती जगचे जागीं नष्ट न होऊं देणें शक्य असलेंच अनिष्ट वळण लागण्यापूर्वीं तिला योग्य संस्कार देऊन देशकालवर्तमानानुरूप आपणांस अनुकूल करून घेतलें तर केवढा कार्यभाग होण्यासारखा आहे! पण आमच्या लोकाग्रणींच्या डोक्यांत अजून ही गोष्ट येत नाहीं अथवा आली तरी अशा अल्पशिक्षणाच्या पण देशकार्यचिकीर्षु लोकांकडून कोणतें कार्य करवून घ्यावें तें यांना सुचत नाहीं. अशिक्षित उत्तम सेवक खरे; पण त्यांना अंकित न ठेवतां डोक्यावर चढू दिलें असतां तो सर्व नाश केल्यावांचून रहात नाहीं त्याप्रमाणें या अल्पज्ञ पण उत्साही माणसांना आपल्या कह्यांत ठेवून त्यांजकडून योग्य मार्गानें काम वेतल्यास ठीक आहे. पण त्यांच्या अल्पज्ञपणाच्या समजुतींना [illegible] न घालतां स्वतंत्र त्यांच्या विचारावरोबर वाहावत गेल्यास मात्र परिणाम भयंकर व्हावयाचा अशी भीति वाटून कदाचित् या समाजाला ज्ञान वाढण्याची लोकधजत नसतील ही भीती निरर्थक नाहीं, आणि यासाठीं समजांतरचा विचारवंत व वजनदार पुढाऱ्यांनीं या कामीं पुढें झालें

[illegible] या उत्साहाचा जोर अजमावून त्याचा फायदा करून घेतला होता. त्यांचा मार्ग कितपत योग्य किंवा अयोग्य होता हा अलाहिदा प्रश्न आहे; रा० टिळक यांच्या मार्गांतले दोष हल्लींच्या पुढाऱ्यांनीं काढून टाकून या लोकांच्या उत्साहाला कांहीं तरी चांगलें वळण लावणें जरूर आहे येवढेंच प्रतिपादण्याचा आमचा उद्देश आहे. हल्लींच्या दृष्टीनें सार्वजनिक हिताच्या कामांत या उत्साहाचा कसा उपयोग करून घेता येईल हें पाहणें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. या बाबतींत पुण्याच्या प्रो० कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रमाचें उदाहरण घेण्यासारखें आहे. दोन अशिक्षित किंवा फार तर अल्पशिक्षित अशा विधवा या संस्थेतीं हिंडून आश्रमाची माहिती कशा पसरीत चालल्या आहेत, व त्यांच्या खटपटीनें लोकांच्या धर्मार्थ वेचल्या जाणाऱ्या द्रव्याचा ओघ आश्रमाकडे कसा वळत आहे, हें जो कोणी बारकाईनें पाहील त्याला प्रो० कर्वे यांच्या बुद्धीचें, त्यांच्या दूरदृष्टीचें, परोपकारित्वाचें, व कळकळीचें आदरयुक्त कौतुक वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. अनाथ विधवांच्या शिक्षणाचा एक प्रश्न व तेही एका प्रांता पुरता प्रो० कर्वे यांनीं हातीं घेतला आहे. असेच दुसरे प्रश्न अनेक आहेत. उदाहरण- तुरुंगाची सुधारणा घ्या. तुरुंगांत निर्ढावलेले अपराधी व प्रथम गुन्हेगार यांना एकत्र ठेवल्यानें प्रथम गुन्हेगाराच्या मनावर जो अनिष्ट परिणाम घडतो त्याचीं उदाहरणें सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस आणणें, तुरुंगांतल्या कैद्यांची व्यवस्था ठरलेल्या नियमाप्रमाणें होते कीं नाहीं तें पाहणें, दुर्दैवानें कारागृहांत पडलेल्या अपराधी तरुणांच्या बहकलेल्या मनाला ताळ्यावर आणण्याचा यत्न करणें त्यांना कथा, पुराण, इतिहास यांतल्या गोष्टी सांगून सन्मार्गाला लावणें, तेथील इस्पितळांतल्या रोग्यांना गायनवादनांच्या योगानें रंजविणें, सेवासदनासारख्या संस्थांना मदत करणें, दुर्व्यसनांत सांपडलेल्या निरनुभवी तरुणांना वाईट मार्गा पासून परावृत्त करणें गरीब विद्यार्थ्यांसाठीं धर्मार्थ शाळा, लॉजिंग, चांगल्या मासल्याच्या पुस्तकांचा प्रसार करून भ्रष्टता आणणाऱ्या वाङ्मय मागें टाकण्याचा यत्न करणें, दिवसें दिवस शिक्षण महाग होत चाललें आहे अशा वेळीं विद्यार्थ्यांना खाजगी रीतीनें मदत करून शिक्षणाच्या मार्गांतून त्यांची लवकर सुटका करणें, आरोग्याचा मार्ग दाखविणारे उपदेशक फिरते ठेवणें, अशीं शेंकडों कामें आहेत. ज्याची त्याची योग्यता, काम करण्याची तऱ्हा, कळकळ वगैरे पाहून त्याच्या बेतानें काम त्याच्याकडे सोंपवून दिलें व तें आपल्या देखरेखी खालीं करवून घेतलें तर अशा अप्रत्यक्ष रीतीनें सुशिक्षित पुढाऱ्यांना इतरांकडून अनेक कामें एका वेळीं करवून घेतां येतील. मोठाल्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं कांग्रेस, कान्फरन्स, उपदेशक कौन्सिलें, कारखाने, वगैरे महत्त्वाचीं कामें करावींत. मध्यमवर्गीच्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं आतां वर सांगितलेलीं कामें हातीं घ्यावी, [illegible] गांवांत कोणकोण सार्वजनिक खटपटीचीं मार्गें आहेत व त्यांचे हातून कोणतीं कामें होण्यासारखीं आहेत तें पाहून उद्योगास लागावें. कोणी शेती सुधारणेचा प्रश्न हातीं घ्यावा; कोणी पतपेढ्यांचा प्रसार करण्याच्या उद्योगास स्वतःला वाहून घ्यावें; कोणी मद्याच्या धर्म-

केल्यास किती तरी काय होईल! आमच्या वऱ्हाड प्रांतांत साधारणतः लोक [illegible] आहेत त्यांच्यांत आरोग्यशिक्षणाचा [illegible] शक का जाऊं नयेत? सेवासदनाची [illegible] वऱ्हाडांत कां निघूं नये? कापूस [illegible] णेचा प्रयोग करून पाहण्याचें क्षेत्र [illegible] प्रयत्नानें कां निघूं नये? [illegible] सभा कां नसावी? मुलें [illegible] आहेत ना? त्यांच्यांत योग्य वाङ्मयाचा प्रसार करणारी एखादी संस्था कां निघूं नये? या सर्व प्रश्नांचें उत्तर एक आहे, लोकांत सार्वजनिक काम करण्याचा उत्साह नाहीं असें नाहीं; त्यांना फुरसतीची वाण नाहीं; द्रव्याश्रयाची कुरकुर ही व्यर्थ आहे; योजकाची मात्र खरी खरी वाण आहे. जो उठतो तो- कांग्रेस आणि राजकीय किंवा औद्योगिक परिषदा अथवा कायदे कौन्सिलें, युनिव्हर्सिटीची सेनेट अशा बड्याबड्या संस्थांच्या व्यवस्थापक मंडळांतून आपलें नांव फडकावें ह्मणून धडपड करतो. पण ज्याला खरोखर मनापासून देशकार्य करावयाचें आहे त्याला याच संस्था कशाला पाहिजेत? लहानसें कार्यक्षेत्र घेऊन अल्प प्रमाणावर अल्पशिक्षितांच्या साह्यानें कामाला सुरुवात कां करतां येऊं नये? सर्वांनीच मोठालीं कामें एकदम करण्याची हाव धरून फसगत करून घेण्यापेक्षां लहान कार्यांत मोठें यश संपादण्याची उमद कां धरूं नये? करीन तर मोठें कार्य करीन, नाहींपेक्षां मी कांहींच करणार नाहीं असें ह्मणणाराचे हातून बहुधा कांहींच घडत नाहीं. सध्यां आपल्या देशांत बहुतेक असा प्रकार चालला आहे. आह्मी वर दाखविलेली दिशा धरल्यानें ही अनर्थपरंपरा अंशतः तरी टळेल अशा भरंवसा वाटून सूचना केली आहे.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान -- या आठवड्यांत थंडी इतकी कडक पडली कीं पाणी देखील कोठें कोठें गोठलें होतें व त्यामुळें कित्येक उभीं पिकें थोडीबहुत जळालीं. रोगराई कमी होत नसून बुलढाणा, उमरावती, व आकोला या जिल्ह्यांत अनुक्रमें प्लेगाचे मृत्यु मागील्या सप्ताहांत ४०२, ३३१ व १९३ असे होते.

रा० रा० केशव बळवंत शेवडे, मुनसफ हर्दा यास खामगांव येथें [illegible] आलें. बाहेर

नामदार राव बहादूर रंगनाथ कीं, मुधोळकर यांनीं व्हाइसरायसाहेबांची खानगी मुलाखत घेतली आणि त्यांस अलाहाबाद येथे ता० १३ रोजीं भरणाऱ्या विद्यापरिषदेला मुद्दाम निमंत्रण सरकारमार्फत देण्यांत आलें.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥। |
| मुंबई ब्यांकेचा सोन्याचा चीप दर तोळ्यास | | २३॥।७॥ |
| चांदी | | ७३॥ |
| नव्याची नवी | ९१ | ९७॥ |
| गहूं | | ४॥ |
| गहूं बनशी | | ४॥। |
| चणे | | ३॥ |
| तेल | | ८ |
| सरकी | | १३॥ |
| तुप | १० | ११ |
| कापूस | ८० | आगटा. |

मी खालीं सही करणार जात मारवाडी रा० मौजे सेंदल प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें इजकडून तमाम लोकांस कळवीण्यांत येतें कीं, मथुरालाल उर्फ केशरमल वल्लद रामप्रताप मारवाडी रा० मौजे नायगांव प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें हा दत्तकाचे नात्यानें माझ्या सावकारीच्या असाम्या लबाडीनें वसूल करीत असून माझे घरच्या मालाची हि अफरातफर करित आहे. परंतु, सदरहू इसमास मी दत्तक मुळींच घेतलें नसून त्याचा माझा कांहीं संबंध नाहीं. यामुळें त्यास कोणताच अधिकार नहीं. या पुढें सदरहू इसमाशीं कोणीच्च कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये जो कोणी त्याच्याशीं व्यवहार करील त्यास मात्र जबाबदार धरलें जाईल, करितां अगाऊ कळविलें आहे. कळावें ता० २६-१-११ इ०

सही

नि० गंगाबाई जवजे नारायण इची

नो० नं० ७० बांगडी.

## नोटीस.

नोटीस बेशमी अजी मर्द धोंडू माळोकार राहाणार बावनबीर ता० जळगाव जि० बुलडाणें यांस नोटीस देणार रामभाऊ भगवान शिंपी रा० बावनबीर ता० जळगांव नोटीस देण्यात येतें कीं मिती पौष शु० ९ रोज सोमवार तारीख ९-१-११ रोजीं १० दहा वाजता तूं व तुझा दीर नामें मारोती वा लक्षुमण माळोकार उभयता माझे दुकानावर येउन शेत विकण्याची गोष्ट काढली. त्या वेळेस कंनलाल अगरवाले मालगांवकर यांनीं १००० एक हजार रुपयास मागितले आणि त्या वेळेस १ कानभटजीशीं व २ भगवा ढोल्या व ३ रघुजी ढोल्या व ४ नन्ही माळी माळेगावकर याचे समक्ष कन्हैलाल यांनीं १००० हजार रुपयांचा सवदा न होतां माझा सवदा १३०० शें रु याचा झाला आहे. त्या बदल इसार १९ भरा रुपये घेतले आहे, आणि तूं कबूल केलें कीं उद्या खरेदी करून देऊं, त्या करितां मी रकम लोकांजवळून व्याजानें आणून ठेविली आहे. तूं दोन दिवस माझी भेट घेतली नाहीं व भेट झाल्यावर मी ... लोकांसमक्ष झटलें तरी आज उद्यां पावेतो तुमचे मनांत दगेबाजी मला वाटते. करितां या नोटि[सीनें] कळविण्यांत आलें आहे कीं, ... शेत सर्वे नंबर २३४ एकर १३ ... १९ आकार रुपये २३ आणे ८ याचें झालें तुझे नावानीं असून अद्यापि खरेदी करून देत नाहींस ह्मणून नोटिसीनें जाहीर [करतों] कीं नोटीस पावल्यावर तातडतोब खरेदी करून द्यावी. खरेदी करून न दिल्यास [तु]झा दोघांवर विश्वासघाताचा फिर्याद [क]रीन. जर तूं शेत दुसऱ्यास विकल्यास [मा]झे किंमतीचे वर आली तितकी मी घेईन या शिवाय नोटिसीचा खर्च तुमचे [ज]वळून भरून घेईन कळावें. ता. २७।१।११

सही

रामभाऊ भगवान शिंपी रा०

बावनबीर ता. जळगांव

दस्तुर खुद.

रा. विष्णा वल्लद राघो कुंभार राहणार पारखेड ता. मलकापूर यांस-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुझी माझा पाटाचे नवरे असून तुमच्यापाशीं मी ५।७ वर्षें नांदले आहे. हल्लीं तुह्मी आणखी एक, मी असतां गंधर्वाची बायको केली आहे. तिच्या नादानें तुह्मी रात्रंदिवस असता. तुह्मी मला आज २ वर्षें अजमासें टाकून दिलें आहे. मी हल्लीं माझ्या आईबापाचे घरीं आहे. तुमच्या पासून मला दोन मुली झाल्या आहेत. त्यापैकीं वडील तुमच्या जवळ असून तिच्याहून लहान दुधपिती असल्यानें मजजवळ आहे. दुसरी गंधर्वाची बायको माझ्यापेक्षां देखणी तुह्मास वाटल्यावरून मला तुह्मी वागवित नाहीं. ८।४ दिवसांपूर्वीं मी स्वतः माझ्या भावाबंदासह आले असतां मला तुह्मी हांकून दिलें व नादावित नाहीं ह्मणून सांगितलें. आतां माझें ह्मणणें एवढेंच आहे कीं मला नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून अजमासें ८ दिवसांत तुह्मी मला खावटी वगैरे बद्दल या दोन वर्षांत झालेला खर्च अंदाजा रुपये २५० देऊन घेऊन जावें न नेल्यास तुमचे मनांतून मला असें विनाकारण कुजवायाचें असून माझा छळ करणें आहे असें समजेन, व हीच फारकत समजून मी आणखी एखादा घरठाव करीन व तुमच्यावर टाकून घातले मुदतींतील अन्नवस्त्राबद्दल या नोटिशीचे खर्चासुद्धां दावा करीन. कळावें. ता. २७।१।११ इ.

सही

भिमा मर्द विष्णा कुंभार हल्लीं राहणार

तालखेड ता. मलकापूर नि. खु. (रा.

देवाजी वल्लद भोजू कुंभार

याचे घरीं.) आंगठा.

नो० नं० ६६

## नोटीस.

शामराव अमृत व बळवंत अमृत देशपांडे उभयतां राहणार कुरुम ता० मूर्तिजापूर यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी व मी असे सख्खे बंधु असून एकत्र आहोत. आपले वडील अलीकडे मरण पावले आहेत. त्यांचे मरणानंतर सर्व इस्टेटीची वांटणी करून देण्या विषयीं मीं तुह्मास अनेक वेळां ह्मटलें असतां तुह्मी मजला आज करितों उद्यां करितों अशी चाळवाचाळीव दाखवीत आहांत. तरी या नोटिशीनें कळविण्यात येतें कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत तुह्मी माझा हिस्सा वाटून माझे कबजांत स्वतंत्र द्यावा. तसें न केल्यास मला रीतीप्रमाणें तजवीज करणें भाग पडेल. तसेंच हल्लीं मी असें ऐकतों कीं तुह्मी वरील इस्टेट माझे संमती शिवाय गहाण वगैरे देणार आहांत, तसें केलें तर त्या व्यवहारानें मी मुळींच बांधला जाणार नाहीं व त्याची जोखीम मजवर कोणतेंहि प्रकारें येणार नाहीं. कळावें. ता० २-२-११ इ.

सही

भगवंत अमृत देशपांडे राहाणार

कुरुम ता० मूर्तिजापूर.

नो० नं० ६७

लक्ष्मी बाई जवजे सखाराम पाटील रा० बेलुरा बुजरुख ता०— बाळापूर हिस:---

दत्तु वा॥ सीताराम पाटील अज्ञान पालन करणार जन्म देता बाप सीताराम नरसिंग पा॥ रा० बेलुरा बुजरुख ता० बाळापूर हा उत्तर देतो कीं तुह्मी मला दत्तक घेतलें त्या बाबतींत माझ्या जन्म देत्या बापापासून करार लिहून घेतला आहे दत्तकपत्र व करारनामा हे एकाच लेखकाकडून एकाच दिवशीं लिहिले आहेत. हें तुह्मास माहित असून बक्षिसपत्राचा कागद तमच्या जवळ असतांहि नोटिसींत तारीख चुकीची घातली आहे. मी अज्ञान असूनहि तुह्मी प्रत्यक्ष माझ्या नांवानें नोटीस दिली आहे. सव्वा वर्षाच्या छोट्याशा मुदतींत तुह्मास माझी वर्तणूक वाईट कोणत्या प्रकारें दिसून आली हें समजत नाहीं. व या बद्दल तुह्मी मला दिलेल्या व ता० २९-१०-१० च्या वतनदार प्रेसांत छापलेल्या नोटिसींत खुलासा नाहीं यामुळें जबाब देणें अशक्य झालें आहे. माझी उमर अजमासें फार तर ८।९ वर्षांची असेल व त्याचप्रमाणें नोटिसींत आक्टोबर सन १९१० तील तारीख आहे व वरील पत्यावर पोस्टाचा छाप ता० ११-१२-१० चा आहे. ता० २९ आक्टोबर १९१० ते ११-१२-१० पावेतों नोटीस कोठें गडप झाली होती तें कळत नाहीं. हें तुह्मी मुद्दाम माझें नुकसान करण्याचे उद्देशानें केलें आहे. माझ्या जन्म देत्या बापानें तुह्मास करून दिलेल्या करारनाम्यांत तुह्मी पालन करून वंश चालवावा असे शब्द मी सज्ञान असतों तर घातले नसते. तुह्मास दोन फक्त मुली आहेत. त्यांच्या नवऱ्याकडून तुमच्या स्थावरजंगम जिंदगीची उत्तम रीतीनें व्यवस्था राहून तुमच्या खाण्यापिण्याची तजवीज पूर्ण ठेविली जाईल अशी तुमची दत्तक मला घेतलें त्यावेळीं खात्री नसल्यामुळें तुह्मी मी नजिकचा ह्मणून वारस करून घेतलें आहे. माझें दत्तक घरांतील वेगळें नांव ठेविलें असतां तुह्मी त्या नांवानें मला बुद्धिपुरस्सर नोटीस दिली नाहीं. या कारणांवरून मला असें ह्मणणें भाग पडतें कीं तुमच्या जांवयांच्या किंवा अशाच एखाद दुसऱ्या घरफोड्याच्या नादीं लागून माझा सर्वस्वी नाश तुह्मी करूं पाहता. खरोखर, ह्मातारपणामुळें तुह्मांस बुद्धिभ्रंश झालासें वाटतें. त्यामुळें जो जसें सांगेल तसें करण्यास तयार होता व तुह्मी मला आपल्या घरीं नेऊन नारठोक करून छळता सबब मला माझा जन्म देता बाप तेवढ्या पुरता सांभाळतो. वरील हकीकतीवरून तुह्मी मला नोटीस खोडसाळपणामुळें दिली असून तुह्मी आपल्या वरील जबाबदारी उडवूं पाहता, पण तसें होणें शक्य नाहीं आणि अशानें झालेलें दत्तकपत्रहि रद्द होऊं शकत नाहीं. तुह्मी सपशेल खोटी नोटीस दिली आहे. याबद्दल पंचानुमतें तुह्मास नुकसानी देणें भाग पडेल. व मला सज्ञान होऊन चारचौघासारखा जगात वागण्यासारखा होईपर्यंत जो खर्च लागेल तो या नोटिसीचे खर्चासुद्धां नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसात देऊन माझी माझ्या पालकाच्या संम्मतीनें पावती घ्यावी. असें न केल्यास तुमच्यावर कायद्यानें काम चालवावें लागेल

सही

दत्तु वल्लद सीताराम उर्फ रंभाजी वल्लद

सखाराम पाटील नि. खु. अज्ञान

पालन करणार जन्म देता बाप

दस्तुर सीताराम वा॥ नरसिंग

पाटील रा. बेलूर बु. ता.

नो० नं० ६१ बाळापूर नि. आंगठा

## नोटीस

विठू वल्लद झिंगराजी लुंगे राहणार पोटी पारवा पोस्ट मंगरूळपीर जिल्हा आकोला यांस:—

कळावें कीं आज सुमारें ४।५ महिने होत आले असून तुह्मी मजला नेत नसून माझें पालनपोषणही करीत नाहीं. यावरून नोटीसद्वारें नोटीस देण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत मजला घेऊन चला अगर उदरनिर्वाहाची सोय लावा. नाहीं तर हीच फारकती समजून मी आपल्या उदरनिर्वाहासाठीं दुसरा घरठाव करीन. मग तुमची कोणतीच फिर्याद अगर तक्रार चालणार नाहीं. व हीच फारकती समजली जाईल. कळावें. तारीख २३ माहे जानेवारी सन १९११ इ०

[दस्तुर] तुकाराम वल्लद देवजी राहणार धानोरा.

सही

मालीबाई मर्द विठू हल्लीं राहणार

धानोरा भुश्याचा पोस्ट

मंगरूळपीर हिची

नो. नं ६३ नि० बांगडी.

## नोटीस.

मुरादखां वल्लद बहादरखां मुसलमान रा० खानापूर ता० मुर्तीजापूर जि० आकोला यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची नवरी चांदबी मर्द मुरादखां हिजला तुह्मी आज सवादोन वर्षें होत आलीं, आमच्या जवळ आणून टाकून गेले व तिचे खाण्यापिण्याची सोय वगैरे कांहीं केली नाहीं. तरी वरील चांदबी व तिची मुलगी हिजला खाण्यापिण्याचा खर्च ५ पाच रुपये महिन्याप्रमाणें १२५ सवाशें रुपये लागले आहेत. तरी वरील खर्च नोटीस मिळाल्या पासून आठ दिवसांचे आंत देऊन तुह्मी आपली बायको व मुलगी यांस घेऊन जावें. नाहीं तर हीच फारकती समजली जाईल. कळावें. तारीख २३ माहे जानेवारी सन १९११ इ०

सही

हैदरखां वल्लद मलंगमिया मुसलमान

राहणार धानोरा ता०

नो. नं. ६४ मंगरूळपीर द० खु०

## जाहिर खबर

सर्वत्र शेट, सावकार वगैरे लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यात येतें कीं, शामराव अमृत, बळवंत अमृत रा० कुरुम ता० मुर्तीजापुर व मी खालीं सही करणार असे त्रीवर्ग सखे बंधु आहोत. आज पावेतों आह्माला कोणाचें देणें नाहीं. पुढें माझे भावां पैकीं कोणालाही कोणी कर्ज दिल्यास त्याबद्दल मी जबाबदार राहणार नाहीं. कळावें तारीख २-२-११

सही

भगवंत अमृत देशपांडे कुरुमकर

नो० नं० ६९ ता० मूर्तिजापूर

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख १३ माहे फेब्रुवारी सन १९११ इ० [ अंक ७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. जिल्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{3}{4}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१९१० } G. A. Phillips. एजंट.
नो० न० २

### NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq Pleader,

चिरकालचा खरा लाभ कोणता?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो!
महाराज! ह्या दोन्ही गोष्टी

(वार्षिक वर्गणी ट. ख. स. ह रु. १॥) **कलाशिक्षण** (नमुना अंकात २ आ.)

गांवाच्या विविध हुन्नर, कारागिरी, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांचा माहिती शिकविण्याचा वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मास अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल कार्यालय. विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, रोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा बाकींची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या, औषधी, मंत्रतंत्रक्रिया; जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक—कलाशिक्षण, कार्यालय, बडोदें.
नो. न. ९

### अशी संधी पुन्हां येणार नाहीं.





जंटलमन् इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा म्हणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशा अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ता — खोजा वलीभाई इब्राहिम मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४

## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह व लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८ जन्म काल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता—
भा० गो० पंडित,
मु० व पो० लोणखेड
प. खानदेश.

## ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. केशो कृष्ण ऊर्फ बाबा गर्दे यांचा हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्वें मनामध्यें चांगलीं ठसून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तत्कांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४५, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक, छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ ट. हांसल निराळें, पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी पो० कुंडल.

२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ५ २९

### विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार–खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात. ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल, बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीचा किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीच्या ठिकाण [illegible] ८६ [illegible] डायरी [illegible] मिळेल आमचेकडे शालेपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दराने मिळेल विशेष [illegible] पत्रव्यवहार,

जी. एस. [illegible] पोष्ट [illegible] मुंबई.

### WANTED.

Wanted Agents on salary and commission for the Bengal Provident Company Limited. The cheapest and most reliable [illegible] Marriage Assurance Company [illegible] up to [illegible] Medical [illegible] premium [illegible] ditto [illegible] and Marriage Endowment Re one monthly. Life Benefit payable up to Rs 1000/- and Rs. 600/- respectively in first and second classes. Minimum benefit Rs. 110/- and Rs. 50/- respectively just after death.

SPECIAL FEATURE.

Agents commission hereditary and one Rupee to be deducted in the first two Months & two annas per rupee on renewal. Moreover, Policy holders entitled to elect two Directors to vote like share holders and to check the accounts.

Apply at once to S. M. DASGUPTA, Secretary,
1 Hari Mohon Bose's Lane, Calcutta.
नो. नं. ९४

### जाहिर नोटीस

नोटीस देणार खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, तुळसी मर्द रामजी तेली राहणार पेठ औरंगपूर ता० आकोट जि० आकोला हिस व सर्व लोकांस:—मी जाहिर नोटीस देतों कीं तुळसी ही माझी वडील भावाची बायको आहे, तिजला पुत्रसंतान नाहीं, या करितां तिजला स्थावर व जंगम इस्टेट कोणा माहू वगैरे लोकांस खरेदी, गाहाण, बक्षीस वगैरे कोणत्याही रितीनें देण्यास अधिकार नाहीं. सबब कोणी खरेदी, गाहाण, बक्षीस अगर इतर कोणत्याही प्रकारानें मालकी करुन घेतल्यास ती बेकायदेशीर समजली जाऊन त्याजवर दावा करुन परत घेतली जाईल. करितां या जाहिर नोटीसीनें सर्वत्रांस कळविलें आहे.

ता० ६।२।१९११ इ०

दस्तुर विष्णु माधव फडके, पि• रायटर राहणार आकोला.

सही
सदू वा॥ चिमणाजी तेली राहणार औरंगपूर निशाणी खुद.
नो० नं० ७२

### नोटीस

बेशमी सारजा जवजे नारायणराव देशमुख राहणार पातुरशेखबाबू हिस —

खालीं सही करणार हिजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तूं हरामाचें पाट आणून त्यापासून तुला हरामाचा मुलगा झालेला तुझेपाशीं बहाल आहे. सुमारें २ वर्षांपासून वाईट कामांत शिरुन घराचे बाहेर झाली. याकरितां नोटीस दिली जाते कीं, तूं व्यभिचार कर्मांत प्रवर्तक झाल्यामुळें तुझा आतां कोणचेहि प्रकारें माझे इस्टेटीवर शेतामुद्दां व घरामुद्दां हक्कसंबंध राहिला नाहीं; तेव्हां तूं आतां दुसरे ठिकाणाहून कर्ज वगैरे काढल्यास स्थावरजंगम मीलाबद्दल गहाण वगैरे देण्याची तजवीज केल्यास, तुझे करण्यापासून तें गैरकायदा होऊन घेणार इसमाचें नुकसान होऊन कोर्टमार्फत तुझा जबाब घेतला जाईल. करितां तुला कारवाई करण्यास अधिकार नाहीं. तूं आमचे पंथांतून गेली, सबब या नोटिशीचा समन घेऊन नोटीस पावल्यापासून ३ दिवसांचे आंत आम्हांस जबाब द्यावा. असें न केल्यास आम्ही रीतीप्रमाणें तजवीज करुन घेऊं व कोर्ट आम्हास इनसाफ देईल हें पक्कें समजावें. कळावें ता. ९।२।११ इ.

सही
चंद्रभागा जवजे नारायणराव देशमुख रा० पातुरशेखबाबू ता. बाळापूर नि. खु. आंगठा.

पाश्र्वांत सातार्‍या जवळ कृष्णातिरीं वडूथ येथें वे० रा० हरिभक्त परायण हरिभाऊ राठे नांवाचे गृहस्थ होऊन गेले. यास कवितेचा फार नाद होता. यांची स्वतःची कविता ज्ञान व भक्तिपर असून फारच गोड व रसाळ असल्यामुळें आपले पदीं घ्यावें योजिलें आहे. आपण आपले पदीं तिजला स्थल द्याल अशी आशा आहे.

दासानुदास.

१ पद. चाल. बाल गजानन

पंढरिच्या पाटला विठोबा ग्या मज भेटीला ।
आपल्या पायीं ॥
मज ठेवा चुकवा संसृति राहटीला ॥ धृ० ॥
पुण्य लेश जरि म्हणाल तिळाइति नाहीं गांठीला ।
पैसा अडका कांहिं नि असतो न जाणे तें टीला ॥
अकाबाई ही आमचे नेहमी लागलि पाठीला ।
प्रपंचाच्या लोभें बुडालों, जुनलों वेठीला ॥
नामदेवादिक भक्ता सांगा नरहरि शेटीला ।
आपल्या पदीं मज ठेवा चुकवा संसृति
राहटीला ॥ १ ॥
पंढरपुरची चालिन कधीं मी प्रेमानें वाट ।
चंद्रभागेच्या तिरचा पाहिन संताचा थाट ॥
रामकृष्ण हरी विष्णुमकुंदा कीर्ति बोभाट ।
धुम धुम धुम धुम धुमाळि हो ती टाळि कडकडाट ॥
काळ्या पताका वरती उडतां करतां
फडफडाट ।
भूमीवरती भक्तासाठीं आले वैकुंठ ॥
नाचत नाचत जाइन कधीं मी वाजविन
घाटीला । आपल्या पदीं म० ॥ २ ॥
प्रपंच डोह भरला मोठा त्यातुन मज तारीं ।
कामादिक शाजे भयंकर ममता सुसरी ॥
लोभ मोह हे मच्छ अपार तोडिति शरीरीं ।
सर्प विळोळे नाना जंतू डंखिति वीखारीं ॥
केव नक्र हा विक्रम आधीं चक्रानें मारी ।
धाव धाव या दीन दयाळा तारी गिरिधारी ॥
हरिचें नाम गातां याचा भवसागर आटिला ॥
आपल्या पदीं मज० ॥ ३ ॥
भुभुच्या अंकीं निद्रा करा मी मजला धापट ॥
विठ्ठ विठ्ठल छंदें बोलत जैसा पोपट ॥
पुंडलिकानें काय दिधले मृत्तिकेचि वीट ।
द्रौपदीच्या हातच्या खाशी भाजीचा देठ ॥
जनाबाईच्या घरीं आणशी शेणाची मोट ।
गवळ्या आहे तू चोखून खाशी गोपाळाचे उ ॥
हरि चरणाची आस लागली ऐके गोपीला ।
आपल्या पदीं मज० ॥ ४ ॥

अपूर्ण.

---

## वऱ्हाडसमाचार

माघ शुद्ध १५ शके १८३२ दुर्गादिन म संवत्सरे

---

### राजाची बदनामी.

राजाची बदनामी हे शब्दच हिंदुस्थानच्या लोकांच्या कानांत शूळ उत्पन्न करणारे आहेत. हिंदुशास्त्रांतून गोवध, महाहत्या, गुरुनिंदा वगैरे जीं महापातकें सांगितलीं आहेत त्यांतच राजद्रोहाची गणना केलेली आहे, आणि राजाची बदनामी म्हणजे राजद्रोहाची पराकाष्टा होय. कारण कायदा ज्याला राजद्रोह समजतो तो एका दृष्टीनें पाहतां समाजद्रोह असतो, पण राजाची बदनामी करण्यांत तो करणाराचा कटाक्ष असतो. अशा घोर अपराधाला हिंदुधर्म शास्त्रांनें जिव्हाच्छेदनाचें किंवा देहदंडाचेंच शासन ठरविलें आहे आणि तें कडक आहे असें कोणीही म्हणणार नाहीं. पण पाश्चात्य राष्ट्रांतील लोकांच्या मनांत राजाच्या पावित्र्याविषयींची इतकी उच्च कल्पना वसत असलेली दिसत नाहीं. गेल्या आठवड्यांत विलायतेंत एका मनुष्यानें आपले हल्लीचे बादशहा पांचवे जॉर्ज यांच्या संबंधानें अत्यंत निंदास्पद व कर्ण कठोर उद्गार काढल्याबद्दल त्याचेवर खटला होऊन त्याला साम्य शिक्षा झाल्याचें वर्तमान ऐकून खऱ्या हाडाच्या हिंदी गृहस्थास अत्यंत आश्चर्य वाटलें असेल यांत शंका नाहीं. राजदर्शें जरी छोटीं कशीही असलीं तरी त्याचा उच्चार न करितां तीं गुप्त राखणें व गादीचा योग्य ठायीं हें हिंदुस्थानांत येक प्रजाजनाचें पवित्र कर्तव्य मानलें जातें त्या रहस्याचा खाजगी संभाषणांत देखील उच्चार करणें हें पाप आहे, मग यांना प्रसिद्धि देणें तर दूरच राहिलें. पण पाश्चात्य देशांतला रिवाज निराळा आहे. तेथें राजा म्हणजे एका सामान्य दर्जाच्या लोकांकडे कांहीं समजत नाहींत. जेथें राजकारणी संबंध येईल तेथें मात्र त्याचा बोज राखावयाचा, खाजगी बाबतींत तो आणि एखादा मजूर सारखाच अशा रीतीची समजूत तिकडील लोकांची असल्यामुळें जी गोष्ट हिंदुस्थानांत खाजगी रीतीनें कोणी कुजबुजण्यास सुद्धां धजणार नाहीं, त्या गोष्टी तिकडे वर्तमान पत्रांत येऊं शकतात, व त्यांच्या संबंधानें भरकोर्टापुढें चौकशी होऊं शकते! पावाच्या बदनामीच्या खटल्यांत तर आरोपीनें खुद्द राजाला कोर्टापुढें खेचून आणून साक्ष देण्यासाठीं उभे करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली, आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं या गोष्टीला कायद्याचा प्रतिबंध नसता तर आपण कोर्टापुढें हजर राहून साक्ष दिली असती असें खुद्द राजानेंही जाहिर केलें! आम्हां हिंदुस्थानच्या लोकांना हा सगळाच प्रकार अगदीं अपूर्व वाटणें साहजिक आहे. आपल्यावरचें किटाळ किती निष्कारण आहे तें सगळ्या जगाच्या निदर्शनास आणण्यासाठीं आणि आपल्या आचरणाची निष्कलंकता स्थापित करण्यासाठीं राजानें आपलें वैभव व थोर पदवी क्षणभर बाजूला टेऊन न्यायदेवतेच्या पदा पुढें लवावें हा राजाच्या अंगचा खरोखर थोरपणा होय. पण सर्व अधिकाराचा उगम असे जो नरपति त्याला स्वतःच्या बचावासाठीं येवढें आत्मार्पण करण्यास लावणाऱ्या माणसाला काणतें विशेषण योग्य आहे तें ठरविणें मुष्किलीचेंच झालें पाहिजे ह त्या माणसाचा दोष नाहीं; समाजरच नेच्या मूलतत्त्वाचा दोष आहे. आमच्या समाजाची रचना विषमतेच्या पायावर झाली आहे म्हणून पाश्चात्य लोक तिला नांवें ठेवतात पण अभिजात, शील, शिक्षण, संस्कार, इत्यादिकांच्या योगानें मनुष्याला पायरी पायरीनें वर चढतां येतें ही जी व्यवस्था आमच्या समाजांत आहे ती एका दृष्टीनें अधिक सोयीची व श्रेयस्कर आहे. प्राच्य सुधारणा मनुष्याला पायरी पायरीनें वर चढविते; पाश्चात्य सुधारणा एकदमच सर्वांना समानतेचे हक्क देऊन मोकळी होते हा परिणाम आहे समानतेचा बरोबर सर्वांवरून मारखा फिरविण्यांत जे उच्च दर्जाचे आहेत त्याचें मात्र नुकसान होतें, व जे बरोबर असत्र आहेत त्यांना ... या म्हणी प्रमाणें राजाचा अपमान करण्याची इच्छा असल्यास तसे करण्याचे प्रसंग नालायकांना आयतेच मिळतात. पाश्चात्य लोकांच्या दृष्टीनें राजाची बदनामी व एखाद्या व्यक्तीची बदनामी सारखीच! आणि म्हणून ती करणाऱ्या आरोपीला विलायती कोर्टानें फक्त एक वर्षाची सजा दिली! हिंदुस्थानांत एखाद्या खिसेकापूला सुद्धां यापेक्षां अधिक सजा मिळते, असें असतां राजाच्या बदनामीसारख्या घोर अपराधाबद्दल तीच शिक्षा दिलेली ऐकून हिंदुस्थानच्या लोकांच्या मनांत विलायतेंतल्या न्यायपद्धती विषयीं कांहीं विपरीत ग्रह होण्याचा संभव आहे पण न्यायदेवतेचाही तेथें निरुपाय आहे हे वाचकांनीं लक्षांत ठेवावें. कारण कायदे हे समाजाच्या स्थितीला सोडून कधीं नसतात विलायतेंत ज्या तऱ्हेवर समाजाची रचना झाली तें तत्त्वच चुकीचें आहे अशी तिकडील लोकांची खात्री होऊन नव्या उपयुक्त शुद्ध पायावर त्या समाजाची पुनर्घटना करण्यास ते लोक तयार होईं तों पर्यंत हा प्रकार असाच चालू राहील. हिंदुस्थानांत विलायते इतका शिक्षणप्रसार झाला नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण धर्माचें भय, व समाजाचें भय या दोन गोष्टी जें सत्कार्य करण्यास आज कित्येक शतकें समर्थ झाल्या आहेत तें शिक्षणप्रसारानें सुद्धां विलायतेंत करवत नाहीं हें या गोष्टीवरून चांगलें व्यक्त झालें आहे.

---

### देशी गृहस्थानें केलेले दोन महत्त्वाचे शोध.

प्रत्येक नवीन शोध लावणारा हा समाजाचा उपकारकर्ता आहे असें एडिसनचें एक वाक्य आहे आणि तें अक्षरशः खरें आहे. आगगाड्यांची टक्कर होऊन त्या अपघातांचे पायीं दरसाल किती मनुष्यप्राणी बळी पडत असतात! पण हे अपघात — ही प्राणहानि — टाळण्याची युक्ति इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, वगैरे देशांतही कोणास सापडली नव्हती. ती सुदैवानें एका हिंदी गृहस्थास सांपडली आहे. पत्यालाच्या महाराजाचे एडिकांग सरदार रानाबाबू यांनीं एकाच रुळावरून समोरासमोरून येणाऱ्या दोन आगगाड्यांची टक्कर टाळण्याची युक्ति शोधून काढली आहे. या युक्तीचा प्रत्यक्ष प्रयोग पंजाबचे ले० गव्हर्नर लुई डेन याचे समक्ष करून पाहण्यांत आला व त्यावरून ही युक्ति उत्कृष्ट ठरली आहे असें 'गुजराथी' पत्राचा एक बातमीदार कळवितो. याच गृहस्थानें शोधून काढलेली युक्ति जरी इतकी सार्वजनिक उपयोगाची नाहीं, तरी तिच्यावरून त्याची बुद्धिमत्ता चांगली व्यक्त होते. बुद्धिबळें खेळतांना इंग्रजी पद्धती प्रमाणें ... मन कांही लागतें हें यंत्रानें आपोआप होतें जावें व त्यामुळें खेळणाराला अव्यवहित चित्तानें खेळ खेळतां यावा हा या यंत्राचा उद्देश आहे. या दोन्ही शोधांवरून हिंदी गृहस्थांत सुद्धां किती कल्पकता भरली आहे, आणि आळस व उत्तेजन यांच्या अभावीं आमच्या लोकांच्या बुद्धिमत्तेचा कसा ऱ्हास होत आहे याची उत्तम प्रकारें कल्पना करतां येते. प्रो० ..., किंवा सरदार रानाबाबू यांना पुढें येण्याला मार्ग नसावेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. पटयाळाचे महाराज पोलो वगैरे खेळण्याचे कामीं हजारो रुपये उडवितात. त्या खर्चाचा कांहीं अंश अशा उत्तेजनाचे कामीं खर्च करतील तर केवढें कार्य होईल!

---

औद्योगिक शिक्षणाला आधारभूत पाया म्हणजे सामान्य शिक्षण हा आहे ही गोष्ट कोणालाही कबूल केली पाहिजे. पण तो भरल्या नंतर खऱ्या औद्योगिक शिक्षणाचा विद्याखातेशीं जितका संबंध कमी येईल तितका उद्योग धंद्याचा उत्कर्ष होईल हें विधान सहृदयांनीं चमत्कारिक दिसतें खरें, पण अनुभवानें त्याची सत्यता सिद्ध झालेली आहे. विद्याखात्याचे डायरेक्टर हे सामान्य व उच्च शिक्षणाचे दर्दी असतात, पण औद्योगिक शिक्षणाचा गंध ही त्यांना नसतो; आणि अशा अधिकाऱ्याचे हातीं देशाच्या उद्योगधंद्याच्या उत्कर्षाची किल्ली देण्यांत येत असते. त्याचा परिणाम अनिष्ट झालाच पाहिजे. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या व औद्योगिक बाबतींत सर्वांच्या पुढें असलेल्या देशांचा ही हाच अनुभव आहे. या बाबतींत सुधारणा करण्याचें प्रेच सरकारनें मनांत आणिलें आहे. सामान्य शिक्षण व औद्योगिक शिक्षण हीं निराळीं काढून तीं निराळ्या अधिकाऱ्यांचे हातीं ठेवण्याची व्यवस्था युक्तिसमत आहे, मात्र ती हिंदुस्थानांत अमलांत येण्याला कित्येक युगें लोटलीं पाहिजेत.

---

### सेंट्रल हिंदु कॉलेज.

सध्या सरकारी कॉलेजांतून धर्मविरहित एकांगी — शिक्षण देण्यांत येत असतें. ही शिक्षण पद्धतींतली उणीव खाजगी प्रयत्नांनींच भरून काढली पाहिजे असें पाहून थिऑसॉफिकल सोसायटीच्या विद्यमानें मिसेस आनी बिझांट या परोपकारी बाईनीं अविश्रांत श्रम करून काशी येथें सेंट्रल हिंदु कॉलेज ही संस्था स्थापन केली, व आज १० वर्षें ती उत्तमप्रकारें चालवून इतर शिक्षणसंस्थांना उत्तम कित्ता घालून दिला. या नमुनेदार कॉलेजाची सांपत्तिक स्थिति स्पृहणीय नसावी, आणि आश्रयाच्या अभावीं सगळ्या हिंदुस्थानास ललामभूत असलेल्या या एकट्याच संस्थेला ओहटी लागावी ही गोष्ट दातृत्वाविषयीं प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेल्या हिंदुजातीस खास भूषणावह नाहीं. या कालेजांत अध्यापनाचें काम अनेक नामांकित विद्वानानीं अगदीं निरपेक्ष रीतीनें चालविलें आहे मि. अरंडेल, प्रो. पाटणकर, प्रो. तेलंग व दुसरे एकदोन पार्शी प्रोफेसर यांनीं स्वार्थत्याग करून या संस्थेला कसें आत्मसमर्पण केलें आहे तें सर्वांस विदित आहेच. अशा संस्थेचा दरमहा आठ हजार रुपयाचा खर्च उत्पन्नातून न भागतां दरमहा हल्लींप्रमाणें दोन हजार रुपयांची तूट येत गेल्यास ही संस्था ७।८ वर्षांत अगदीं नामशेष होण्याची आणि मिसेस बिझांट व ही अध्यापक मंडळी यांनीं आजपर्यंत केलेल्या श्रमाची निरर्थकता होण्याची पाळी येईल अशी भीति वाटते. इतक्या थराला गोष्ट येऊं देण्या इतका निःसत्त्व हिंदुसमाज आज खचित झालेला नाहीं असें आम्हांला वाटतें. हिंदुसमाज आळशी आहे, निरिच्छ आहे, अल्पसंतुष्ट आहे, दैववादी आहे, वगैरे काय वाटेल तें म्हणा, पण तो कृतघ्न आहे असें लांछन लावून घेणारा मात्र खास नाहीं, या संस्थेनें उत्तम प्रकारचें ऐहिक व पारमार्थिक शिक्षणाचें बीज हिंदु समाजात रुजत घातलें आहे, तें आज नाहीं कालांतरानें तरी फळास येईल, आणि आपल्या उपकारकर्त्या संस्थेचें ऋण फेडील असा आम्हांस भरंवसा आहे.

अशी स्थिति येण्याला काय कारणें झालीं असावीत या गोष्टीचा पूर्ण तपास केल्यावांचून आणि शक्य असल्यास रोगाचें बीज समूळ खणून काढल्या वांचून त्यांनीं राहूं नये अशी आमची त्यांस विनंति आहे. पुष्कळ वेळां प्रत्यक्ष खेळ खेळणारांपेक्षां प्रेक्षकांनाच खेळांतलें खरें मर्म चांगलें समजतें. सें. हिं. कॉलेज अप्रिय झालें असल्यास तसें होण्याचीं कारणें काय आहेत तीं त्या चालकांपेक्षां इतरांनाच ज्यास्त ठाऊक असतील. त्या कॉलेजांतल्या चालकांनीं विद्यार्थ्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा दाबून टाकण्याचा कधीं यत्न केला काय? विद्यार्थ्यांना राजनिष्ठेचा अतिरेकाचा डोस दिला नाहीं ना? हें हिंदु कॉलेज आहे. थिऑसाफिकल कॉलेज नव्हे, ही गोष्ट चालकांच्या दृष्टी आड झाली नाहीं ना? मि० लेड बेटर यांच्या संबंधानें मध्यंतरीं हिंदुसमाजांत खळबळ उडाली होती ते समयीं मिसेस बेझांटबाईंनें सदर साहेबांचें समर्थन केलें हें, त्यांच्याशीं सध्याच्या स्थितीचा कार्यकारणभाव नाहीं ना? वगैरे अनेक तर्ककुतर्क हल्लीं लोक करीत आहेत हे सगळे तर्क कदाचित् अनाठायी चुकले असतील; कदाचित् त्यांतल्या एखाद्यांत सध्याच्या अवनतीचें बीज छपून असेल. कांहींही असलें तरी चालकांनीं सत्यान्वेषणाचे दृष्टीनें तपास करण्यासाठीं ठळक ठळक हिंदु विद्वानांचें कमिशन नेमून या गोष्टींचा तपास करावा हें इष्ट आहे.

---

## टाटा सायन्स इन्स्टिट्यूट

कोलंबसाला अफाट समुद्रांत कित्येक महिने वादळाशीं झुंजतां झुंजतां स्वतःच्या जिवाचीही आशा सुटल्यावर ज्याप्रमाणें नव्या खंडाचें दर्शन होऊन अपार आनंद झाला, त्याप्रमाणें वाडीआनें १० लक्ष रुपयांची देणगी देऊन, आणि आज १२ वर्षें सरकारशीं मुलाखती घेऊन सिमल्याच्या पायऱ्या झिजविल्यानंतर बंगलोर येथें सायन्स इन्स्टिट्यूटच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविलेला पाहण्याचा सुयोग एकदाचा आलेला पाहून सर दोराबजी टाटा यांनाही अपरंपार आनंद झाला असेल यांत शंका नाहीं ज्यांना या संस्थेच्या कल्पनेचा आजपर्यंतचा इतिहास ठाऊक आहे त्यांना लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकीर्दीत या संस्थेच्या उभारणीच्या कामीं कशा अनपेक्षित अडचणी आल्या, व त्यांतून निभावतां निभावतां पहिलीं सात वर्षें कशीं तेव्हांच निघून गेलीं, पुढें मिंटो-मोर्ले यांच्या कारकीर्दीत इमारतफंडाकडे सरकारनें ३॥ लक्ष रुपये देऊन व अन्य प्रकारें मदत करून प. वा. टाटा यांच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा काल कसा जवळ आणून सोडला, म्हैसूरच्या महाराजांनीं प्रथम ३० हजार रुपये, व नंतर ५० हजार रुपये वार्षिक वर्गणी देण्याचें कबूल करून आणि इमारती संबंधानें उदारपणाच्या सवलती देऊन सायन्स इन्स्टिट्यूट सारखी संस्था आपल्या राज्यांत ठेवण्याचें श्रेय कसें घेतलें, वगैरे गोष्टी सांगण्याचें कारण नाहीं. या संस्थेच्या पुस्तकालयाचा पाया म्हैसूरच्या महाराजांचे हातून गेल्या महिन्यांत बसविण्यांत आला आता इमारतीचें काम झपाट्यानें सुरू झालें आहे. इमारती उभ्या राहण्याचाच काय तो अवकाश आहे, बाकीची सगळी व्यवस्था झालेली आहे. ही सगळी व्यवस्था गेल्या पाच वर्षांत मिंटो-मोर्ले यांच्या कारकीर्दीत झाली ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. या संस्थेनें हातीं घेतलेलें कार्य फार देशहितविषयाच्या कळकळीस माजणार आहे. त्या मानानें गेलीं १२ वर्षें तयारीस लागलीं यांत नवल नाहीं. पण यापुढें लॉर्ड हार्डींग यांच्या सारख्या सहानुभूति प्रेरित व्हाइसरायांच्या कारकीर्दीत या संस्थेच्या हातून झपाट्यानें देशकार्य होईल अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. वस्तुत अशी संस्था प्रत्येक इलाख्यास एकेक पाहिजे आहे, आणि टाटा इन्स्टिट्यूट हें अशा प्रकारच्या संस्थाचे मार्गदर्शी होऊन धार्मिक वर्ग व राजेरजवाडे यांना आपल्या धनाचा योग्य व्यय करण्याचा अत्यंत श्रेयस्कर मार्ग दाखविण्यास समर्थ होईल अशी आम्ही आशा करतों.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान– शिशिर ऋतूच्या उत्तरार्धाच्या मानानें थंडी नरम पुष्कळ व आरोग्य वर्धक अशी आहे. वारा चांगला जोराचा वाहतो व तो अंगाला झोंबत असतो. मागील सप्तकांतील कडक दिवसानें जीं पीकें न करपता जीव धरून राहिलीं तीं सुधारत चाललीं आहेत

प्लेग. १ ता० फेब्रुवारीला संपणाऱ्या आठवड्यांत बुलढाणा, उमरावती, व अकोला, या जिल्ह्यांत अनुक्रमें ३९३, २९२, व २२७ असे प्लेगाचे मृत्यु झाले. हळूं हळूं प्लेग कमी कमी होत आहे.

रा० रा० बार साहेब हे विलायतेहून मुंबईस परत आले असून या सप्तकांत येथील डिस्ट्रीक्ट आणि सेशन जजाचे जागीं दाखल होतील.

आणि राव बहादूर विनायक मोरेश्वर केळकर एम. ए. डिस्ट्रीक्ट आणि सेशन जज, अकोला यांची बदली नागपूर झाल्या अन्वयें ते तिकडे रवाना होतील राव बहादूर केळकर हे आज सुमारें ३॥ महिने येथें आहेत आणि इतक्या स्वल्प कालांत त्यांनीं आपल्या सौजन्यानें, गोड स्वभावानें, निस्पृह न्यायदृष्टीनें व कायदे पांडित्यानें सर्व पश्चिम वऱ्हाडचा भाग आपलासा केला हें कळविण्यास फार फार आनंद वाटतो.

रा. सय्यद फरुख हुसेन नायब तहशीलदार वर्ग १ हे सस्पेंड होते आणि आता त्यांस कायमचें कामावरून दूर केलें आहे.

### राज्याभिषेक.

हस्तिनापूर उर्फ दिल्ली येथें श्रीमान चक्रवर्ती जार्ज बादशहा यांस चालू सालच्या डिसेंबर १२ च्या सुमारास राज्याभिषेक व्हावयाचा आहे. हा अपूर्व प्रसंग पूर्ण होईल. श्री धर्मराजाच्या मागून हा कित्येक शतकांनीं हा अभिषेकाचा महोत्सव होणार आहे तेव्हां आमची सूचना अशी आहे कीं वेदोक्त मार्गानें प्रतिष्ठित विद्वान ब्राह्मणांच्या हातून हा समारंभ व्हावा इतकेंच नाहीं तर त्याच पुरातन क्रियेला, मदती व पाठिंबा या धर्माच्या पुरस्कर्त्यांच्या हातून यथाशास्त्र हा संस्कार करण्यात यावा. अशा धर्मरीतीनीं महोत्सवाला योग्य महत्व येतें आणि ईश्वरी अनार व आशीर्वाद संपादन करण्याचे हेच विहित मार्ग आहेत अशा सर्व धर्मांच्या द्वारें होणाऱ्या अभिषेकानें व त्यांचा विलक्षण प्रेम राजा व प्रजा यांच्या मध्यें उत्पन्न होईल ईश्वर करो आणि अंतःकरणें एका श्रेयीनें युक्त करण्याचा प्रयत्न यशस्वीनें युक्त होवो!

---

## सहकारी पतपेढी.

### लेख नंबर ६

सहकारी पतपेढ्यांची संख्या सर्व हिंदुस्थानांत सन १९०८ सालीं १३०० होती. ती १९०९ सालीं २००० झाली, व १९१० त ३५०० पर्यंत गेली. ही वाढ फार समाधानकारक आहे या पतपेढ्यांतील सभासदांची संख्या १९०९ सालीं १,८०,००० होती ती १९१० सालीं २३०,००० झाली. पेढ्याचें भांडवल ८० लाखचें १ कोटी ४ लाख झालें; व ठेवी १६ लाखाच्या होत्या त्या २९ लाख पर्यंत वाढल्या पतीच्या वाढीचें ही खरी साक्ष आहे.

आमच्या वऱ्हाडांत अकोले जिल्ह्यांत पतपेढ्या स्थापन झाल्या आहेत, त्यांची नांवें व स्थिति येणें प्रमाणें:–

| पतपेढी. | सभासद संख्या | ठेवी | सेंट्रल अर्बनबांकचें कर्ज | रिझर्व फंड. रु० |
|---|---|---|---|---|
| घुमर | ६२ | १२०० | ८२९ | ९६ |
| झातोडी | ४२ | १८४९ | १७६० | २०० अजमासें. |
| | शेरभांडवल | ठेवी | | रिझर्व फंड. |
| केळीवेळी | ९९ | ११०० ३१६९ | | ९७४. |
| पळसोद | | ७६० १९० | | ३९०. |

ठेवी १३६० च्या परत केल्या.

या दोन पेढ्यांतच शेर काढून भांडवल उभारलें आहे.

| | ठेवी | रिझर्व |
|---|---|---|
| गवान | ५०० | ३१·८ |

या पेढींत काम मुळींच चालत नाहीं. शिल्लक रु० ५४५ कांहीं भाग खजीनदाराच्या घरीं रिकामी पडली आहे.

| | ठेवी |
|---|---|
| पोघाट | ५०० |

येथें ही काम चालत नाहीं. शिल्लक ५३६ खजीनदारापाशीं आहे.

| पतपेढी | सभासद संख्या. | ठेवी. | सेंट्रलअर्बनबांकचे कर्ज. | रिझर्व. |
|---|---|---|---|---|
| पेडगांव | ३२ | ५०० | ३०० | ७८ |
| शेवती | | ३५० | ० | ९१ |

ठेवीची ही रकम परत केली. रिझर्वफंड खजीनदारापाशीं. तात्पर्य — पेढी चालत नाहीं, किंवा चालविण्याची इच्छा नाहीं.

| पतपेढी | सभासद संख्या. | ठेवी. | सेंट्रलअर्बनबांकचें कर्ज. | रिझर्व. |
|---|---|---|---|---|
| मेडशी | २९ | ५०० | १०० | |
| रिसोड | ९९ | १५९९ | २००० | २०८ |
| धानोरा | | ३५० | ७२९ | १०२ |

या शिवाय दोन पतपेढ्या आलेगांव व सस्ती येथल्या गेल्या सारख्याच आहेत.

पेढ्यांचें काम बारकाईनें तपासतां असें दिसून येतें कीं सभासदांनीं अमर्याद जबाबदारी जेथें घेतली, तेथें नांवालाच घेतली आहे असें दिसतें. कारण गरीब व गरजू सभासदांस कर्ज दिलें जात नाहीं. पेढीचे पंच अर्थात् श्रीमंत सभासद ठेवी परत करतात, नवीन घेत नाहींत. पेढीची रकम खजानजीपाशीं रिकामी पडूं देतात, अर्बन सेंट्रल बांक कर्ज देण्याला खुष आहे तरी नाकारतात. गरज लागल तेव्हा घेऊ म्हणतात. नाहीं तर कमी व्याजानें रकम दिली तर घेऊं म्हणतात, पण कमी व्याज पत पाहून देऊं, असें उत्तर सेंट्रल बांक कडून जातांच पुनः मूग गिळतात. पतपेढ्यांचा रिझर्व फंड अर्बन सेंट्रल बांक मधें ठेवावा, असा हुकूम आहे. तो अजून अमलात आला नाहीं. तात्पर्य पतपेढ्यांच्या अर्बन सेंट्रल बांकवर विश्वास अजून बसला नाहीं.

कांहीं पतपेढ्यांचें काम चालावें तसें शिस्तवार चालत नाहीं. कोठें वार्षिक सभा भरत नाहीं तेच ते पंच निवडले आहेत अशी समजूत आहे. कोठें काम सभासदांच्या देखत होत नाहीं कोठें कर्जाची मंजुरत दिपली नाहीं; कर्जाची रकम मंजूर झाली नाहीं; पावत्या वेळेवर दिल्या जात नाहींत. हिशेबांत ही चूक सांपडते. तात्पर्य, सेक्रेटरी कर्माचा धड, व विश्वासूक पाहिजे.

हल्लीं बाळापूर तालुक्यांत तीन चार ठिकाणी– पारस, गायगांव, व गोरगांव येथें पतपेढ्या स्थापन करण्याची वाटाघाट होऊन, एकीची मंजुरात आली. आणखी ही मंजूर होतील असें वाटतें त्यांचे तरी कसें चालतें तें पाहायाचें आहे.

हल्लींच्या पेढ्यांत [illegible] करण्याचा धडा शिकायास आरंभ नाहीं. अमर्याद जबाबदारी नामानें पत्करून कोणाला कर्ज दिलें नाहीं, तर सहकारिता कोठें आहे, व पत ही कोठें आहे? सध्या हिंदुस्थानचे वर आंकडे दिले आहेत, ते पाहून आमच्या वऱ्हाडी बंधूनीं जागे व्हावें, नाहीं तर ते मागेंच राहतील.

खुद्द मध्यप्रांतांत सुमारें १४० पतपेढ्या आहेत, सभासद सुमारें ६००० आहेत व भांडवल जवळ जवळ तीन लाख पर्यंत गेलें आहे.

---

जुने कवी व त्यांचे ग्रंथ यांचा समाज्ञ पद्धतीनें अभ्यास न करितां, तुटपुंज्या माहितीच्या आधारानें वाटेल तशीं विलक्षण विधानें करण्याची कित्येक लोकांस कशी संवय असते, हें गेल्या केसरींतील, रा. पराडकर यांच्या 'मुक्तेश्वरी भारत' या लेखावरून चांगलें व्यक्त होतें. रा. सावरकर नामक एका गृहस्थांनीं जुनराजवळ एका गृहस्थापाशीं मुक्तेश्वरी भारताची समग्र प्रत आहे तसें प्रसिद्ध केल्यावरून रा. पराडकर यांनीं ती प्रत पाहिली, व ती मुक्तेश्वरी भारताची समग्र प्रत नसून विष्णुदास नामा व मुक्तेश्वर या दोघांचीं १८ पर्वें एकत्र करून, ती प्रत तयार केली आहे, असें त्यास आढळून आलें. सदर प्रतींतलीं आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक हीं पांच पर्वें मुक्तेश्वरकृत असून बाकी तेरा पर्वें विष्णुदास नामाकृत आहेत व यावरून, मुक्तेश्वरांचीं जीं तेरा पर्वें उपलब्ध नाहींत, तीं स्वतः रचून विष्णुदास नामा यांनीं हा ग्रंथ पूर्ण केला, असें रा. विधान पराडकर यांना केलें; पण असें करण्यापेक्षां ज्या गृहस्थानें सदर प्रत लिहून काढली, त्यानेंच, मुक्तेश्वरांचीं पांच व विष्णुदास नामाकृत तेरा मिळून १८ पर्वें एकत्र करून, संपूर्ण मराठी भारताचा संग्रह केला असावा, असें अनुमान करणें अधिक सयुक्तिक नाहीं काय? विष्णुदास नामा यांनीं भारताचीं फक्त तेराच पर्वें लिहिलीं असें जर सिद्ध करतां आलें तर रा. पराडकरांचें विधान खरें आहे, असें म्हणतां येईल, पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, विष्णुदास नामा यांचें संपूर्ण महाभारत आज उपलब्ध आहे; अर्थात् मुक्तेश्वरी भारतांत कमी असलेलीं तेरा पर्वें रचून विष्णुदास नामा यांनीं तो ग्रंथ पुरा केला, ही कल्पना सर्वस्वी चुकीची ठरते. शिवाय, विष्णुदास नामा यांनीं मुक्तेश्वरी भारताचा उल्लेख आपल्या ग्रंथांत कोठेंही केलेला नाहीं. सुमारें १५० वर्षांपूर्वीं गोपाळ या नांवाचा एक कवि होऊन गेला, त्याच्या महाभारताचीं विराटपर्वापुढचीं १४ पर्वें व मुक्तेश्वरी भारताचीं पहिलीं ४ पर्वें मिळून अठरा पर्वें एकत्र करून तयार केलेली मराठी भारताची एक समग्र प्रत पंढरपुरास आहे, पण ज्या गृहस्थानें ही प्रत तयार केली त्यानें गोपाळकवीचीं पहिलीं चार पर्वें काढून टाकून त्यांच्या जागीं मुक्तेश्वरांचीं चार पर्वें घातलीं आहेत, अर्थात् विष्णुदास नामाकृत महाभारताप्रमाणेंच गोपाळ कवीनेंही समग्र भारतावर मराठी रचना केली आहे, हें उघड होतें. महाभारतावर लिहिलेले जुन्या कवींचे जे समग्र आज उपलब्ध आहेत ते येणेंप्रमाणें:-

१ मोरोपंती महाभारत.
२ विष्णुदास नामाकृत महाभारत.
३ माधवकृत महाभारत.
४ गोपाळ कवीकृत महाभारत.
५ नारायण नरहरकृत महाभारत.
६ श्रीधरकृत पांडवप्रताप.
७ रामचंद्रबुवाकृत महाभारत.

यापैकीं, मोरोपंत, श्रीधर यांचे ग्रंथ फार प्रसिद्ध असून विष्णुदास नामाकृत भारताचीं आदिपर्व व स्वर्गारोहणपर्व हीं दोन पर्वें छापून प्रसिद्ध झालीं आहेत. इतर ग्रंथ अप्रसिद्ध आहेत. याशिवाय, त्र्यंबक, नरहरि मोरेश्वर, जगन्नाथ, मुरारि, शंभुदास पद्मनाभ, कृष्णदास मुद्गल, शिवकल्याण, शुभानंद इ. कवींनीं भारताच्या कांहीं पर्वांवर मराठी कविता केलेली आढळते.

... रा. पराडकर यांनी सदरं खातें विष्णुदास नामा यांनीं 'जैमिनीअश्वमेध' रचिला असें म्हटलें आहे, तें बरोबर नाहीं. उदाराम कुळकर्णी यांचे संग्रहांत असलेल्या ७० अध्यायाच्या ज्या अश्वमेधाचा उल्लेख त्यांनीं केला आहे तो विष्णुदास नामाकृत नसून, नामापाठककृत होय; हा अश्वमेध, 'नामापाठकी अश्वमेध' या नांवानें प्रसिद्ध आहे. वामनपाठक व नामा पाठक या नांवाचे दोन सत्पुरुष केंदूर येथें होऊन गेले त्यांचा उल्लेख महिपतींच्या ग्रंथांत आढळतो. रा. पराडकरांची आणखी एक चूक झाली म्हणजे श्रीधरकृत अश्वमेधाचे २० अध्याय आहेत, असें त्यांनीं लिहिलें आहे ही होय. श्रीधरकृत अश्वमेधाचे अध्याय २७ नसून ९६ आहेत, हे ती. ग्रंथ रा. पराडकरांनीं उघडून पाहिला असता, तर त्यास कळलें असतें. अश्वमेधावर जे मराठी ग्रंथ उपलब्ध आहेत ते येणेंप्रमाणें:—

१ श्रीधरकृत
२ विप्रनारायणकृत
३ नामापाठककृत
४ कृष्णयाज्ञवल्किकृत

विष्णुदास नामा हा कवि अर्वाचीन दिसतो. ज्ञानदेवकालीन अभंगकार नामदेवाहून हा 'नामा' निराळा हें सांगावयास नकोच. परंतु अभंगकार नामदेवानींही आपल्यां पुष्कळ अभंगांत 'म्हणे विष्णुदास नामा' असा आपल्या नांवाचा उल्लेख केला असल्यामुळें, भारतकार 'विष्णुदास नामा' व अभंगकार 'विष्णुदास नामा' ही एकच व्यक्ति होय, असा पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. नामाकृत महाभारतांत कथाकल्पतरुकर्ते श्रीकृष्णयाज्ञवल्कि यांच्या नांवाचा उल्लेख आढळतो, यावरून हा नामा सुमारें १०० वर्षांपूर्वीं होऊन गेला असावा असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. उद्योगपर्वाच्या चवथ्या अध्यायांत, विदुरानें दुर्योधनास उपदेश केला आहे, त्या प्रसंगीं दासबोधातल्या ६० ओव्या विष्णुदास नामा यांनीं चोरून घेतल्या आहेत, असें रा. पराडकर म्हणतात; परंतु ज्यानें १८ पर्वें भारत सुमारें १०,००० ओव्यांत मराठींत आणिलें त्याला दुसऱ्याच्या ६० ओव्या चोरून घेण्याचें कांहीं प्रयोजन होतें, असें वाटत नाहीं विष्णुदास नामाकृत भारताच्या पांच दहा प्रति मिळवून त्या सर्वांत या ६० मिळतात कीं काय, हें पाहिल्या शिवाय या मुद्याचा एकदम निर्णय करून, कवीवर चौर्याचा आरोप आणणें अगदीं धाष्टर्याचें आहे, असें आम्हास वाटतें. केव्हां केव्हां असें होतें कीं, कवीचे वंशज, शिष्य किंवा त्याच्या ग्रंथांच्या प्रति करून घेणारे लोक त्याच्या ग्रंथांत मागाहून थोडीबहुत घुसडाघुसड करितात. एकनाथांच्या भावार्थरामायणांत, अहिमहिरावणाख्यानावर जो एक मोठा ३० ओव्यांचा अध्याय आहे, तो जयरामसुत नामक कवीनें मागाहून त्यांत घातला आहे, हें या बाबतींत एक मोठें उदाहरण आहे असो.

आतां मुक्तेश्वरी भारतासंबंधानें दोन शब्द लिहून हा लेख पुरा करूं. मुक्तेश्वरांचीं आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक हीं पांच पर्वें प्रसिद्ध असून, शांतिपर्वाचा थोडासा भाग उपलब्ध झाला आहे; यावरून मुक्तेश्वरांनीं संपूर्ण महाभारतावर मराठी रचना केली असली पाहिजे. हें अगदीं निर्विवाद सिद्ध होतें; इतकेंच नव्हे तर महाभारतानंतर हरिवंशही त्यांनीं लिहिला होता, निदान तो लिहिण्याचा त्यांचा विचार होता हें पुढील ओवी वरून उघड दिसतें.

...त ही हरिवंशी मोहत।
सपद लक्ष महाभारत।
मार्गी आख्यानें अतिअद्भुत।
सनत्सुजात गीतादि ॥११९

मु. महाभारत, आदिपर्व अध्याय १.

मुक्तेश्वरकृत मराठी भगवद्गीता, मूळेरुक्मांगद, रंभाशुकसंवाद व शतमुखरावणाख्यान हीं चार फुटकळ प्रकरणें, अनुक्रमें, भीष्मपर्व, उद्योगपर्व व शांतिपर्व या तीन पर्वांतलीं असावीं असें वाटतें व या वरूनही, मुक्तेश्वरांनीं १८ पर्वें भारत मराठींत लिहिलें, ही गोष्ट सिद्ध होते. हें समग्र भारत ज्या दिवशीं उपलब्ध होईल तो दिवस मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्याच्या योग्यतेचा होईल, व त्या दिवशीं इतर मराठी भारतांचें महत्त्व पुष्कळच कमी होईल यांत संशय नाहीं. पौराणिक ग्रंथांवर कविता करणाऱ्या मराठी कवींत, मुक्तेश्वराच्या तोलाचा दुसरा कवि नाहीं व त्याच्या महाभारताइतका सुंदर काव्यग्रंथ मराठींत दुसरा उपलब्ध नाहीं. मुक्तेश्वरांचें हें संपूर्ण महाभारत कधीं मिळेल तेव्हां मिळो, तों पर्यंत त्याच्या पांच पर्वांस दुसऱ्या एखाद्या कवीचीं तेरा पर्वें जोडून तो ग्रंथ पूर्ण करावा असें जर एखाद्यानें मनांत आणिलें, तर गोपाळ कवीचीं तेरा पर्वें त्यानें खुशाल उपयोगांत आणावीं, अशी आम्ही शिफारस करितों; कारण मुक्तेश्वरांचें अनुकरण करण्याचा गोपाळ कवीचा उद्देश जितक्या अंशांनीं सिद्धीस गेला आहे, तितक्या अंशांनीं दुसऱ्या कोणत्याही कवीचा तो उद्देश सिद्धीस गेलेला दिसत नाहीं. महाभारताशिवाय, मुक्तेश्वरांचें रामायण व हरिश्चंद्राख्यान हे दोन ग्रंथ प्रसिद्धच आहेत. यांशिवाय भागवत व भविष्योत्तर पुराण हे दोन ग्रंथ मुक्तेश्वरांनीं मराठींत आणिले असा लोकापवाद आहे. हे सगळे ग्रंथ मिळविण्यासाठीं शोधकांचे शोध चालू आहेत, व ते कधीं ना कधीं तरी सफळ होतील— वी निदान संपूर्ण महाभारत तरी उपलब्ध होईल— अशी आशा आहे.

---

## जाहिर नोटीस

सर्व शेट, साहुकार वगैरे लोकांस ह्या नोटीसीनें जाहीर करण्यांत येतें कीं शेगांव तालुके खामगांव जिल्हे बुलढाणा येथील शेत सर्वे नंबर २१९ एकर ९ गुंठे १८ आकार रुपये १६ सदर्हु शेत माझे वडीलोपार्जित असोन माझा चुलती नांवें सुंदर व बायेन बाई मर्द शामराव उर्फ देवराव देशमुख रा० शेगांव ता० खामगांव जि० बुलढाणा ह्या दोघींनीं मर्द झाबाजी इजला व्यवस्थापत्र लिहून देऊन सदर्हू वरील नंबरचें शेत लिहून दिलें आहे. सदर्हू शेत सदर्हू वरील दोन्ही माझ्या चुलत्या यांस माझ्याशिवाय कोणतेच प्रकारचें लिहून देण्याचें नाहीं करितां या नोटीसीनें मुद्दाम जाहिर करण्यांत आलें आहे कीं सदर्हू वरील नंबरचें शेत कोणीही सदर्हु माझी चुलती बायेनाबाई मर्द शामराव उर्फ देवराव देशमुख व निंबा मर्द झाबाजी ह्या दोघींपासून कोणतेच प्रकारचे सदर्हू वरील नंबरचे शेताबद्दल देवघेव वगैरे करूं नये केल्यास ती सर्व बातल व खोटी समजली जाईल कळावें ता० ४,२,१९११.

सही

१ सदु उर्फ बळवंतराव उर्फ रामराव देशमुख. रा० शेगांव ता० खामगांव

नो० नं० ७३ नि० खु० आंगठा.

---

## नोटीस

रा० वसंतराव अमृतराव देशमुख रा० पातुर यांसः—

चंद्रभागा जवजे नारायणराव नोटीस देते कीं म्यां तुम्हांस कुलमुखत्यारपत्र लिहून नोंदून दिलें. त्याप्रमाणें तुम्ही आमचे कामकाजाची बरोबर व्यवस्था केली नसून पुढें ही उमेद नाहीं. सबब मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. याची समज घेऊन ती मिळाल्याचा जबाब द्यावा. कळावें तारीख ९ २ ११ इ.

सही

चंद्रभागा जवजे नारायणराव देशमुख रा० पातुर ता० बाळापूर निशाणी खुद

नो० नं० ७४ आंगठा.

---

## जाहिर नोटीस.

रा. रा. गंगा भागिरथी सारजाबाई मर्द उकंडजी वानखेड जात कुणबी राहणार रोकड्याची किन्ही प्रगणे कारंजा तालुके मूर्तिजापूर यांस खाली सही करणार गोविंदा वा॥ रायसींग वानखेड जात कुणबी राहणार मौजे मजकूर यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे मलकापूर येथील शेतें ४ व मौजे किन्ही येथील शेतें ३ व मौजे कोठारी येथील शेत १ या शिवाय जंगम माल बैल ८ हशी २ वगारी ४ घोडा १ व आणखी घरांत असलेला माल माझा बाप, माझा वडील चुलता उकंडजी व धाकटा चुलता विठूजी या त्रिवर्गांनीं एकत्र राहून समाइकींत संपादन केला आहे. परंतु ते तिघे ज्या वेळेस मैत झाले त्यावेळेस मी व माझा धाकटा भाऊ अज्ञान असल्या कारणानें तुझी आमचे मालकाचे जंगम आणि स्थावर इस्टेटीची अफरातफर केली आहे व करूं लागले आहेत. परंतु वास्तविक पाहतां तुझाला कायद्यानें आमची इस्टेट अफरातफर करण्याचा मुळींच अधिकार नाहीं. फक्त तूं अन्नवस्त्राची मालकीण आहेस. सबब या नोटिसीनें तुझाला जाहीर करण्यांत येतें कीं तुझी आमचे इस्टेटीची गैरकायदेशीर अफरातफर केल्यास तुझावर रीतीप्रमाणें फौजदारींत अगर दिवाणींत काम चालवूं. पुढें तुमची कोणत्याच प्रकारें तकरार एकिली जाणार नाहीं. याचप्रमाणें सर्वत्र लोकांस या नोटिसीनें जाहीर करण्यांत येत आहे कीं सारजाबाई मर्द उकंडजी वानखेड राहणार रोकड्याची किन्ही प्रगणे कारंजा इजला कोणी कर्ज वगैरे देऊं नये व आमची शेती वगैरे गहाण ठेवून घेऊं नये कारण कीं सदरहू सारजाबाई हिची आमच्या स्थावर किंवा जंगम इस्टेटीवर कोणत्याही प्रकारची मालकी नाहीं. या इस्टेटीचे आम्ही पूर्ण मालक आहोंत. करितां सदरहू सारजाबाई इजला कोणी कर्ज वगैरे दिल्यास किंवा आमचा माल गहाण, वेची वगैरे घेतल्यास त्याची जबाबदारी आमचेवर किंवा आमचे मालावर मुळींच येणार नाहीं. व तिजला जे कर्ज देतील त्यांचें नुकसान होईल. या करितां मुद्दाम जाहीर नोटीस दिली आहे.

ता. ६।२।११
मु अकोला.

सही

गोविंदा वा॥ रायसींग वानखेड कुणबी

नो० नं० ७६ दस्तुर खुद

# व-हाड नागपुर (विभागातील) नेते व कार्य

## I काँग्रेस संघटनेतील

(व.) — जिल्हा अमरावती
(१) सर मोरोपंत जोशी. (समाजसुधारणावादी)
अमरावती.
(२) दादासाहेब खापर्डे " — (टिळकवादी-प्रति सहकारवादी.
(३) रंगनाथ नरसिंह मुधोळकर "
(४) वीर वामनराव जोशी. (७) डॉ. पंजाबराव देशमुख
(५). नानासाहेब वामण गावंडर " (८) अप्रबुद्ध-पालेकर

जि. यवतमाळ (६) तपस्वी बाबासाहेब परांजपे.
(६) लोकनायक बापूजी अणे
जि. अकोला – बियाणी — ता. अकोला — देवरावबाबा पुंडलिक / महाजनी. (आर्हेत) योग्येश्वर
जि. बुलढाणा

(ना.) — (१) सर बिपिन कृष्ण बोस. (नेमस्तातील नेमस्त) नागपूर.
(२) डॉ. बा. सि. मुंजे - (पुढे हिंदूसभा)
(३) डॉ. हेडगेवार. (पुढे रा. स्व. संघ).
(४) गोळवलकर गुरुजी.
(५) नरकेसरी अभ्यंकर.
(६) डॉ. ना. भा. खरे.
(७) जनरल मंचरशा आवारी.
(८) आर. एस. रुईकर.

## II काँग्रेस संघटने बाहेरील (राजकीय चळवळी)

(अ) क्रांतिकारकांची माहिती (विदर्भ-नागपूर विभाग)
(ब) लालसेना - (क) डॉ. खानखोजे इ.

## III काँग्रेस बाहेरील (सामाजिक-आर्थिक चळवळी)

(१) सत्यशोधक - ब्राह्मणेतर चळवळी
(२) गांधीवादी नेतृत्व — विधायक कार्यकारी संघ - सर्वोदयवादी { हरिजनसेवा, ग्रामोद्योग - खादीसंघ
(३) दलित विचार आणि नेतृत्व. (४) शेतकरी संघ (५) मजदूरसंघ.

---


व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल या कडील आनररी असिस्टंट सर्जन ... डॉ. विश्राम ... यांनी आमच्या औषधें ... बरेच हल्ली ... आमची औषधें ... गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट ... दिलें आहे. हे अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत ... औषधांचा गुण ...

... कारखाना आज सतत १५१२० वर्षे अव्याहत सुरू असून ... झाले डाक्टरांनी सर्टिफिकेट दिलें, ... औषधांनी कल्याणाची ग्राहक ... मुक्त झाले व नित्य होत आहेत ... अत्यंत हितकारक आहे. ... हजारों ... जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी ... व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, ... गुणकारक आहेत. तीन सर्वांनी वापरावी, एकवार अनुभवानेंच खात्री ... संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन ... गावठी ... गुणकारक ... येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य
... जि. रत्नागिरी.

... नोटिस ... ता. १६-२-११ इ.
सही
मुश्री मर्द ... राहणार ...
ता. बाळापूर पेठ
नो. नं. ७९ बाळापूर जि. आंगठा

### जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, काही दिवसापूर्वी ... देवलाल ... राहणार मलकापूर या नावच्या इसमास आमचे ... कोर्टांत काहीं ... कामें करण्या संबंधानें ता. २९।४।१० ... मुखत्यारपत्र दिलें होतें. ... आमच्या कामांत घोटाळा करून ... मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. सदरहू ... देवलाल यांच्याशीं कोणीही आमच्या संबंधानें आमचा मुखत्यार म्हणून कोणत्या-ही प्रकारचा व्यवहार करूं नये. हें सर्वां-स जाहिर करण्यासाठीं ही जाहिर नोटीस देत आहों.
सही
विष्णुशा बाळकृष्णशा दस्तूर खुद.
नो. नं. ७८

### जाहिरात

... फल—प्रत्येक महिन्याचे फलादेश ... मालूम सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= ... काल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.
पत्ता— भा. गो. पंडित,
मु. व पो. ... प. खानदेश.

... कारक पदार्थ अगदीं नमून, पुष्कळ ... असंख्य सर्टिफिकीटें आहेत. ... खाक, गुटिका, ... मिळतात. ... प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचें निदान चिकित्सा कळवूं.

### अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समान ... आळशी बनल्यामुळें ... केला त्यांचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून ... आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ... आमच्या ... गावांतून ... पूर्णावस्थेंत ... नवीन जाहिराती सुरू होत आहेत. ... निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. ...

सही
चांदखी मर्द हयातखां
नि. खुद हातची.
नो. नं. ८०

### नोटीस

नोटीस बेशर्मी— धनाजाण्या बलद मुसा ... राहणार सांगवी लहानी ता. अकोलें यासः— खालीं सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं, भी बारा महिन्यां पासून ... घरीं आहे. ... रोग झाला आहे त्यामुळें

दिलें आहे. हे अवश्य लक्षांत ठेवावें

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शमांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊन त्याचे मर्जीप्रमाणे आणखी एखादें औषध घ्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक, मनोल्हाहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ठ होण्याकरितां या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उष्णतेनें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप शुक्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, मळ पाय अर्धांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य हस्तपादशूळ, मुळव्याध, वातरोग, निद्रानाश पित्तज्वर, वाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मर्दमैथुनानें आलेली क्षीणता इत्यादि अनेक विकार नाहींसे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती, भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्ध वृद्धि, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांचेवर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानवर्ग मोफत दिला आहे. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः—एकदम ३१ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० १२५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २०५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—नेत्रांचे सर्व विकार दूर होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या दबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुल्लाव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें मिळत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूडः—दंतसंबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें पुडया ३ तो० ८ आणे

६ गजकर्ण—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु० ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत १० पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं ठेवावें गोळ्या, मलम, वात वाढू नये म्हणून सावध मात्रा देऊन पाहा. एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेल, परोपकारार्थ माफक किं० २ आणे रु० डि०

९ सामानाचा मोठा कॅटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पुष्कळ खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत यांशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवें, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्च सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोकीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचा निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरू केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावी आमचे जाहितीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आम्हांस निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली धोरणी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारी रीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उन्नतावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीस यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचीच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागवावीं ती खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- मं. १

नो. नं. २४

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

## नोटीस.

नोटीस बेशमी १ महमद हुसेन व २ सेख आमद वा॥ शाबुदीन कुनेवाले दा॥ मलकापुर यासी खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं मौजे कान्हेरी गवळ्याची ता० बाळापुर येथील सर्वे नं० ४९ एकर ३० गुंठे ३४ आकार ३७ ही जमीन माझे मालकीची असोन ती तुम्हास वहीतीस बटाईनें दिली, त्या सेतांतील गुदस्त सालचा आमचा बटाईचा माल आम्हास तुम्ही दिला परंतु यंदाच सालचा माल तुम्ही आम्हास दिला नाहीं. पुष्कळ वेळा मागितला असतां तंटा करण्यास सिद्ध होऊन माल देत नाहीं असें म्हणाला व माझे ऐकण्यांत असें आलें कीं माझे मुलास फंद देऊन सदरहु शेत तुम्ही त्याजपासून खरीदी घेणार असें समजलें परंतु ही इस्टेट माझे बापाची आहे. मी असतांना मुलीस देण्यास अधिकार नाहीं जर करितां मजला न कळतां मुलाच्यानें कोणी जमीन खरीदी घेतल्यास तो जबाबदार होईल. व तुम्ही जरी घेतली तरी तुमच्यावर खोटें काम केल्याबद्दल जबाबदारी राहील व पोकळीस होईल. तुम्ही खरीदी घेऊं नये करितां या नोटिसीनें कळविण्यांत येत आहे कीं ही नोटीस पावतांच आमचा बटाईचा निम्मा माल आणून द्यावा व पावती आमची घ्यावी, व आतां पुढें शेत मी तुम्हास देत नाहीं. तुम्ही वखर वगैरे त्यात नेऊं नये, व आमचे आंब्याचीं झाडें आहेत. त्याजवर मी रखवालदार ठेवला आहे. त्याशीं तकरार वगैरे करूं नये, जर करितां, तकरार केल्यास. व आमचा माल आम्हांस आणून न दिल्यास, मग मात्र रीती प्रमाणें सरकारमार्फत आम्ही तजवीज करूं. हें पक्कें समजावें. ता० १६।२।१९११ इ०.

सही

चांदबी मर्द हयातखां

नि० खुद हातची०.

नो० नं० ८०

## नोटीस

नोटीस बेशमी— धनाआप्पा वलद सुभानआप्पा लिंगाईत वाणी राहणार सांगवी लहानी ता० अकोलें यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी बारा महिन्यांपासून आपल्या आईबापाचे घरीं आहे. तुम्हास रक्तपित्ताचा रोग झाला आहे त्यामुळें आमची प्रकृती फार बिघडलेली आहे व अपेक्षा ज्यास्तही बिघडण्याचा संभव आहे तुम्हास आपसांत फारकती बद्दल ४।५ वेळां अठलें असतां फारकत देतों देतों म्हणून आज पर्यंत टाळाटाळ केली. अजून फारकत दिली नाहीं. करितां आतां या नोटिशीनें कळवितें कीं, ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत तुम्ही फारकत द्यावी व माझा बारा महिन्यांचा खावटीखर्च रुपये ६० मला द्यावे. म्हणप्रमाणें न केल्यास ही फारकत समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करून आपला संसार करीन. मग तुमची कोणतेच प्रकारची तक्रार व हक्क राहणार नाहीं. खावटीचे रु० ६० न दिल्यास योग्य कोर्टांत दावा करून व्याज कोर्ट खर्चासह व नोटीस खर्च भरून घेतला जाईल कळावें ता० १६ २-११ इ०

सही

भुरी मर्द धनाआप्पा लिंगाईत

वाणी राहणार चिंचोली गणो

ता० बाळापूर पोष्ट

नो० नं० ७९ बाळापूर नि० आंगठा

## जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, कांहीं दिवसांपूर्वी आम्हीं त्र्यंबक देवलाल कलाल राहणार मलकापूर या नावच्या इसमास आमचे तर्फे कोर्टांत कांहीं दिवाणी कामें करण्या संबंधानें ता० २९।४।१० रोजीं मुखत्यारपत्र दिलें होतें. त्यानें आमच्या कामात घोटाळा करून दैशाची अफरातफर केल्याचें आणि अधिकाराबाहेर मालकांस न कळूं देतां कांहीं कामें केल्याचें दिसून आल्यावरून त्याचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. सदरहू त्र्यंबक देवलाल यांच्याशीं कोणीही आमच्या संबंधानें आमचा मुखत्यार म्हणून कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. हें सर्वांस जाहिर करण्यासाठीं ही जाहिर नोटीस देत आहों.

सही

विष्णुसा बाळकृष्णसा दस्तूर खुद.

नो० नं० ७८

## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलादेश लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,

मु० व पो० लोणखेड प. खानदेश.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बल्लाळ फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवपेठमधील छापून प्रसिद्ध केलें.

अर्थात आमच्या म्युनिसिपालिट्या कळ अंशानें कळसूत्री बा ल्यासारख्या कारी अंमलदारांच्या तंत्रानें कामें करीत आत, यांत नवल नाहीं. इंग्लंडांतले निक स्वराज्य व इकडचें स्थानिक स्वराज्य यांतला हा मूलगत भेद विसरून चालावयाचें नाहीं. दुसरी गोष्ट आमच्या इकडे यांना सार्वजनिक संस्थांचा कारभार लोकांना मोकळेपणानें चालवितां येत नाहीं अशी ओरड , आणि अमदाबाद, धरणगांव, वगैरे म्युनिसिपालिट्यांच्या कामाचे जे प्रकार यावर आले त्यांवरून ती ओरड निरर्थक असेंही वाटतें. पण इंग्लंडांतही जवळ-ळ अशीच स्थिति आहे. तेथें स्थानिक संस्थांना पूर्वी अधिक स्वतंत्रता असे; पण स्वतंत्रतेचा दुरुपयोग होतो अशी शंका यावरून सरकार आतां त्या स्वतंत्रतेचा संकोच करूं लागलें आहे.

इंग्लंडांतल्या स्थानिक स्वराज्यांना जें मोठें महत्त्वाचें काम करावें लागतें तें गरिबांना मदत करणें व त्याचे दुःख कमी करणें हें होईल असे कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणें हें होय. गरिबांच्या संबंधाचे कायदे कर तेथील लोकांनी ... केलें आहे, आणि त्या नियम ... करण्याच्या दिवसें दिवस ... चाहेर पडत आहेत. ... करून गरिबांची स्थिति ... ती सुधारली आहे काय? तर नाहीं. १९१० सालच्या रिपोर्टावरून पाहतां दिसतें कीं इंग्लंडांत ... लक्ष गरिबांना मदत देण्यांत आली ... लक्ष लोकांना राहण्याला ... नव्हती, व जवळ जवळ ... लक्ष ... इस्पितळांत किंवा ... आश्रमांत राहत होते. विलायतेंत सध्या ... २३१ जण भिकारी आहेत ... सालीं हें प्रमाण शेकडा २६ ... सन १८८३ सालीं वेडे आणि ... अनाथांची संख्या ७१३८२ होती. ... आज ११९७८९ म्हणजे दोढीवर ...!

... गरिबांना मदत करण्यामाठीं ... आणि वेल्स मिळून १४७१७०९८ ... खर्च झाले, पैकीं ११ कोट पौंड ... करांच्या रूपानें आलेल्या रक्कम दिली बाकीचे रुपये सरकारी खाते ... देण्यांत आले.

... इकडे म्युनिसिपालिट्या गरिबांच्या कोणत्या कामाच्या सोयी करतात, त्यांच्या ... वेगळे कायदे तरी कोणते आहेत, गरिबांच्या मदतीसाठीं म्युनिसिपालिट्या त्यांच्या उत्पन्नांतून किती रकम खर्च करतात, व त्यांना स्थानिक सरकारांतून ती रकम मिळते याचा अदाव ... कोणी काढील व तो इंग्लंडच्या रिपोर्टातल्या ... आंकड्यासमोर मांडील तर हिंदुस्थानच्या ... स्थितीवर पुष्कळ प्रकाश पडेल.

## अश्रद्धेच्या मागोमाग अंधश्रद्धा.

हिंदुस्थानांत इंग्रजी शिक्षण नव्यानेंच ... झालें, तेव्हां नवे सुशिक्षित लोक ... धर्मविरोधी अश्रद्ध होऊन त्याचा ... होऊं लागले. काळांतरानें ती स्थिति ... पण ती नाहींशी झाली ... ती स्थिति ... नाहीं. कारण, अश्रद्धेची जागा ... आहे. ... हे आहे. वेकननें आपल्या निबंधांत म्हटलें आहे—'ईश्वर नाहीं असें म्हणणारे नास्तिक पत्करले; पण ईश्वराचें अस्तित्व कबूल करून त्याच्या स्वरूपाविषयीं भलभलत्या कल्पना करणारे समाजाचें अधिक नुकसान करतात. धर्मश्रद्धेचा प्रकार असाच आहे. सध्या हर्षे यानें उठावें आणि बुवा बनावें त्याचा शिष्यसंप्रदाय फुगविण्याम ... शेकडों बी. ए. एम. ए. पदवीधर आपले तयारच! या विद्वानाचे ठायीं अंधश्रद्धा इतकी प्रबळ झाली असते कीं कोणत्याही गोष्टीचें परीक्षण न्यायशास्त्राच्या व्यावहारिक दृष्टीनें करण्याची पात्रताच त्यांचे ठायीं उरत नसते. या संबंधानें पामपूरम मुक्कामीं डॉ० भांडारकर यांनीं केलेली मीमांसा अगदीं रास्त आहे. ते म्हणतात कीं पूर्वीच्या अश्रद्धेची ही प्रतिक्रिया आहे. मनुष्याचे ठायीं साहजिक श्रद्धा पाहिजे. अश्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचा मध्य तो मार्ग आहे. पूर्वी बौद्धधर्माचे वेळीं कोणी पंच ... साधनादिकांच्या द्वारें शरीरास कष्ट देण्यांतच धर्माचरण मानीत असत, कोणी 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' अशा खुशालचेंडू मार्गाचा अवलंब करीत. बुद्धानें माध्यमिक संप्रदाय काढून आणि सदाचाराचा मध्यमिक मार्ग लोकांना दाखविला. तसें श्रद्धेच्या बाबतींत मध्यम मार्ग स्वीकारून आनंद व शांति यांचें सुख अनुभविलें पाहिजे. सध्या जो मार्ग सुशिक्षितांनीं धरावयास पाहिजे तो अश्रद्धेचा नव्हे व अंधश्रद्धेचाही नव्हे, तर अनुभवाचा मध्यम मार्ग पाहिजे.

## जैनपरिषद

ता० ७।८।१२ रोजीं सांगली येथें जैनपरिषद व स्त्रियांच्या कौशल्यकामाचें प्रदर्शन ही भरविलेलीं होतीं. प्रदर्शन उघडण्याचा समारंभ सांगलीच्या श्री० राणीसाहेबांच्या हस्तें झाला. त्यावेळच्या आपल्या भाषणांत त्यांनीं सांगितलें कीं 'प्रदर्शन फक्त जैन स्त्रियांपुरतेंच न ठेवतां इतर समाजाला ही त्याचा लाभ घडावा ही योजना फार स्तुत्य आहे.' परिषदेच्या बैठकींत श्री० अप्पासाहेब सांगलीकर यांचें ही भाषण झालें. ते म्हणाले कीं "जातिजाती, वर्गवर्ग, व धर्मधर्म यांच्यामध्यें सहानुभूति, व सहिष्णुता ठेवून सलोख्यानें काम करण्याचें वळण आम्हां लोकास लागणें अवश्य आहे आपण सर्वांनीं आपापल्या पुरता विचार न करतां सर्वांनीं सर्वांच्या हिताचा विचार करावयास पाहिजे" हे उदार विचार अल्पवयांत श्रीमंताचे ठिकाणीं पाहून आम्हांस संतोष होतो.

## बर्कला मज्जाव!

क्रियेमागून प्रतिक्रिया होणें हा सृष्टीचा नियमच आहे. थोड्या दिवसांपूर्वी बंगाली लोकांना बहिष्कार हा शब्द अत्यंत प्रिय होऊन बसला होता त्याच बहिष्काराच्या प्रयोग त्यांच्यावरच होऊं लागल्याबरोबर त्याचे डोळे उघडूं लागले! आमच्या इकडे टाइम्स ऑफ इंडिया, किंवा कलकत्त्याचें 'इंग्लिशमन' वगैरे आंग्लोइंडियनपत्रें 'हिंदुस्थान' या शब्दाचा अर्थ आंग्लोइंडिया असा संकुचित करून मनाचा कोते पण व्यक्त करूं लागली तेव्हां त्यांना बहिष्कार घालावा अशी एकच ओरड पुष्कळांनीं केली. केवळ तोंडची वाफ दवडण्यापलीकडे आमच्या लोकांच्या हातून काही झालें नाहीं. पण त्याची प्रतिक्रिया ... वाढी झाल्या ता बंगाली तरुणांना प्रिय. त्यांचे ग्रंथ तरुण मोठ्या उत्सुकतेनें वाचीत, आणि बेळींअबेळीं अर्थ न समजतां त्या ग्रंथांतली अवतरणें घेत, हें पाहून कायदेपंडितांनीं बर्कचे ग्रंथ शाळेंतूनही दूर काढण्या यत्न ठाकले! बिचारे कायदेपंडित! बर्कच्या ... ते ग्रंथ व ... कोणता ... होता कीं ... बर ... करीत होता हें पाद ... कायदेपंडितांनीं बर्कचा ... ठरवितात कलकत्ता युनिव्हर्सिटीनें ... यांत काय नवल आहे? ... मुंबई युनिव्हर्सिटीला ... कीं ... अर्थशास्त्रा वरील ... मुंबई युनिव्हर्सिटीतून अचानक 'खो' मिळाला, मग बर्कचें फ्रेंच रेव्होल्यूशन हें तर बोलून चालून क्रांतिविषयक पुस्तक! अत प्रतिपादन काय केलें आहे हें पहाण्याची तसदी घेण्याचें कारण काय? 'नाकात काय आहे?' गुरु बाला दुसरें नांव दिलें तरी त्याचा सुवासाचा बहार कायमच राहणार' हें सतराव्या शतकांतलें श्रुतिवाक्य या विसाव्या धामधुमीच्या शतकांत सर्व राहण्याची अपेक्षा करणें यासारखा दुसरा वेडेपणा कोणताही नसेल. सध्याच्या काळांत नांवांतच सगळ जादू भरलेली असते. 'कालस्य गहना गति.'।

## येऊं पाहणारें नवें संकट.

इकडे ना० गोखले व्हाइसरायसाहेबांचे कौन्सिलांत आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर हिंदुस्थानांत होणाऱ्या फाजील खर्चाचें गाऱ्हाणें यथार्थ आहे अशी सरकारी अधिकाऱ्यांकडून कबूली घेतात न घेतात तों दुसरीकडून एक नवें संकट डोकावून पाहूं लागलें आहे. लवकरच साम्राज्यविषयक प्रश्नांची चर्चा करणारी कान्फरन्स विलायतेंत भरावयाचे आहे व त्यांपुढें साम्राज्याच्या रक्षणाचा मोठा प्रश्न मांडला जाणार आहे. जपाननें रशियावर विजय मिळविला व कोरिया घशाखालीं उतरविलें; चीनमध्यें जागृति होऊं लागलीच आहे. इराण व मध्य आशिया यांत रशियाचें कारस्थान सुरूच आहे; युनैटेड स्टेटस व कानडा यांच्यांत व्यापारी तह होऊं घातला आहे. अशा अनेक गोष्टींमुळें इंग्लंडला आपल्या साम्राज्याच्या बचावाची भीती वाटूं लागली आहे. पासिफिक महासागरांतलीं आशियाटिक राष्ट्रें युरोपियन राष्ट्रांशीं खलबतें करून आपणास केव्हां अडचणींत घालतील याचा ... आहे, म्हणून पासिफिक महासागरांत ... आहे, व ... हिंदुस्थान, ... व न्यूझीलंड ... आरमार ... ठेविले ...

... होण्याची ... पाचें झाल्यें ... सरकारी अधिकाऱ्यांनीं ... कबूल केलें तरी ...

नाहीं असें नवें बजेट करण्याचे ठरलें हांग ... यांत येईल आणि पासिफिक महासागरांतल्या इंपीरियल आरमाराच्या खर्चा ... नवी वर्गणी मात्र हिंदुस्थानावर ... ... यांत येईल ... पुढें हा प्रश्न निघेल तेव्हां हिंदुस्थान सरकार ... आपली बाजू पुढें मांडील तर काहीं निभाव लागेल; नाहीं तर बिचाऱ्या हिंदुस्थानाचें पाठीवर आणखी एक खर्चाची गोणी घेण्यास तयार झालें पाहिजे.

## अबबब! केवढा खर्च!

हिंदुस्थानांत ५२ लक्ष साधु, वैरागी, फकीर वगैरे आहेत, आणि त्यांच्या खर्चासाठीं हिंदुस्थानच्या दारिद्री प्रजेला दरमहा अदमासें कोट म्हणजे वार्षिक ३० कोट रुपयांची रक्कम द्यावी लागत आहे असा एका विलायती माणसानें अदाज केला आहे. आळशी, भोंदू, निरुद्योगी, व निरुपयोगी, अशा लोकांना पोसण्यासाठीं इतका पैसा खुषीनें खर्च करणारें वेडें राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवर हें येवढेंच असेल! येवढी रक्कम सार्वजनिक उद्योगधंदे, कारखाने वगैरेच्या उन्नतींत घातली तर किती कारागिर आणि मजूर यांचें पोट चालेल! आंधळे, लंगडे, पंगु वगैरे अनाथ लोकांकरितां अनाथालयें चालविण्यांत जो पैसा खर्च होतो तो सरकारणीं तरी लागतो. पण हे वार्षिक ३० कोट रुपये आणि तेही फक्त ५२ लक्ष निरुद्योगी, आळशी पिंड पोसण्यासाठीं खर्च करणाऱ्या हिंदुस्थानाला ऐहिक किंवा पारमार्थिक लाभ कोणता घडत असेल तो 'ईश्वरो वेत्ति.'

# वऱ्हाडवृत्त.

हवामान— आकाश निरभ्र, हवा शीतोष्ण, व दिवसा कडक ऊन यांनीं सार्वजनिक आरोग्य लवकर सुधारण्याची आशा वाटते. रब्बीची पीकें रुपयांतली ८ आणे देखील हातीं येणार नाहींत.

प्लेग— ८ फेब्रुवारी पर्यंतच्या सप्ताहांत बुलडाणा, उमरावती व आकोला या जिल्ह्यांतील प्लेगाचे मृत्यु अनुक्रमें २२२, २१४, व १५९ असे आहेत. प्लेगाचें मान उतरत्या प्रमाणावर आहे.

रा. रा. डब्ल्यू. जी. रेडनी ए. अ. कमि. यवतमाळ यांस वाशिम येथें सब डिव्हिजनल आफिसर नेमून रा. रा. सैफुद्दीनखान ए. अ. कमि. यांस वाशिमाहून यवतमाळास बदललें.

रा. रा. मिरझा गुलाम नबीबेग नायब-तहशिलदार चांदूर यांस आफि. तहशिलदार करून आकोला येथें नेमिलें.

रा. रा. नारायण गमराव गुंते तहशिलदार यांस दर्यापूर येथें बदललें. व त्रिम्बक नारायण तारे यास पुनः आपले नायबतहशिलदारीचे जागेवर पाठविलें.

व्याख्यानः— गेल्याचे मागील शुक्रवारीं सायंकाळीं उमरावती येथें सर्व्हंट ऑफ इंडियाचे सभासद नरेश आपाजी द्रविड एम. ए. यांचें ना० राव बहादूर मुधोळकर यांचे अध्यक्षते खालीं मुद्दाम्य व्याख्यान झालें. आपल्या देशाचे प्रगती साठीं आपल्या इकडील व बाहेरच्या देशस्थितीचा सांगोपांग अभ्यास करून, या कामालाच आपला देह वाहणारांची किती जरूरी आहे हें त्यांनीं सांगितलें. रा. नरेशराव हे याच अभ्यासासाठीं लवकरच विलायतेस जाणार असून तेथून परत आल्यावर वऱ्हाड प्रांतांतच ते सार्वजनिक कामांत पुढाकार घेणार आहेत.

केळीवेळीं येथें ता० २३ फेब्रुवारी पासून ... सभेत सुरवात होणार आहे.

…र आनंदका सागर रगा तक द्वारा सहित चारों भाग तथा पांच अंग

## रुचित्र कोख शास्त्र.

अगली इसमें सगाई धोकस बची स्त्री पुरुषोंक जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनयका, कुमारी प्रकृती, सत्य दूती, कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिकी पेहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार समय, सहवास स्थान क्रम, वैद्यान्तध, कामन्धान, सोआगिनार, वतीसोअ भूशण, वाजन अदिगमन पुत्रउदीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आद अनेक रोगोकी चिकित्सा औषधे, पशु भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रा विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा नं० नं० ७७ अलीगड सिटी.

## भक्तिवात्सल्य नाटक

### अंक ५ वा.

### प्रवेश तिसरा.

स्थळ— ( राक्षसभुवन येथील गंगेचें वाळवंट. )

पद

हा देह असें कवणाचा ॥ मातेचा किंवा जनकाचा ॥
सुत म्हणती हा आमुचा आमुचा ॥ मित्रांचा वा निज भार्येचा ॥
अथवा व्याघ्र पशूंचा ॥ भक्ष असें हा ॥ निर्वाणींचा ॥
व्यार्धीचा वा यमदूतांचा ॥ आहे निर्वाणी वन्हीचा ॥
निर्णय काय सत्याचा ॥ या विषयीं नच होइ मनाचा ॥ ॥

अशा त्रिशंकू सारख्या लोंबत रहाणाऱ्या देहावर भिस्त ठेवून संसारांत शिरणें म्हणजे फुटक्या भोपळ्याची सांगड बांधून पूरांत उडी घालण्या सारखेंच आहे आत्म्या विषयीं म्हणाल तर तो अनंत, अदृश्य, अविकार, केवळ चैतन्यस्वरूप असून प्रवृत्ती वा निवृत्ती लिप्त वा अलिप्तपणा ची भावनाहि नाहीं त्याला

दिगंबरपंत०——सर्व इंद्रियें तोषविण्या करितां लग्न करून गृहस्थाश्रमी होणें शास्त्र संमत आहे.

पद

उन्मिनी कामिनी संगे ॥ मन माझें अतितर रंगे ॥
भक्तांच्या विषय तरंगे ॥ मन हें दूषण रंगे ॥
चित्तैक्य ब्रह्मरस पिउनी ॥ मुक्ति मंदिरीं शिरुनी ॥
सद्भाव संचकी बसुनी । झालाचें हितगुज करुनी
मी निर्गुण संगति अंग ॥ करितों मज आनंद न गे ॥ १ ॥

विप्र०—गृहस्थाश्रमीं पुत्रापत्य होऊन नंतर ईश्वरचिंतना करितां संन्यास घ्यावा हा शास्त्राची आज्ञा आहे

दासोपंत०—संन्यास याचा अर्थ काम्य कर्माचा न्यास करणें. तो अमुकच वेळीं केला पाहिजे असा कोठेंही निर्बंध नाहीं. तशांत काल ज्याचा अंत अखेल त्यानेंच हा प्रकरणें वागवी आहे. घडी भरताच मृत्यु क्षणाचाहि अवकाश देणार नाहीं.

पद.

मरण आणि न भरे हा संपरी ॥
स्वाश्रम कर आचरुनी अंतरीं घेइल मग हरि ॥ धृ० ॥
घडिने घडि हें शरिर लाविलें ॥ कालें मापानें ॥
आयु जातें नेति मरिता ॥ जळ जैं जळयानें ॥
ह्मणोनी धरोनी सदा जागृति मनिं सार्थक निज करि ॥ १ ॥

अपूर्ण.



## हिंदुस्थानची भरभराट.

पण्ण्याच्या ध्र वर्षांच्या अगाच्य शर्ती पाहुन योज उत्तम करून ती मुंबईस न्यावयाची न तिच्याकडून तेथील हित्र लायच्यानें, दाम व आगगाड्या चालवि- ण्याचें अणि गिरण्याचीं यंत्रें फिरविण्याचें वगैरे कामें करून घ्यावयाचीं, अशी अक्कल करून रा० टाटा यांच्या डोक्यांत येऊन यांनी त्या कल्पनेला कृतीचें स्वरूप देण्यास सुरुवात केली होती. तें अपुरें राहिलेलें काम त्यांचे चिरंजिवांनी हातांत घेऊन मदर कारखान्याच्या पायाचा दगड गेल्या आठ वड्यांत मुंबईचे गव्हर्नर यांचे कडून बसविला. याप्रसंगी केलेल्या भाषणांत ना० गव्हर्नर साहेबांनीं हिंदुस्थानची भरभराट होत असता कित्येक लोक विनाकारण म्हणे टरतें हिंदुस्थानचे कारखाने बुडविले व हिंदुस्थान दरिद्री होत चाललें आहे अशी खोटी ओरड करतात असा ताशेरा झाडला. हिंदुस्थानाला परकीय भांडवला पासून मुळींच फायदा नाहीं असें ह्मणणारांविषयीं आमची मुळींच सहानभूति नाहीं; तसेंच ब्रिटिश सरकारचें राज्य हिंदस्थान बुडविण्याला आलें आहे असें ह्मणणारांचें व आमचें कधीं पटावयाचें नाहीं पण परकी भांडवलामुळें हिंदुस्थानचें हित होत आहे ज्यास्त होत आहे असें जे ह्मणत आहेत त्यांच्या ह्मणण्यांत तथ्यांश विचार करण्या सारखा आहे असें आह्मांस वाटतें. थोड्या व्याजावर ब्रिटिश भांडवल आह्मांस वापरण्यास मिळालें तर त्याचा स्वीकार न करण्या इतके हिंदुस्थानचे लोक निर्बुद्ध नाहींत. पण त्या भांडवलाबरोबर परकीय लोक शिरतात, आणि इकडील शेतें, मळे, कारखाने, खाणी यांचे मालक होऊन बसतात, आणि नुसती स्वल्प मजुरी आमचे हातावर टाकून नफ्याचा मोठा अंश व व्याज दोन्ही स्वदेशीं नेतात, हें त्यांत वाईट आहे. अशी स्थिति वस्तुतः आहे हें मॉरिसच्या मानवाच्या खाणीचें उदाहरण पाहून कोणालाही कळण्यासारखें आहे हें परकीय भांडवला विषयींचें झालें. आतां म्यांचेस्टरनें आमच्या देशाचा व्यापार गिळला आणि कला कौशल्य बुडविलें हें इतिहासांत नमूद आहे तो काळ अनुभवाची गोष्ट नाहीं अद्यापही हिंदुस्थानातल्या कापडावर एक्साइज जकात बसविण्यास म्यांचेस्टरवाल्यांनीं स्टेट सेक्रेटरी मार्फत हिंदुस्थान सरकारास कसें भाग पाडलें आहे, आणि ही अन्यायाची जकात दूर करण्याचें छाती म्यांचेस्टरवाल्यांचें हिंदुस्थान सरकारास करवत नाहीं असें आपण लॉर्ड मिंटोनपर्यंत मुद्दाम कसें स्पष्टपणें ह्मणत आहेत यावरून सहज कळण्या सारखें आहे. हिंदुस्थानच्या लोकांकडून राज्यकारभारांतलीं मोठालीं कामें पुष्कळ कमी खर्चानें सहज करून घेतां येण्या- सारखीं असतां निष्कारण युरोपियन लोकांना मोठाले पगार देऊन आणण्याचा धडाका सुरूच आहे ही गोष्टही नाकबूल करता यावयाची नाहीं. ही खर्चाची उधळपट्टी हिंदुस्थानचें अहित करणारी आहे असें केलेली ओरड निष्कारण कशी? सारांश, हिंदुस्थानच्या भरभराटीचा मंत्र अलीकडे ना० सर जॉर्ज क्लार्क हे वारंवार जपत असतात, आणि त्या मंत्राच्या जादूवर ज्यांचा भरंवसा बसत नाहीं त्या पत्रकर्त्यांना बरेंच इशारा करीत असतात तो कुठल्या वेळा अनुठायीं असतो ना० सर जॉर्ज क्लार्क यांच्याशीं मतभेद होण्याचा प्रसंग आम्हास कचितू पडतो त्यांचे विचार हिंदुस्थाना विषयीं नेहमीं सहानुभूतिपर व सरळ असतात. पण हिंदुस्थानच्या भरभराटीविषयींचे त्यांचे विचार एकतर्फी आहेत, असें ह्मणण्याचें परवानगी आह्मी घेतों.

## ऐतिहासिक पुरुषाचें स्मारक.

अलीकडे शिवाजी महाराजांच्या समाधी- च्या जीर्णोद्धारासंबंधानें कित्येक पत्रांतून निष्कारण वाद माजून राहिला आहे. वस्तुतः श्री शिवाजी महाराज दोन्ही पक्षांना सारखेच पूज्य आहेत. त्यांच्या समाधीचा जीर्णोद्धार व्हावयास पाहिजे आहे याविषयीं ही कांहीं वाद नाहीं. तो जीर्णोद्धार करण्यास लागणारें द्रव्य व सरकारचें साह्य मिळविण्याचे उद्योगास लागावयाचें सोडून आमच्यातली शहाणी मंडळी निष्कारण वादांत आपला सगळा उत्साह खर्च करीत आहे हें पाहून आह्मांस वाईट वाटतें. या कामीं सरकारनें साह्य करण्याचें अभिवचन दोन तीन वर्षांपूर्वींच दिलेलें आहे, आणि शिवाजी महाराजांच्या नावाचा दुरुपयोग करून त्यांच्या उत्सवाच्या मिषानें नसत्या राजकीय भानगडी उपस्थित करण्याचा उपद्व्याप कित्येक मंडळीनें केला नसता, आणि समाधीच्या इमारतीचे नकाशे वगैरे सरकारकडे वेळेवर पाठवून आपण लोकांतर्फे किती द्रव्यसाह्य करण्यास तयार आहों तें अगोदर कळविलें असतें तर मराठी राज्याच्या संस्थापकाची समाधि आज निराळ्याच स्वरूपांत दिसली असती. खरी गोष्ट अशी आहे कीं, जो पक्ष लोकांत चळवळ करणारा आहे, आपल्या अविचारी व मूर्खपणाच्या कृपानें शिवाजी महाराजांच्या नावाला सरकारी अधिकाऱ्यांत व मुसलमान वर्गांत अप्रिय करून सोडलें आहे; इतकेंच नाहीं, तर गणपतिउत्सवाप्रमाणें या समाधीच्या जीर्णोद्धाराच्या सद्हेतूविषयीं शंकेचें बीज रुजत घालून ठेविलें आहे. ही एका पक्षाची हानि झाली. दुसऱ्या पक्षाचे ठायीं शिवाजीविषयीं पूज्यबुद्धि नाहीं असें नाहीं; पण ती क्रियायुक्त नाहीं एखादे प्रसंगी चार दोन भाषणें झालीं, किंवा वर्तमानपत्रांचे चार दोन रकाने शिवाजी महाराजांच्या स्तुतीनें भरून काढणें या पलीकडे अंग मोडून वर्गणी जमा करण्याचें वगैरे काम त्यांच्यानें होत नाहीं दुसऱ्या पक्षानें का न बसा पंचवीस हजार रुपयाचा फंड करून मोठ्या गोष्टी करण्याचें ध्येय केंद्रलें दुसऱ्या पक्षानें केळकरांच्या फंडाबर हल्ला भाषण्यापलीकडे कांहीं एक केलें नाहीं. अशा उद्धटपणामुळें दोन्ही पक्ष नालायक होऊन बसले, आणि शिवाजी सारख्या ऐतिहासिक पुरुषाच्या समाधीच्या जीर्णोद्धाराचें काम मात्र तसेंच राहून गेलें! सुशिक्षित महाराष्ट्र यांची ही उपेक्षा अतां अगदीं असह्य झाली आहे. सरकारनें आता पुढें होऊन हें काम करावें, आणि दोन्ही पक्षांस लज्जवावें हें उचित आहे.

पुढील गोष्ट 'ट्रायब्यून' पत्र्याच्या बातमीदारानें कळविली आहे वरिष्ठ कौंसिलाचे गेल्या बैठकीचे वेळीं संयुक्त प्रांताला कौंसिल देण्यासंबंधाच्या आपल्या ठरावावर कोणी कसें मत दिलें या विषयींची नोंद घेण्याबद्दल ना० सिंह यांनीं सूचना आणिली होती. तें ना० सिंह यांचें ह्मणणें व्हाइसराय साहेबांस ऐकूं न गेल्यामुळें तो ठराव नामंजूर होतांच व्हाइसरायसाहेबांनीं कौंसिलची बैठक बरखास्त केली. हें पाहून कौंसिलचे सेक्रेटरी मि० म्याकफर्सन यांनीं ती गोष्ट व्हाइसरायसाहेबांच्या नजरेस आणिली त्या बरोबर लॉर्ड हार्डिंजसाहेबांनीं लागलीच त्यांची सूचना मान्य करून ना० सिंह यांस पाहिजे होती ती माहिती तत्काळ देवविली आणि झालेल्या प्रकाराबद्दल योग्य प्रकारें क्षमा मागितली यांचें नांव थोरपणा.

## थिऑसफी.

सध्या थिऑसफीला पापग्रहांच्या पीडेचे दिवस आले आहेत असें दिसतें. बनारसच्या सेंट्रल हिंदुकॉलेजला जमा व खर्च यांची तोंडमिळवणी करतां येईनाशी झाली आहे हें मागच्या अंकीं आह्मी कळविलेंच आहे. आतां मद्रासच्या वर्तमानपत्रांतून खुद्द थिऑसफीकल सोसायटीवर व विशेषतः त्या संस्थेच्या चालकांवर टीकेचा भडिमार सुरू झाला आहे. बंधुत्वाच्या पायावर उभारलेल्या आणि जाति व धर्म यांच्या भेदामुळें विभक्त झालेल्या असंख्य लोकांना समानतेच्या आणि ब्रह्मनिष्ठेच्या तत्त्वावर एकत्र आणून त्यांच्यांत सलोखा करण्याच्या स्तुत्य उद्देशानें आज पंचवीस तीस वर्षें अव्याहत चालविलेल्या संस्थेच्या चालकांना त्यांच्या परिश्रमाचें हें बक्षीस मिळत आहे हें पाहून कोणाला उद्विग्नता वाटल्यावांचून राहणार नाहीं. जी संस्था अस्पृश्य लोकांच्या उन्नतीच्या खटपटी, स्त्रीशिक्षणप्रसार, शास्त्रीय शोध, औद्योगिक व सांपत्तिक स्थितींत सुधारणा, आणि शाळांतून धार्मिक व नैतिकशिक्षण देण्याची तजवीज करणें इ० देशहिताच्या गोष्टी करण्यांत अग्रेसर आहे तिच्या संबंधानें निष्कारण कुतर्क चालवून लोकमान्य पावतून निंदापर लेख प्रसिद्ध व्हावे ही खेदाची गोष्ट आहे. तुह्मी कितीही रस्ता फुंकून चालणें पाहिजे तर यावज्जन्म निंदकाचें हित करण्यासाठीं प्राण खर्ची घाला तो आपलें निंदाकर्म केल्यावाचून राहावयाचा नाहीं मनुष्यस्वभावांत गूढ रहस्य आहे तें हेंच आहे

## इंग्लंडांतलें स्थानिक स्वराज्य.

इंग्लंडातील स्थानिक स्वराज्याचा रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे. तो आमच्या लोक नायकांनीं अवश्य मनन करण्यासारखा असल्यामुळें त्यांतल्या कित्येक ठळक गोष्टी येथें देत आहों. प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं इंग्लंडांत स्थानिक स्वराज्याचा जो विकास झाला तो लोकांच्या द्वारें व मनतेंतूनच झाला आहे. आपल्या हिंदुस्थान देशांत पूर्वींच्या काळीं ग्रामपंचाइती असत. त्यांचा नाश ब्रिटिश अमलानेंच झाला, आणि या ब्रिटिश अमलांतच हलींचीं नवीन प्रकारचीं स्थानिक स्वराज्यें अस्तित्वांत आलीं. विलायतेतल्या स्थानिक स्वराज्यावर सरकारी बोर्डाचा ताबा आहे, पण तो नांवाचा आहे. आमच्या इकडे नवीन प्रकारचें स्थानिक स्वराज्य ( म्युनिसिपल गव्हर्नमेंट ] हें स्थानिक मंडळ्यांना अगदीं

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २० माहे फेब्रुवारी सन १९११ इ० [ अंक ८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
दिनाच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
कुबरा:- गुरुवारच्या आंत येणाऱ्या
[illegible] आठवड्यांत घेतल्या जातील.
[illegible] देणाऱ्या नोटिसास [illegible] चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकिंची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या कटीवर ठेवी घेतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला २।१।०९ { G. A. Phillips. एजंट.
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोलें व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१ ½ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक, आकोला २१।९।१० { G. A. PHILLIPS. एजंट.
नो० न० २

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader.
Amraoti

No. N. 3

## NOTICE.

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2831-42, dated the 8th December 1899, is published for general information.

E. A. DeBrett,
Chief Secretary to the Chief Commissioner,
Central Provinces.

NAGPUR:
The 13th. February 1911

### RESOLUTION.

The Secretary of State for India has brought to the notice of the Government India that it not infrequently happens that natives of India, students or others, who have proceeded to England, desire to obtain pass orts to enable them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore entitled to passport. Appeals for assistance are also frequently addressed to His Lordship by destitute Indians who desire to return to their country and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2. In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governor-General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India, with an authoritative certificate of identity, in the form appended to this Resolution, signed by the head of the district (in a Presidency Town, the Commissioner of Police) in the case of residents of British India and by the Political officer in that of residents of Native States. For a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police) or Political Officer, as the case may be:—

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant————
2. Father's name and caste————
3. Residence————
4. Age of applicant————
5. Nationality of applicant*————
6. Social and pecuniary status of father (or guardian)————
7. Date of probable departure of applicant from India————
8. Object of applicant's visit to England (Europe)————

*Signature of District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police), or Political Officer, or head of school or college*

Date————

* i.e., whether a British subject by naturalization (or a subject of a Native State.)
† Countersignature of the District or Political Officer should be obtained on certificates signed by heads of schools or colleges. No. N. 81

No. 81

## ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्देकृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्त्वें मनामध्यें चांगलीं ठसून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तऱ्हांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४९, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें, पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी पो० कुंडल.
२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ७ २९

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – हा अप्रतिम औषधींपासून डोळ्याचे साधारण विकार— खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

व्ही. पी. करणारांनी उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालेपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

## WANTED.

Wanted Agents on salary and commission for the Bengal Provident Company Limited. The cheapest and most reliable Life and Marriage Assurance Company. Both sexes assured up to age 60. No proof of age nor Medical examination necessary. Monthly premium of Life— 1st. class- Re one and ditto 2. nd. class annas eight and Marriage Endowment Re one monthly. Life Benefit payable up to Rs 1000/- and Rs. 600/- respectively in first and second classes. Minimum benefit Rs. 110/- and Rs. 50/- respectively just after death. Marriage- at all ages, benefit payable before the ceremony.

SPECIAL FEATURE.

Agents commission hereditary and one Rupee to be deducted in the first two Months & two annas per rupee on renewal. Moreover, Policy holders entitled to elect two Directors to vote like share holders and to check the accounts.

Apply at once to S. M. DASGUPTa,
Secretary,
1 Hari Mohon Bose's Lane, Calcutta.
नो. नं. ९४

चिरकालचा खरा लाभ कोणता ? पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो ! महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

## कलाशिक्षण

(वार्षिक वर्गणी ह. ट. स. १ रु. १॥) (नमुना अंकास ऽ२ आ.)


गांवच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिति शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रामोहन, रोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २९ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या, औषधी, मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक—— कलाशिक्षण, कार्यालय, बडोदें.
नो. नं. ९

### अशी संधी पुन्हां येणार नाहीं.

ह्या घड्याळ घेणारांस



एक घड्याळ बक्षीस.

पोष्टखर्च माफ

दर एकाची किंमत ३।.

जंटलमन् इमेटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा म्हणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ता — खोजा वलीभाई इस्माल मुकाम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ७

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १९११ इ० [ अंक ९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास सोमवार चार्ज पडेल.

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।१२।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

## मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकांनीं जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{१}{२}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक, आकोला २१९१०८ } G. A. Phillips. एजंट.
नो० न० २

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq Pleader Amraoti

No. N. 3

## WANTED.

Wanted Agents on salary and commission for the Bengal Provident Company Limited. The cheapest and most reliable Life and Marriage Assurance Company. Both sexes assured up to age 60. No proof of age nor Medical examination necessary. Monthly premium of Life— Ist. class— Re one and ditto 2. nd. class annas eight and Marriage endowment Re one monthly. Life Benefit payable up to Rs 1000/- and Rs. 600/- respectively in first and second classes. Minimum benefit Rs. 110/- and Rs 50/- respectively just after death. Marriage— at all ages, benefit payable before the ceremony.

SPECIAL FEATURE.

Agents commission hereditary and one Rupee to be deducted in the first two Months & two annas per rupee on renewal. Moreover, Policy holders entitled to elect two Directors to vote like share holders and to check the accounts.

Apply at once to S. M. DASGUPTA
Secretary,
1 Hari Mohon Bose's Lane, Calcutta.

नो. नं. ५४

## नोटीस.

खालीं सही करणार याजकडून मुक्तो मर्द शंकर राहणार डव्ही ता. वाशिम हिजला नोटीस देण्यांत येतें कीं, तुजला वागविण्यांकरितां कित्येक वेळां मी घरीं आणलें असूनही तूं वागत नाहींस व माझे जे शत्रु आहेत त्यांचे सल्लामसलतींत राहतेस व कित्येक वेळां तूं त्यांचे सल्ले वरून मजला फसविण्याचें व मजवर एकादें अरिष्ट आणण्याचें कृत्य करण्याचा विचार केला होता असें मजला समजलें आहे, व यावरून एकादे दिवशीं तूं मजला फसविशील असें वाटतें, एकदोन वेळां तूं फारकती मागितली होतीस, करितां मी आपलें स्वसंतोषानें तुजवर असलेला माझा नवरेपणाचा हक्क सोडला आहे व माझे लग्नाचा खर्चही सोडला आहे, आतां तुझे मर्जीस येईल तसें वागावें अगर दुसरा नवरा करावा. माझी कांहीं हरकती नाहीं, कळावें.

ता० १५।२।१९११ इ०.
सही
शंकर भिकाजी रा० डव्ही दस्तुर खुद्द०
नो० नं० ८२

## जाहिरात

सर्वत्र साहु, सावकार व ईतर लोकांस:— मी नथु व० गणुजी माळी रा० आकोला ता० जळगांव जि० बुलढाणा जाहिरात देतों कीं, मजला लिहिणेंवाचणें अगर नुस्ती माझे नांवाची सही सुद्धां येत नाहीं करितां मी गोपाळ सखाराम कंपनी मुंबई याचे येथून नंबर ६९ चा माझे नांवाचा रबरी शिक्का वे० कान्हुबाबा जोशी यांचे नांवानें पत्र पाठवून पोष्ट पिंपळगांव काळे यांतून पार्सल मागवून पार्सल मला मिळाली ती मांझ स्वतः हातांनीं फाडली व तिचा उपयोग फक्त १५।२।१९११ इ० रोजीं जळगांव मजिस्ट्रेट कचेरींत केला. ह्या शिवाय आजतारखे पावेतों कोठें उपयोग केला नाहीं. व या तीन वर्षांत मी थोडे फार लोकांकडून माझे नांवानीं कर्जरोखे वगैरे लिहून घेत असतो व या तीन वर्षांत माझे कडेस कोण्या सावकाराचें अगर इतर लोकांचें कर्ज नाहीं तर माझे नांवानीं कोणी सही करूं नये. करितां शिक्का आणिला आहे. शिक्याखेरीज माझे नांवानीं पावती अगर रोखा, गहाण, खरेदी, पट्टा, करार, चिठ्या माझे विरुद्ध केल्यास मी कबूल करणार नाहीं. अगर कोणी दुसरा शिक्का लबाडीनें आणून कारवाई केल्यास जबाबदार पकडला जाईल. कळावें. ता० २२।२।१९११ इ०

सही
नथु व० गणुजी माळी
रा० आकोला ता० जळगांव जि० बुलढाणा.
नो० नं० ८३

## नोटीस

तीर्थस्वरूप रा. रा. धर्माजी नरसींग रायवार साहु दुकान कसबे उमरखेड ता. पुसद जिल्हे यवतमाळ यासी नोटीस देणार गोविंदा वा। कोंडबा रायवार अज्ञान पालन करणार यमुनाबाई जवजे कोंडबा रायवार दुकान कसबे उमरखेड ता. पुसद जिल्हे यवतमाळ हल्लीं मुक्काम विठूळ प्र उमरखेड ता. पुसद जिल्हे यवतमाळ याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं मजला माझा पिता कोंडबा मैत याचे आज्ञेवरून माझी मातोश्री यमुनाबाई हिनें मजला ता. ८।२।१९११ इसवीं रोजीं सशास्त्र दत्तक घेऊन सर्व इस्टेटीचा मालक केलें आहे. त्यास कसबे उमरखेड येथील दुकान साहुकारी स्थावर व जंगम इस्टेट तुमची व आमची मिळून अदाजा सवालक्ष रुपयांची आहे. त्या सर्व इस्टेटीवर माझा व तुमचा निमेनिमचा बरोबरीचा हक्क आहे. कारण माझा चलता व्यंकोबा नरसींगा व नन्होबा नरसींगा मैत झाले असून त्या दोघांच्या दोन दोन बायका आहेत त्याजला कांहीं पुत्र किंवा कन्यासंतती नसून त्यांनीं दत्तक ही घेतलें नाहीं. त्या मुळें त्यांच्या बायका फक्त अन्नवस्त्राच्या मालक आहेत. तुह्मी व मी दोघे सर्व इस्टेटीचे मालक आहोंत करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आज तारखे पासून पंधरा दिवसांचे आंत चार पंचासमक्ष कसबे उमरखेड येथील व दुसरे कोठेंही मेथें जेथें स्थावर व जंगम मिळकत समाईक असलेली ती सर्व वांटून द्यावी. नाहीं तर योग्य रीतीनें दावा करून घेतली जाईल व त्यास जो खर्च लागेल तो सर्व तुमचे जातीचे हिशांतून घेतला जाईल. त्या खर्चाचा मी जबाबदार राहणार नाहीं. हल्लीं तुह्मी आपले लेकाचा लग्नसमारंभ चालविला आहे, त्या लग्नास माझी कांहीं मंजूरी नाहीं. तुह्मी आपले मुखत्यारीनें केल्यास त्याची रकम तुमचे हिशांतून मुजरा घेतली जाईल. मी कांहीं त्याचा जबाबदार नाहीं. ही नोटीस लिहून दिली सही. तारीख १० माहे फेब्रुवारी सन १९११ इसवीं.

सही
गोविंदा वा। कोंडबा रायवार
अज्ञान पालन करणार मातोश्री
यमुना जवजे कोंडबा
नो. नं. ८४ रायवार इची निशाणी खुद्द.

## नोटीस

नोटीस घेणारी मदनगोपाल शंकरलाल मारवाडी राहणार खामगांव यांसः—

नोटीस देणार शेख गुलाब वल्लद शेख आश्रफ मुसलमान राहणार पहुरजिरे ता० खामगांव नोटीस देतो कीं आमचे कडेस तुमचें देणें गहाणखतावरून आहे. आह्मी आमचें शेत विकून तारीख ६।२।११ रोजीं तुमचे पैसे घेऊन चंद्रभान वल्लद संभू पाटील, बाळकृष्ण रावजी कुळकर्णी, सखाराम वल्लद बाहादु पाटील रा० पहूरजिरे व सिताराम वल्लद माधो पाटील रा० इसापूर यांचेसह आलों होतों. तुह्मी पैसे न घेतां आह्मास हिशेबही दाखविण्याचें नाकारलें पुन्हां आणखी एकदोन वेळ तुमचे कडेस आलों परंतु तुह्मी वर प्रमाणेंच नाकारलें करितां या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं आह्मी शिवदास रामधनदास यांचे दुकानावर जाहागीरखा मंगळखा यांचे नांवावर पैसे जमा करून ठेविले आहेत तेथें तुह्मी जाऊन आठ दिवसांचे आंत तारीख ६।२।११ पर्यंतच हिशेब करून जे पैसे होतील ते घेऊन जाणें. असे न केल्यास तुह्मी दावा वगैरे आणल्यास वरील तारखेच्या पुढें व्याज तुह्मी पैसे घेण्याचें नाकारल्यामुळें मिळणार नाहीं व दाव्याचा खर्चही आह्मी देणार नाहीं. ही नोटीस दिली तारीख २३।२।११.

सही
शेख गुलाब वल्लद शेख आश्रफ
नो. नं. ८५ मुसलमान निशाणी खुद्द.

## जाहिरात.

टेक्स्ट बुक कमिटींत पसंत होऊन मे. डैरेक्टर सा. ब. मध्यप्रांत व वऱ्हाड यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिसें व लायब्ररी साठीं मंजूर केलेले प्रसिद्ध धनुर्धारी कृत;-

१ व्यापारी वाचनपाठ. किं० ॥।;
त्याच प्रमाणें २ पिराजी पाटील किं०. ॥।;
३ उपाशी महाराष्ट्रास उद्योग किं०. ।=;
४ धर्मावरील मार्मिक निबंध अंक १ ते १४; १०० बुकांस ।= (पूर्वी १॥ ६० किं० होती) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास ।- व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व ।- व ज्यास्त घेतल्यास ॥- व ।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० अगाऊ आली पाहिजे

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी,
नो० नं० ८६ बेळगांव

अंक ५ वा.
प्रवेश तिसरा.

[... तू आजेकरितां श्रीची आज्ञा घेऊन ... नारायणगडेस येईन. सूर्य मावळ्यांनीं आज्ञा ... ओंच्या दर्शनाला देवालयांत जातें. ... शिपायी स्वार्थपरायण ला आणतात. )

स्वार्थपरायण०— अरेरे ! ना ! मैल कस ... हो आंगांतून तिडका वेदना निघत ... तुसत्या ! किंवा आमपर्यंत केलेलीं ... कृत्यें सर्प, विंचू, इंगळांच्या रूपानें ... ठिकठिकाणीं दंश करीत आहेत माझ्या ! हाय ! ! रक्तपातीनें अगाला ... पदलेल्या भेगांतून आग अंगार निघत आहे ... कासावीस होतो. ... पाणी ... शिपायी दादा ! पण नको ! मला असाच तडफडून मरूं द्या ! ! पहा ! पाच–पाच हातांनीं अनेकांचे गळे दाबून अबलांचा घात केला ! तेथ आज रक्तपीतीनें अट्टून ... अनेक कीटकांनीं घरें केलीं आहेत ! नास्तिकपणाचा स्वीकार करून आत्मसुखा करितां, नव्हे क्षणिक सुखाकरितां माझी सर्व कृती अमानुष होती. हें आज प्रत्ययास आलें माझ्या ! ह्मणूनच माझ्या कृतीचा उद्धेर करून शरीरांत झालेला पापकर्माचा मळ ठिकठिकाणीं भेगी पाडून रक्त, पू, ... रूपानीं झाडून आत्मा बाहेर टाकीत आहे ; यावरून माझी छाति त्याला रुजूं नव्हती ! कृतकर्माचा मोबदला जगांत आहे हें मला आज पूर्ण कळलें, पाल-कांनो ! या अधमानें तुह्माला मानिलें नव्हते. वा यमा ! सुख हेंच कर्म आणि मरण ही मुक्ति हें सत्य मानून तुझें अस्तित्व मीं मानीत नव्हतो. पण याच जगांत, याच देहांत तूं आपला न्यायी-पणा मला दाखविलास. आतां याला तूं आपल्या लाकीं नेऊन कोणत्या रौरवांत टाकणार ! तुझ्या क्रूर दुतांच्या यातनापा-सून सोडविण्यास मला कोणीच वाली उरला नाहीं ! कारण या जिव्हेनें अजू-पर्यंत हरीचें नाव उच्चारिलें नाहीं. ती–

पद.

उत्तरा दया करा ॥ त्या चरणि पावरा ॥ मदिय दुरित सकल हरा ॥ अखिल दोष क्षम्य धरा ॥
अनुताप मनसि हा पुरा ॥ जाहलाचि दुःसह ॥ १ ॥

[ ग्लानी येऊन पडतो. पडदा पडतो. मृडानी, नलिनी, मानाजीराव येतात. ]

नलिनी०—

पद

कुंबक मणिनें ओढिलें ॥ राहाते निज वळें ॥ मन इकडे वेधिलें ॥ तम ॥
या मुख विधुला पाहुनी ॥ हृदयींदाघ येउ ळतो ॥
दृढ प्रेमाच्या उर्मिनी ॥ निरखुनि मी तोपलें ॥ उसल हें विकसलें ॥ १ ॥

मानाजीराव०— [हाक मारून] अहो महाराज येथें कोणी ... विजापूरचे सरदार आले आहेत काय !

विप्र०— [ पुढें येऊन ] साधूमतांना तोफेच्या तोंडीं उडविणारे तेच ना ते ? वा ते तर येथें संत होऊन समाधी लावून बसले आहेत.

मानाजीराव०— ह्मणजे.

विप्र०— ह्मणजे काय ! सत्पुरुषाच्या कृपेनें आत्मसुखाचा अनुभव घेत ब्रह्मानंदांत निमग्न होऊन ते तिथें बसले आहेत पहा !

आहे आणि काढण्यांनीं बांधलेला स्वार्थपरायण ... पडला आहे असा प्रवेश होतो. )

जगपाल०— ( समाधी उतरून )

पद.

जनीं जनार्दन भरला ॥ सर्वेहि ॥ अखिल चराचर व्यापुनि त्रिभुवनीं ॥ दशांगुळें जो उरला ॥ धृ० ॥
भेद भाव हा भाव हरपला ॥ मीं तूं पणाला अवसर नुरला ॥
ज्ञानदीप प्रज्वलीत केला ॥ हरिलें ॥ मोह तमाला ॥ गुरुनें ॥ १ ॥

मानाजीराव०— हा आपल्या पदरचा सेवक मानाजीराव.

जगपाल०— माझ्या पदरीं नोकर, चाकर सेवक ... आणि क्रियमाण मात्र होते. पण त्यांचा फेड संतांनीं करून पदर फाडून टाकला.

मृडानी०— आपल्या पत्नीकडे पहावयाचें नाहीं कां आपण !

नलिनी०— दादा पाहिलास कां तुझा शत्रु इकडून नाहीं मानाजीरावांनीं बंदिवान करून आणिला आहे.

जगपाल० मी कोणाचा भ्राता, वा भर्तार नाहीं. मज सुत, दुहिता, माता, पिता, शत्रु, मित्र कोणी नसून आदि, अंतीं, मध्यंतीं जनन, मरण विरहित व्यापाव्याप्या-पासून अलिप्त मी निर्विकार निरंतर आहे.

पद

सद्गुरु गारोडी ॥ तोडि अविद्या बेडी ॥ त्रिपुटीचक्रा भेदन करुनी आ मरसाची गोडी ॥
लावि मित्राला लता वासना समूळ छेदुनि काढी ॥
माया पटला उघडुनि देई विज्ञानाची जोडी ॥
ब्रह्म रंध्रि मग जिव शिवाची अखंड भेटी पाडी ॥ १ ॥

( समाधी लावतो. )

मृडाणी०— अगबाई हें असें काय करतात ! हाय ! हाय !

पद

कुणी मंत्रिकानि प्रियकरास खचित भारिले ॥ चेटक वा कांहिं करुनि वेड लाविले ॥ धृ ॥
नष्ट झालि याची स्मृति ॥ स्वजनाला नोळखती ॥
उर्ध्व नेत्र क्षणि करिती ॥ नासाग्री क्षणें आणिती ॥
मलमलतें मुखें वदती ज्ञान हरपलें ॥ १ ॥

मानाजीराव०— विप्रवर्य हें काय गारुड आहे.

विप्र०— कापरानें अग्नीला स्पर्श केला पण तो अग्निरूपच झाला.

मृडानी०— किंवा यांना भ्रम झाला नि चेटक्यानीं तो यांना लाविला असेल.

विप्र०— भ्रमच नव्हे. प्रवृत्तीचा यांना संभ्रम झाला आहे ते पाहिलेत वाई ! तेच ते मांत्रिक येत आहेत यांची ही दशा करणारे. हे संत, यति, संन्यासी, तापसी पंथांतले आहेत हो पण.

नलिनी०— मग हे या स्वार्थपरायणा ... ठिकठिकाणी करून ... दिकाचा ... नाहींत.

मानाजीराव०— आह्मी यांचे शत्रु पण याला पहातांच मनांत एक प्रकारची पूज्यता उत्पन्न होते. अरे डावरचा आम्ही वाळला नाहीं भ्रमून पण अंगावर किती काांति झळकते आहे हो. ( दासोपंत येतो )

मृडानी०— महाराज मला चुडेदान द्या. माझ्या पतीनीं तुमचा द्रोह करून ... करा.

पद.

हीं तुमची तनया ॥ धरुनि विनया ॥ विनविते तुह्मा निज पदरीं घ्या इनवरी करावि दया ॥
युगतु जन पतिनें छळिला ॥ अन्याय सुकृति हा झाला ॥
हृदि करा क्षमा दीनेला ॥ पतिप्रेमा वाढवीं त्या ॥ भवा विजया ॥
ना तरी होते पारखा मला मेसार सदय हृदया ॥ १ ॥

दासोपंत०— पतिं असे अनंत जन्मांत अनंत संसार केलेस पण सार एकाहि येनींत प्राप्त झालें नाहीं. माता, पिता, भ्राता, पति, सुत, दुहिता प्रत्येक जन्मात आहेतच. या क्षणीं देहपात झाला तर श्री दत्तात्रय मात्र अंतरतो ... मनुष्य देहाशिच होते. माते तुझा देह तुझा नाहीं. पंचभूतांचा आहे. मग त्याला तूं पिता, पुत्र, पति मानतेस तो तुझा कसा होऊं शकेल ?

पद

मायेचा पूर येइ भवनदी प्रती ॥ त्यांत देह काष्ठें हीं अमित वाहती ॥ धृ ॥
एक होति नी प्रवाहिं फिरुनि फाकती ॥ एक तरुवरि बसती मक्ष भक्षिती ॥
पक्षिसरो अल्पमार्गी स्थानि परतती ॥ जगति सकळ प्राण्यांची समज ही गती ॥ १ ॥

संसार इंद्रजाल गारुड मृगजळ उभारलेलें असून तीं प्राण्याला नजरबंद करून मोहांत पाडीत आहे. प्राण प्रवासी आयुष्यरूपी दोन प्रहरची सावली निघून जातांच तो मार्गस्थ होईल. ह्मणून मनुष्य देहांत प्रत्येकानें तरणोपायाचा उपाय पाहिला पाहिजे.

मृडानी०— पति स्त्रियांचा प्राण तो सोडून जाणार मग या देहाचा काय नक्कर! तो गंगार्पण करतें! ( जाऊं लागते )

दासोपंत०— संसाराची लालसा पुरत्यांविना हिला उपरति होणार नाहीं आणि झाली तरी वासना बीजरूपानें राहून अंतीं ती दगा देईल. माते थांब थांब दोन शद्ब ऐक माझे. ( तिला थांबवितो )

जगपाल०— ( समाधी उतरून )

पद

मन उन्मन केलें संतकृपेनें जनन मरण हरलें ॥ मोहकर्णीचें वार उतरलें ॥ अनुभव सदनीं वेलें ॥ मग निज स्वरूप दाखवलें ॥ धृ ॥

मृडानी०— मजसि नाथा ॥ कां अनाथा ॥ करुनीया त्यजितां ॥

जगपाल०— श्री कांता जगताची आहे पुजितां त्या शरण रिघावें तया ॥

मृडानी०— नरि असल्या ॥ आचरिल्या ॥ मंतु मला ॥
त्या पदरीं मला परि सुगति मनन ॥ १ ॥
( तो जवळ जाते. जगपाल विषा छिडकारतो )

दासोपंत०— छे. छे. जगपाचे धर्म पत्नीचा त्याग शास्त्र संमत नाहीं. कांतेची वासना पुरविण्या करितां तुह्माला संसार केलाच पाहिजे.

जगपाल०—

पद.

भेद होतां परिमाची आवरता ॥ सद्गुरुराय देतें तक्षणींच त्याला ॥
पुन्हा पाप न त्या होतां स्मरावें ॥ प्रथम धावें त्या पदरीं त्या रमावें ॥
दूर पुनरपि हें उचित का असावें ॥ दोष लावी ही कृती मज नाला ॥ १ ॥

दासोपंत०— व्यवहारांत कामास न येतां सोनें गोळा बनून राहील तर त्याला मोल ... कर्म चढेल ? तद्वत तुह्मी निरंतर समाधी सुखांत रहाल तर ज्ञान पोटांत राहून पति-तांचें पावन होणार नाहीं. आपण तरावें व दुसऱ्यास तरावें हेंच ज्ञात्याचें कर्तव्य आहे. या करितां पारिस्थिति प्रमाणें कोणी संसा-रांत राहून कोणी तापसी मार्गानें कोणी संन्यासी होऊन कोणी तीर्थाटन करून जनाला तरणोपाय दाखविला पाहिजे. ( मृडानीच्या हातांत जगपालाचा हात देतो ) माते घे आपला पति. संभाळ.

जगपाल०— संताची आज्ञा पाळण्या करितां लावलेला चिंतापणी फेंकून देऊन मला गारगोटी ध्यावी लागत आहे.

दासोपंत०— ईश्वर प्राप्तिसाठीं सर्वसंग परित्याग करून वनांतच गेलें पाहिजे असें नाहीं. जन्म मरणाची यातायात चुकविण्या-करितां प्रभूचें भक्तियुक्त अंतःकरणानें ... नाम ... रूपी वेगवान् वारुतें आकलन करून नामसंकीर्तन करणें हाच एक सुलभ उपाय आहे. पंडितांच्या बोधाचा विध्वंस दांड करतो. तापसाच्या तपाचें निर्दलन क्रोध करतो. सिद्धि योग्या-चा योग नाडते. अभिमानानें सज्ञानाची बुद्धि भ्रष्ट होते विषम कल्पना कर्मकर्त्याचा नाश करते. पण निमळ भक्ताचा नाश करण्यास कोणीही समर्थ होत नाहीं. अंबऋषीचा छळ करतांच दुर्वास ऋषीच्या पाठीं सुदर्शन चक्र लागलें. हरिभक्ति परायण दत्तं-गदाच्या छळास प्रवृत्त झाल्यामुळें, देवाचे अंश मोहनीच्या रूपानें चरकांत पचत आहेत. भगवंतानीं ह्मटलें आहे.

नाहं वसामि वैकुंठे योगीनां हृदये न्वौ । मद्भक्ता यत्रगायंति तत्र तिष्टामि नारद ॥

मानाजीराव०— राक्षस भुवनास गेल्याचें निमगुन कळल्यावरून धरून आपलेल्या स्वार्थपरायणाला सरकाराचे पायाशींच इकडे आणला आहे.

संपूर्ण

बऱ्हाडसमाचार

माघ वद्य १४ शके १८३२ दुर्मतिनाम संवत्सरे

## फौजदारि कायद्यांत सुधारणा.--१

—०:※:०—

थोड्या दिवसांपूर्वी इंडियन पीनल को-डांतलीं सुधारणास्थळें आह्मीं दाखविलीं हो-तीं. आज फौजदारी कायद्यांत सुधारणा करण्यासारखीं कोंणकोणतीं कलमें आहेत त्यांचें थोडेसें दिग्दर्शन करावयाचें योजिलें आहे.

कायदेशास्त्र हें अनुभवसिद्ध शास्त्र असल्यामुळें कालातिक्रमा बरोबर त्या शास्त्राला ही चालन देणें अवश्य असतें. लघुतम निर्व-धापासून महत्तम हित साधणें हा कायद्याचा उद्देश असल्यामुळें तें हित साधतांना समा-जाचे घटकावयव-- व्यक्ति-- यांना येणाऱ्या अडचणी पैकीं जेवढ्या परिहार्य असतील तेवढ्या टाळणें हें कायदे बनविणाराचें मुख्य धोरण असलें पाहिजे. या नियमाला अनु-सरून सरकारनें चार वर्षांपूर्वी दिवाणी काम चालविण्याचे कायद्यांत सुधारणा करून तो कायदा अटोपशीर आणि सुगम केला.

फौजदारी कायद्याची ही तशीच सुधारणा व्हावयास पाहिजे आहे.

सध्याच्या क्रि० प्रो० कोडमध्यें प्रकरण २० व २१ हीं म्याजिस्ट्रेटनें करण्याच्या चौकशी बद्दलचीं आहेत. ज्या गुन्ह्यांला सहा महिन्यांपेक्षां ज्यास्त कैदेची शिक्षा सांगितलेली नाहीं, अशा गुन्ह्यांना समन्स केसिस ह्मणतात व त्यांचें विवेचन २०-व्या प्रकरणांत आहे; इतर गुन्हे ज्यांची चौकशी सेशन्स कोर्टानें करावयाची नसते ते २१ व्या प्रकरणांत दिले आहेत. या दोन्ही गुन्ह्यांशीं म्याजिस्ट्रेटचा व अर्थात् रयतेचा नित्य संबंध येत असल्यामुळें त्यां-च्यांत कोठें काय सुधारणा करतां येण्यासारखी आहे तें आपण अगोदर पाहूं.

प्रथम समन्सचे गुन्हे हातीं घेऊं. या गुन्ह्यांची चौकशी करतांना प्रॉसिक्युशन (पोलीस वगैरे फिर्यादी) व डिफेन्स (आरोपी) यांनीं आणलेला सगळा पुरावा माजिस्ट्रेटानें लिहून घेऊन मग गुन्हा शाबीत झाल्यास आरोपीस गुन्हेगार ठरवावें; नाशाबीत झाल्यास सोडून द्यावें असें क्रि० प्रो० कोडानें ठरविलें आहे. कित्येक खटले असे असतात कीं प्रॉसिक्युशनतर्फेच्या एक-दोन साक्षीदारांच्या जबान्या घेतल्याबरोबर किंवा फार तर आरोपी तर्फेच्या एकदोन साक्षीदारांच्या जबान्या नंतर त्या खटल्यांत कांहीं जीव नाहीं अशी माजिस्ट्रेटाची खात्री होऊन चुकते; तथापि क्रि० प्रो० कोडाच्या नियमाप्रमाणें सगळा पुरावा माजिस्ट्रेटाला दाखल करून घ्यावाच लागतो. त्यावांचून सुटका होत नाहीं. महत्वाच्या गुन्ह्यासंबंधाचें २०९ वें कलम व वारंट केसिस बद्दलचें २५३ वें कलम यांत वरील अडचणींतून सुटण्याचा मार्ग खुला ठेविला आहे ह्मणजे माजिस्ट्रेटला वाटल्यास खटल्याची चौकशी सुरू असतांना केव्हांही योग्य कारणें नमूद करून आरोपीला सोडून देतां येतें. पण ही सोडवणूक वारंट केसिसला ठेविली आहे. तशी समन्स केसिसला कां नसावी तें कळत नाहीं. अशा प्रकारची मोकळीक समन्स खटल्यांत असणें अवश्य आहे. या बाबतींत एक गमतीचा प्रकार हल्लींच्या कायद्यानें खुला ठेविला आहे. तो असा कीं क्रि० प्रो० कोडच्या २०३ कलमा प्रमाणें माजिस्ट्रेटकडे फिर्याद आल्याबरोबर आणि फिर्यादीचें शपथेवर स्टेटमेंट घेतल्यानंतर माजिस्ट्रेटाला त्या फिर्यादींत अर्थ वाटला नाहीं तर त्याला आरोपीवर समन्स न काढतां ती फिर्याद लागलीच काढून टाकतां येते असें जर आहे तर समन्स लागू होऊन आरोपी हजर झाल्यावर व फिर्यादी व त्याच्या तर्फेचे साक्षीदार यांची जबानी व उलट तपासणी झाल्यावर सुद्धां आरोपीला वाटेल तेव्हां सोडून देण्याचा अधिकार माजिस्ट्रेटाला कां नसावा तें कळत नाहीं. जी गोष्ट भयंकर स्वरूपाच्या गुन्ह्याच्या व वॉरंट केसिसच्या वेळीं करतां येते, किंवा २०३ कलमा खालीं समन्स न काढतां करतां येते, ती समन्स काढल्यावर मात्र करतां येऊं नये हा चमत्कार आहे. हा प्रकार असाच चालू ठेवल्यानें दोन प्रकारें नुकसान होत आहे. एक तर वकिलांची फी, जाण्यायेण्याचें भाडें वगैरे गोष्टींचा खर्च दोन्ही पक्षांवर निष्कारण पडतो, दोन्ही पक्षांना उगीचच्या उगीच दगदग सोसावी लागते, व कोर्टाचा वेळ व्यर्थ जाऊन खटल्याचा निकाल निष्कारण लांबणीवर पडतो. न्यायाच्या कामीं जितका कमी विलंब लागेल तितकें उभयपक्षीं इष्ट असतें. कोर्टातल्या फैसल्यांचा विलंब हा एक शाप होऊन बसला आहे, आणि तिला कारण खटल्याच्या चौकशीच्या सगळ्या पायऱ्या आक्रमून जाण्याची कायद्यानें ठेवलेली अवश्यकता हें एक आहे ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें समन्स काढून आरोपी व त्याचे साक्षीदार यांच्या जबान्या व उलट तपासणी झाल्यावर योग्य वाटल्यास त्या-बद्दलचीं कारणें नमूद करून आरोपीला सोडून देण्याचा अधिकार माजिस्ट्रेटाला दिल्यास हल्लींपेक्षां पुष्कळ अधिक झटपटीनें फौजदारी खटल्याचे निकाल लागत जातील.

दुसरी सुधारणा हवी आहे ती फिर्यादीपक्षाच्या साक्षीदारांच्या उलट तपासणी-च्या संबंधाची आहे. सध्याच्या क्रिमिनल प्रोसीजर कोडप्रमाणें वारंटाच्या खटल्यांत आरोपीला सदर साक्षीदारांची उलट तपासणी करण्याचे तीन प्रसंग आहेत. एक आरोप ठेवण्याच्या पूर्वीं, दुसरा आरोप ठेवल्यानंतर, तिसरा माजिस्ट्रेटाला योग्य वाटल्यास स्पेशल परवानगीनें केव्हां ही. समन्साच्या खटल्यांत मात्र फक्त एकदाच उलट तपासणी करतां येते. याचा परिणाम एखादे वेळीं आरोपीला फार घातुक होतो. समजा, समन्साच्या खटल्याचें पुरें महत्त्व लक्षांत न आल्यामुळें ह्मणा, किंवा पैशाच्या किंवा अन्य अडचणीमुळें ह्मणा आरोपीला खटल्याचे सुरुवातीलाच आपल्या बचावापुरतीं वकील देतां आला नाहीं, आणि फिर्यादीची व त्याच्या साक्षीदाराची उलट तपासणी करण्यास माजिस्ट्रेटानें सांगितलें तर आरोपीला त्याच्या कायद्याच्या अज्ञानामुळें त्या संधीचा योग्य फायदा त्यावेळीं घेतां येणार नाहीं, आणि पुढें जरी त्यानें वकील दिला तरी उलट तपासणीची एक वेळ दवडलेली संधी त्याला पुनः मिळणार नाहीं. अशा रीतीनें बिचारा न्यायाला अंतरविण्याचा संभव आहे. हिंदुस्थानचे लोक कायद्याच्या ज्ञानांतच नव्हे, तर सगळीं सामान्य प्रतीच्या शिक्षणांत सुद्धां फार मागें आहेत ही गोष्ट लक्षांत घेऊन कायद्यानें त्यांना न्याय मिळविण्याचा मार्ग सुलभ करून ठेविला पाहिजे. पण वरच्यासारखी एकच संधी ठेवल्यानें गरीब अडाणी प्रजेचें फार नुकसान होत आहे. यासाठीं वारंटाच्या खटल्याप्रमाणें समन्साच्या खटल्यांत ही उलट तपासणी करण्याच आणखी एकदोन प्रसंग आरोपीला देण्याची कांहीं तजवीज कायद्यानें करावी; निदान तसे प्रसंग मुद्दाम देण्याचें माजिस्ट्रेटाच्या खुशीवर तरी ठेवावें.

समन्साच्या खटल्यांतल्या सुधारणेच्या या दोन बाबी झाल्या. आतां वारंटाच्या खटल्यांतली ही एक दोन सुधारणा-स्थलें सुचवून हा लेख आटोपतों. वारंटाच्या खटल्यांत आरोप ठेवण्याच्या पूर्वीं केव्हां ही आरोपीला सोडून देण्याचा अधिकार माजिस्ट्रेटाला आहे, मात्र तसें करण्यास पुरेशीं कारणें आहेत अशी त्यानें खात्री करून घेतली पाहिजे व तीं कारणें नमूद केलीं पाहिजेत. हा अधिकार वाजवी आहे याबद्दल वाद नाहीं. आरोप ठेवण्याला योग्य कारणें दिसल्याशिवाय माजिस्ट्रेट आरोप ही ठेवीत नाहींत ही ही गोष्ट खरी आहे. तथापि कित्येक वेळां असें घडतें कीं आरोप ठेवल्यानंतर फिर्यादींत आरंभीं दिसला तसा कांहीं अर्थ नाहीं असें आढळून येतें. फिर्यादीचे साक्षीदार लटपटतात, किंवा आरोपीच्या बाजूचा पुरावा भक्कम दिसतो. अशा वेळीं [ एकदां आरोप ठेवल्यावर ] माजिस्ट्रेटला आरोपी निर्दोषी आहे असें पुरेपणीं कळून चुकलें तरी सगळा पुरावा ऐकल्याशिवाय व सगळ्या साक्षीदारांच्या जबान्या, उलट तपासण्या व फेर तपासण्या वगैरे सगळे संस्कार झाल्याशिवाय आरोपीला तडकाफडकीं निर्दोषी ह्मणून सोडून देण्याचें माजिस्ट्रेटाचे हातांत नसतें. याचा परिणाम असा होतो कीं आरोपी निर्दोषी आहे अशी न्यायरेवतेची खात्री झाली असतांही केवळ कायद्यानें ठरविलेले शिष्टाचार पूर्ण करण्यासाठींच फिर्यादी व आरोपी या दोन्ही पक्षांना, त्यांच्या वकिलांना, साक्षीदारांना व इष्टमित्रांना कोर्टांत येण्याजाण्याची दगदग व माजिस्ट्रेटाला जांभया देत जबान्या लिहून घेण्याची यातायात करावी लागते. शिवाय खटल्याचे निकाल या निष्कारण यातायातीमुळें लांबणीवर पडून कोर्टाचें काम फुगत जातें तें निराळेंच. फौजदारी कामें या पेक्षां अधिक झटपटीनें होण्याला निष्कारण शिष्टाचारांना फाटा देणें हाच एक मार्ग आहे.

## पूर्व आणि पश्चिम.

लॉर्ड कर्झन यांनीं एडिंबरो युनिव्हर्सिटी पुढें रेक्टर या नात्यानें केलेल्या भाषणांत आणि त्यांच्याच कलकत्ता युनिव्हर्सिटीपुढें झालेल्या भाषणांत केवढें अंतर दिसतें ! कलकत्त्याच्या भाषणांतला त्यांचा उद्दामपणा, दुसऱ्याला हलकं लेखण्याची प्रवृत्ति, स्वतःचें स्तोम, आणि बुद्धीची तरतरी या पैकीं एकाचा ही लेश परवाच्या त्यांच्या भाषणांत कोठें नाहीं उलट प्राच्य राष्ट्रांत जागृति होत आहे याबद्दल वाटणारी भीती, चीन, जपान, इराण वगैरे राष्ट्रें पाश्चात्यधर्तीवर सुधारणेंत पुढें पुढें पाऊल टाकीत चाललीं आहेत याबद्दल त्यांची स्तुति, आणि एकंदरीनें नीरसता हींच त्यांच्या भाषणाचीं मुख्य लक्षणें दृष्टीस पडतात. लॉर्ड कर्झन साहेबांच्या भाषणांतला अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ह्मणजे प्राच्य राष्ट्रांची भावी सांपत्तिक स्थिति हा होता. या राष्ट्रांनीं आजपर्यंत व्यापार व उद्योगधंदे या संबंधानें उदासीनता धरली होती. तेथपर्यंत आपली पाश्चात्य राष्ट्रांची चंगल चालली; पण आतां हीं प्राच्य राष्ट्रें स्वतःच्या मतलबाला जागृत होऊन व्यापार व उद्योगधंदे हातीं घेऊं लागलीं आहेत, तेव्हां लवकरच तीं पाश्चात्य व्यापाराला एशिआ खंडांतून हाकलून लावतील, इतकेंच नाहीं तर जमिनीची सुपीकता, कच्च्या मालाची सुबत्ता, स्वस्त खर्चांत मजूर मिळण्याच्या सोयी व जमिनींत पुरून ठेवलेलें पुष्कळ भांडवल वगैरे अनेक कारणांमुळें खुद्द युरोपखंडांत येऊन ते युरोपियन व्यापाऱ्यांशीं तीव्र स्पर्धा करतील अशीही भीति लॉर्ड साहेबांस वाटत आहे. ही भीति बहुतांशीं काल्पनिक आहे ही गोष्ट प्राच्य राष्ट्रांचें यथार्थ ज्ञान असणारांस सांगावयास नकोच. पण खरें आहे अशी कल्पना केली तरी प्राच्य राष्ट्रें जागृत होऊन स्वतःच्या हिताच्या उद्योगाला लागलीं तर त्यांत त्यांना हाडाच्या इंग्रजास वाईट वाटण्यासारखें काय आहे ? उलट इतकीं शेतकें अज्ञानांत व आळसांत घोरत पडलेले लोक आपल्या कर्तव्याला जागृत होऊं लागले याबद्दल मानवी जातीचें हित चिंतणाऱ्या उदार मनाच्या माणसास संतोषच वाटला पाहिजे. लॉर्ड कर्झन साहेबांनीं वरील भीतीचा बाऊ पुढें करून स्वतःच्या मनाचा संकुचितपणा मात्र व्यक्त केला आहे. ही भीती काल्पनिक आहे हें वर सांगितलेंच आहे. पाश्चात्य राष्ट्रें इतकीं प्रबळ आहेत कीं हिंदुस्थान, चीन किंवा इराण यासारख्या प्राच्य राष्ट्रांतून युरोपचें नुकसान होण्यासारखी औद्योगिक जागृति दिसूं लागतांच तीं राष्ट्रें तो अनिष्ट परिणाम नाहींसा करण्यासाठीं आपल्या अंगच्या सगळ्या सामर्थ्याचा उपयोग करण्यास चुकावयाचीं नाहींत. वस्तुस्थिति अशी असतां तिचा विपर्यास करून भावी संकटाचा बागुलबोवा भडक रंगांत काढण्यानें लॉर्ड कर्झन साहेबांनीं प्राच्य राष्ट्रांविषयीं तर अन्याय केलाच आहे, पण आपल्या जातभाईंच्या मनांत नसती काळजी उत्पन्न करून ठवून त्यांच्याशीं शांततेचा भंग केला आहे. ज्या रेक्टरच्या जागीं ग्लाडस्टन, रोजबरीसारखे उदार मनाचे व विशाल बुद्धीचे, थोरणी व खऱ्या उच्च पदवीचे मुत्सद्दी होऊन गेले, तेथेंच आतां वरच्या सारख्या कोत्या समजुतीचे, व मानवजातीच्या दोन मोठाल्या वर्गांत निष्कारण वैमनस्य उत्पन्न करून देणारे, तकलादी बुद्धीचे लोक भाषण करण्यास यावेत हा एडिंबरो युनिव्हर्सिटीचा दैवदुर्विलासच ह्मटला पाहिजे.

## स्वामींचा उपयोग.

कालचक्राबरोबर देशांतल्या संस्थांचीं चक्रें फिरलीं पाहिजेत, तर तो देश खरा सुधारलेला ह्मणावयाचा. आमच्या देशांत पुष्कळ लोकोपयोगी कामें करावयास पाहिजे आहेत. पण तीं करणारीं माणसें मिळत नाहींत अशी ओरड आहे. ही ओरड खरी नाहीं. माणसें हवीं तेवढीं आहेत. वाण आहे ती योजकाची आहे असें आह्मांस वाटतें. आमच्या देशांत प्राचीन काळापासून संन्यासीवर्ग आहे हा वर्ग निर्वाहासाठीं समाजावर अवलंबून असतो. संन्याशानें अर्थसंग्रह करावयाचा नाहीं अशी धर्माची आज्ञा आहे, पण पुण्यसंचय करूं नका असें धर्म सांगत नाहीं. संन्याशानें ऐहिक गोष्टींतून मन काढलें पाहिजे; पण शिक्षणासारखें पवित्र कार्य करण्याचे कामीं संन्यास धर्म कधींच आड येत नाहीं. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार देशांत झाल्या शिवाय या देशाची उन्नति व्हावयाची नाहीं हें सर्वांस कळून चुकलें आहे. पण तें करण्यास लागणारी द्रव्यानुकूलता सरकारापाशीं हवी तेवढी नाहीं या सबबीवर तें शिक्षण मुक्त करण्याचें अडलें आहे. या कामीं आमच्या संन्याशी वर्गाचा उपयोग करून घेतां आला तर केवढें देशकार्य होईल! आर्य समाजाचा उत्तर हिंदुस्थानांत जो येवढा फैलाव पंचवीस वर्षांच्या अल्प अवधींत झाला तो या स्वामींमुळेंच. पूर्वीं बौद्धधर्माचा प्रसार भिक्षु व भिक्षुणी यांनीं नुसत्या हिंदुस्थानांतच नव्हे तर चीन, जपान, सयाम, ब्रह्मदेश, सीलोन, जावा, युरोपखंड व अमेरिका वगैरे दूरदूरच्या प्रदेशीं केला, तो करण्यास कोणत्या राजाचा आश्रय पुरला असता? बौद्धधर्मानें स्वावेळीं घालून दिलेला कित्ताच सध्याचे कांहीं आर्य

फळ आपणांस दिसत आहे. या स्वामींचा उपयोग प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याचे कामीं सरकारनें व समाजानें करून घेतल्यास अल्प खर्चांत केवढें कार्य होईल! असें सांगतात कीं स्वामी विवेकानंद यांच्या मनांत ही गोष्ट करावयाची होती. ब्रह्मदेशांत बौद्धधर्म प्रचलित असल्यामुळें तेथें आज प्राथमिक शिक्षणाचें काम बौद्ध संन्यासी फार उत्तम प्रकारें करीत असलेले आढळतात. जी गोष्ट ब्रह्मदेशांत शक्य आहे ती हिंदुस्थानांत अशक्य होण्याला कांहीं कारण दिसत नाहीं. सध्याचे आमचे संन्यासदीक्षा घेतलेले स्वामी स्वतःच्या मोक्ष मार्गाकडे पाहतात; देशाच्या उन्नतीच्या कामीं साह्य करणें हा ही एक मोक्षमार्ग आहे ही गोष्ट हिंदुधर्म त्यांच्या मनावर बिंबवीत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. एखाद्यानें अनुभव पाहण्यासाठीं प्राथमिक शिक्षण, व नीति शिक्षण फुकट देणाऱ्या संन्याशासाठीं पुण्यासारख्या ठिकाणीं मठ स्थापन करावा, व या मठाचा खर्च समाज व सरकार या दोघांनीं मिळून चालवून दहा वर्षांचे अवधींत किती कार्य होतें तें अवश्य पाहावें अशी आमची सूचना आहे.

---

## दासनवमी.

( हनुमानगड वर्धा येथील महोत्सव. )

हनुमानगड वर्धा येथें रामदास संप्रदाय श्री सूर्यदेव महातर्फे गेल्या बुधवारीं ता० २१ फेब्रुवारीला दासनवमीचे उत्सवास सुरवात झाली. उत्सवाकरितां रायपूर, नागपूर, उमरावती, अकोला, ग्वालेर, मुंबई, पुणें, सातारा वगैरे ठिकाणाहून अदाजा १२५ पर्यंत सांप्रदायिक स्त्रीपुरुष आले होते. उत्सवा करितां श्री समर्थ रामदास स्वामींचे देवालया सन्मुख विस्तीर्ण मंडप दिला होता. यंदाचे सालीं सदर्हू देवालयाचें काम पूर्ण होऊन त्यांत श्री समर्थांचे मूर्तीची स्थापना झाली. देवालय सुंदर असून त्याचे दोहो बाजूंला संप्रदाया तर्फे काम करणाऱ्या मंडळी करतां खोल्या काढल्या आहेत. समर्थांची मूर्ति नागपूर येथील चितारी रा० खंडेराव सखाराम पारळकर यांनीं केली आहे. हे गृहस्थ संप्रदायाचे सभासदच आहे. मूर्ति साधे मृत्तिकेची केली असून फारच उत्कृष्ट साधली आहे. मूर्तीची ठेवण व चेहऱ्यावरील मुद्रा ही समर्थांचें चरित्र व ग्रंथ वाचून भक्तांचे हृदयांत उभ्या राहणाऱ्या कल्पनामूर्तीशीं पूर्णपणें साजेशी आहे. ही उत्कृष्ट मुर्ति सदरहू स. पारळकर यांस व ज्या संप्रदायाचे प्रेरणेनें त्यांनीं ती तयार केली त्या संप्रदायास खरोखर अभिमानास्पद आहे. मंडपाचे प्रवेश कमानीवर 'देव, देशिक (गुरु) व देशाधिपति यांजवर सप्रेम निष्ठा' हें संप्रदायाचें बीदवाक्य सुवर्णाक्षरांनीं लाविलें होतें. मंडपांत श्री समर्थांच्या व श्री. बादशाहा पांचवे जॉर्ज व श्री. राणी मेरी यांच्या तसबिरा लाविल्या होत्या. उत्सवास प्रारंभ सकाळीं ७ वाजतां झाला. प्रथम आरती, व श्रीमत् दासबोधवाचन व भजन हीं ९ वाजेपर्यंत झालीं. नंतर रा. वासुदेवराव चिपळुणकर वकील आकोला यांचें 'भगवान श्री गौतम बुद्ध, यांचे चारित्रावर अर्धा तास भाषण झालें. त्याचा सारांश असा होता कीं बौद्धधर्म आज जरी हिंदुधर्माहून एक निराळा असा धर्म समजला जातो तरी तो खरोखर तसा नाहीं. भगवान गौतम बुद्ध हे हिंदु होते व त्यांनीं हिंदु धर्माचें खंडण न करितां त्याचें संशोधन केलें. ते हिंदु धर्म संस्थापकांपैकींच समजले जातात व म्हणूनच त्यांची दशावतारांत भगवान विष्णूचे नववे अवतार म्हणून गणना आहे. मात्र त्यांना नास्तिक मतवादी विष्णूचे अवतार असें म्हणतात. परंतु ज्या वेळीं कोणत्याही धर्माची ग्लानी होऊन त्यांतील शाश्वत रहस्यांचा लोप होतो, ज्यांच्या स्वाधीन धर्म असतो असे, पुराणिक, शास्त्री, वैदिक, मठपति वगैरे केवळ शब्दार्थाचेच धनी होतात व नीति, न्याय व तारतम्य यांची हेळसांड होते त्या वेळीं पडून समाजाला पुनः शाश्वत धर्माची ओळख करून देण्यास व धर्माची ज्योती, काजळी झाडून, पाजळण्या करितां, भगवान विष्णूना व त्यांचे सहायक ऋषी, मुनी, संत यांना अवतार घेऊन यावें लागतें. तेव्हां अज्ञान कर्मकांडांत गुरफटलेल्या तत्कालीन ब्राह्मणांना ते नास्तिकच वाटतात व ते त्यांचा छळ करतात हें तुकाराम, ज्ञानेश्वर, वगैरे सर्व संतांच्या चरित्रावरून दिसून येईल. भगवान बुद्धदेवांनीं 'अहिंसा परमो धर्मः' हे यम नियम सूचक योगधर्माचें मूलभूत वाक्य हातीं घेऊन ब्राह्मणांचे निर्दय पशुयज्ञ बंद केले व बहुजनांना समजाविलें कीं खरे यज्ञ म्हणजे प्रत्येकांच्या हृदयांत बसती करून असलेले काम क्रोधादिक पशु यांचें निर्दालन संयमाग्नींत हवन करणें हे होत. नंतर रा. रघुनाथराव भगाडे मुनसफ यांनीं भगवद्गीतेंतील १२ वा अध्याय समजावून सांगितला. नंतर संप्रदायाची आजपर्यंतची हकीकत व कित्येक अहवाल त्या त्या मठाच्या स्त्रीसेवकांनीं वाचून दाखविले. त्यावरून सदर्हू संप्रदायाचें कार्य उत्तम चालत असून ही संस्था कांहीं कालानें आपल्या देशांत एक उत्तम विधायक शक्तिच उत्पन्न झाली आहे असें आढळून येईल. सदर्हू अहवालावरून गेल्या सालीं पुणें, आकोला, रायपुर, नागपूर व वर्धा येथें नवीन मठ स्थापन होऊन त्यांतील सांप्रदायिक स्त्रीपुरुष नियमानें, भजन, वाचन, अभ्यास करितात असें दिसलें. नंतर मंडळी फलाहारास गेली.

दोन प्रहरीं कामास सुरवात होऊन श्री रामदासानुदास [ श्रीधर विष्णु परांजपे बी. ए ] यांनीं लिहिलेला यंदाचा पुण्य संदेश 'समर्थांची शिकवणूक' हा वाचला व नंतर त्यांचें कीर्तन झालें तो सूर्यास्त झाला. कीर्तन उत्कृष्ट झालें. विषय 'नामसंकीर्तन माहात्म्य' होता. तात्विक विवेचन अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथांचे आधारें उत्तम झालें. अध्यान श्री वाल्मिकचें आधारें होतें. दुसरे दिवशीं पुन्हां कीर्तन, भजन, व गोपाळकाला होऊन उत्सवाची समाप्ति झाली.

या संप्रदायाचे गेल्या सालचे इतिहासांत विशेष संस्मरणीय व अभिनंदनीय गोष्ट म्हटली म्हणजे गेल्या नाताळांत थीऑसॉफिकल सोसायटीचे कॉन्व्हेंशनास पूर्ण यश येवो अशी अभिचिंतनाची सदर सोसायटीला धाडलेली तार होय. हें संप्रदायाचें सत्कृत्य म्हणजे भावी कालीं अनेक संप्रदायाच्या होणाऱ्या एकीकरणाचें पूर्व व प्रसाद चिन्हच होय अशा उत्कृष्ट रीतीनें चालविलें जाणाऱ्या संस्थेवर श्री समर्थांचा पूर्ण अनुग्रह असो असें त्या श्री समर्थांना प्रार्थून आम्ही हा लेख संपवितों.

## 'सत्यं मनोहारिच दुर्लभंवचः'

व्हाइसरायसाहेबांच्या एक्झिक्युटिव्ह कौंसिलाचे हिंदी सभासद ना० सयद अली इमाम यांनीं ता. १८ रोजीं कलकत्यास टाऊनहॉलांत खान्याचे प्रसंगीं आपल्या देशबंधूस उद्देशून जें भाषण केलें तें अनेक कारणामुळें आम्हांस अत्यंत महत्वाचें वाटतें. ना० सिंह यांनीं जेव्हां आपल्या जागेचा राजीनामा दिला तेव्हां असें प्रसिद्ध झालें होतें कीं कौंसिलांतले बाकीचे–युरोपियन–सभासद त्यांच्यापाशीं लोकळवणारें कागद्या गोष्टी सांगत नाहींत, म्हणून ना० सिंह हे जागेला कंटाळले आहेत. वस्तुस्थिति तशी नव्हती हें खुद्द ना० सिंह यांनीं पुढें सांगितलें व आज ही ती स्थिति नाहीं असें ना० सयद अली इमाम सांगत आहेत. हिंदी लोकांचा वरील गैरसमज दूर करून राज्यकर्त्याविषयीं प्रजेचीं मनें शुद्ध राखणें हें अवश्य कर्तव्य दोन्ही हिंदी सभासदांनीं फार उत्तम प्रकारें पार पाडलें आहे. असा गैरसमज लोकांच्या अज्ञानामुळें झाला हें उघड आहे. कौंसिलाची रचना, कामाची पद्धति यांच्या विषयींची माहिती नसल्यामुळें त्यांना साहजिकच असें वाटलें कीं लॉ मेंबरांचें मत कायद्याच्या प्रश्नापुरतें घेत असतील, आणि बाकीच्या गोष्टी त्यांना न विचारतां पुसतां गुप्त मंडळींत ठरत असतील. खरा प्रकार आतां लोकांना कळूं लागला आहे, आणि राज्यकर्त्याविषयींचा वरील गैरसमज दूर होण्यास सदर खुलाशाचें मोठें साह्य झालें आहे, याबद्दल आम्हांस मोठें समाधान वाटतें.

---

ना० सयद अली इमाम यांनीं सरकारशीं सहकारित्व राखून हिंदी सभासदांना आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावण्याचे कामीं साह्य करावें अशी आपल्या देशबंधूना विनंती केली आहे. तिकडे निदान सुशिक्षितांचें तरी लवकरच लक्ष जाईल अशी आम्ही आशा करतों. सरकारी अधिकाऱ्यांना 'अशस्त्र विरोध' करण्याचें खूळ थोडे दिवसांपूर्वी आमच्या देशांत माजलें होतें, आणि स्वराज्याच्या भलभलत्या कल्पनांचें वारें डोक्यांत भरलें होतें. तें वेड आतां गेलें असून सुशिक्षितांची दृष्टि निवळूं लागली आहे. सरकारी अधिकाऱ्यांविषयींच्या निष्कारण शंका मावळल्या आहेत; आणि पुढील कर्तव्यपथ अस्पष्ट कां होईना, पण दिसूं लागला आहे. हिंदुस्थानाच्या भाग्योदयाचें चित्र अधुक अधुक उमटूं लागलें आहे. यालाच ना० सय्यद इमामसाहेब 'नवयुग' अशी संज्ञा देत आहेत. हें नवयुग पूर्ण आशामय आहे. मात्र तें जवळ जवळ आणण्याचें काम करण्यांस लोकांनीं कंबरा बांधल्या पाहिजेत.

---

पण लोकांत एकी कोठें आहे? हिंदु व मुसलमान यांनीं परस्पर विरुद्ध दिशेला ताणल्यास सर्वांचें सामर्थ्य एका केंद्रांत कसें येईल? हिंदुमुसलमानांचें संयुक्त कान्फरन्स भरविण्यांत ह्या प्रश्नाचीच वाटाघाट झाली ना० सय्यद अली इमामासारखे उदार मनाचे मुसलमान गृहस्थांना सदर कान्फरन्समध्यें येतां आलें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे नामदारसाहेबांचें मत किती निष्पक्षपाताचें आहे हें त्यांच्या मागील कित्येक उद्गारांवरून व परवांच्या भाषणावरून दिसून आलें आहे. 'आधीं हिंदु आणि मग मुसलमान' हें तत्त्व कबूल नसलेल्या ना० अ. मारवाडा सारख्यांना ना० सय्यद इमाम साहेबांचे विचार कदाचित् रुचणार नाहींत. पण हिंदी कौंसलरांचें कर्तव्य चित्र रेखाटतांना त्यांनीं वरील तत्त्वाचाच अनुवाद केलेला पाहून विचारी हिंदी मनुष्यास संतोष वाटल्यावांचून राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे. ना० सय्यद इमाम यांना हिंदु-मुसलमान कान्फरन्समध्यें येतां आलें नाहीं याबद्दल आम्हांस खेद वाटतो तो येवढ्याच साठीं कीं, हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें एकी करण्याचे कामीं त्यांचें फार साह्य झालें असतें.

कौंसिलांत मुसलमानांना मुसलमान प्रतिनिधि नेमून पाठविण्याचा जो हक्क मिळाला आहे त्या संबंधानें मुख्य लढा पडला आहे त्यांत दुराग्रहाचा भाग फार आहे असें आम्हांस वाटतें. कारण, आमची खात्री आहे कीं ना० सयदअली इमाम, यांच्या सारखे थोर व उदार विचाराचे गृहस्थ निवडणुकी करितां उभे राहिल्यास हिंदु मतदार एखाद्या अनुदार हिंदूपेक्षां अशा उदार मुसलमान उमेदवारांसच आपलीं मतें देऊन निवडतील. सगळेच मेंबर असे उदार मताचे मुसलमान असले तरी ते आपले मुखत्यार व प्रतिनिधि आहेत याबद्दल हिंदुमतवाल्यांना विषाद तर राहोच, पण उलट अभिमान वाटेल. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे ना. सयद इमाम यांचें परवांचें भाषण सद्यःस्थितींत अत्यंत अर्थपूर्ण व महत्त्वाचें होतें व आमचे मुसलमान बंधु त्यांतलें मर्म ओळखून वागतील तर त्यांत एकंदर राष्ट्राचें कल्याण आहे असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

---

## THE BERAR MUHAMMADAN EDUCATIONAL CONFERENCE.

The conference has been working for the last three years, its main object, being to impress upon the minds of the Musalman population the importance of education to approach Government in the matter and thus to help on and facilitate the cause of Muhammadan education.

It is indeed gratifying to see that the Musalman gentry has been taking a good deal of interest in this movement and that officers of Government are doing their best to help the cause.

This year the conference will be held at Akola in the ensuing Easter holidays. All those who take interest in the cause of Muhammadan education are cordially requested to attend the conference and to give it an impetus by their co-operation.

Those who wish to make any suggestion or read any essay should kindly give an early intimation to that effect to the undersigned.

Syed Abdul Razak,
Secretary,
Managing Committee,
Berar Muhammadan Educational Conference.
(Akola Berar)

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान.**— थंडीचें मान मंदावत चाललें असून आगामी वसंतऋतूचा थंडी व सौम्य उष्णता यांचा मिलाफ होत हेत उष्णतेचें भावी साम्राज्य आतां पासूनच ध्वनित होत आहे सार्वजनिक आरोग्य समाधानकारक नसून त्याला प्लेगामुळें धक्का मोठाच बसला आहे. येथें प्लेगाचे मृत्यु १-१२ होतात.

येत्या मार्चची ता. ११ व ता. १०।११ असे चार दिवस सार्वजनिक कचेऱ्यांस सुट्टी देण्यांत आली असून लोकगणतीच्या कामाच्या पूर्ततेकडे सर्व लोकांस लक्ष पुरवितां यावें म्हणून ही योजना करण्यांत आली आहे.

# जेव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशा होत, तेव्हां सुद्धा सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिंधु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षी पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिस्टरी झाली आहे. या औषधानें कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी (कालरा) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, दांत पाय व कंबर दुखणें, अंधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि आणखी सर्वोस गुण येतो कि. फक्त १ ... डौस ... आहे. सर्व औषधें विकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत व, प्रथम तेथें च शोध करावें ... व मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षीचें पंचांग ... फुकट मिळेल लहान मोठाव ही पत्ता पाहिजेस, विश्वास आमचा पहावें

औषधिमिळण्याचा पत्ता—
धेत्रपाल शर्मा मालक
सुख संचारक कंपनी मथुरा



## जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे म्हणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक
मेसर्स डंकन स्टेटन कंपनींतील ऑईल एंजिन एक्सपर्ट (फीरहींग),
नो. नं. ड ८०. अमरावती.



## गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !
इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.
॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्पतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळींच्या शोधानें ही वनस्पती म्हणजे झाडपाल क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफळार्कमधु" यंत्र साधनानें तयार केला आहे हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास ज्या होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी कामशक्ती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांस समजूं लागतो. मनेंद्रियांतील गेलेली शक्ती पाहिल्यापेक्षा अंशमानानें अधिक वाढते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो देह, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भर शैाचास साफ होऊन भूक चांगली कड कडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका महिन्यांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. महोन्नतता येते या औषधास पथ्य नाहीं कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १ दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १॥४, तीन बाटल्यांस २॥१० दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; म्हणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास ... पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स
एम्. जी. आर.
नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी
हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि बेळगांव

सूचना —कोणताही माल गुणकारी ठरला म्हणजे जिकडे तिकडे त्याचा खप सुरु होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं. असेच येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं ला. गले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व मोलदंड ताडून घ्यावें



... अशी पुन्हां येणार नाहीं.




जर्मन इम्पेरिअल रास्कोप सिस्टिम.

मांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा म्हणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पेकेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतके सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ता — खोजा वल्लीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४



चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

(वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. १॥) **कलाशिक्षण** (नमुना अंकास ज्ञा)

नानाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्चे अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रामोहन, रोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या, औषधी, मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक—- कलाशिक्षण, कार्यालय,
नो. नं. ५ बडोदें.



# ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

## वेदांताचें गुईड.

रा. खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्दे कृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेत गुईड धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्त्वें मनामध्यें चांगलीं बिंबून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तेव्हांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४३, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक, छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें, पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१ कि. दें. रुकरंडु, किर्लोस्करवाडी पो० कुंडल.
२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० प २९



## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार–खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, धूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, काडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात त्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलासही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे कारतां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

व्ही. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ५६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालेपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

व्ही. एन. धारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.


## नोटीस

विहार आनन्दका सागर रंगीन तसबीरो सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मगावो धोकेसे बचो स्त्री पुरुशोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती, कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिकी ,पेहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार समय सहवास स्थान क्रय, शैय्यातिथ, कामस्थान, सोलासिंगार, बतीसोआभूशण, वश्रत आदिर्भप्रधान पुत्रस्टीकार्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार कि.मत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड सिटी.

## जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, कांहीं दिवसांपूर्वी आम्ही त्र्यंबक देवलाल कलाल राहणार मलकापूर या नांवच्या इसमास आमचे तर्फे कोर्टात कांहीं विशिष्ट कामें करण्यासंबंधानें ता० २९।३।१० रोजीं मुखत्यारपत्र दिलें होतें. त्यानें आमच्या कामांत घोटाळा करून पैशाची अफरातफर केल्याचें आणि आपल्या अधिकारा बाहेर मालकांस न कळूं देतां कांहीं कामें केल्याचें दिसून आल्यावरून 'पार्चे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. सदरहू त्र्यंबक देवलाल यांच्याशीं कोणीही आमच्या संबंधानें आमचा मुखत्यार म्हणून कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. हें सर्वांस जाहिर करण्यासाठीं ही जाहिर नोटीस देत आहों.

सही
विष्णुसा बाळकृष्णसा दस्तूर खुद.
नो० नं० ७८

## आर्यवनौषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांकडील आनररी असिस्टंट सर्जन खांसा अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचा औषधें बारीक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें हीं त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शास्त्रांतून एक दोन दिवसांत कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्य न आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजिवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,

रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धिवर्धक सुवर्ण माक्षीक

मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षीं पाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळें इंद्रियशिथिलता, करकी. गर्मींसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, शिश्नाची घुरणी, छातींतील रोग, सठ पाय ग्रर्माग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधें. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्टमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धि, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होत व मनास उत्साह देतात. दुध व गव्हान्न पथ्य लगते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सार्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानवहीं सोबत दिली व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दर:—एकदम ३१ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० १२५ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजन:-यानें वरस. साहर, फुल, मुपरशा. बिंदु, कांच इत्यादि डोळ्याचे सर्व विकार हरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:--कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जाता तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें मिळत नाहीं. बा० किं० १ ।। मार बाटलीस रु० २

४ दंतबळवर्धक पूड:-दंत संबधीं सर्व विकार उत्तम बरे होतात

५ विंचूचें विष:-औषध लावतांच उतरतें मुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्ण—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्प हिवज्वर—औषध घेतांच नशाहि मागचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १ पुडी १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषध:—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये म्हणून वातावर मंत्रा ठेवून गाचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा कॅटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सार्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्ही सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोगीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचा निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावें आमचे जाहितीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आजिले वगैरे गावांतुन तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधानें कित्येक ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजानक व कल्याणकरीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उन्नतावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीस यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकल औषधविक्रेते व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो. नं. २४

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

**ORIENTAL GOVERNMENT**

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

## FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur

नो. नं. २५

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.